सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ०७ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३१३ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचे निधन

मुंबई : क्रिकेट समीक्षक, लेखक, मुक्त पत्रकार द्वारकानाथ संझगिरी यांचे ७४ व्या वर्षी मुंबईच्या लीलावती रुग्णालयात निधन झाले. मागील काही दिवसांपासून आजारी असलेल्या द्वारकानाथ संझगिरी यांच्यावर लीलावती रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारांदरम्यान गुरुवारी सकाळी संझगिरी यांची प्राणज्योत मालवली. संझगिरींच्या पार्थिवावर शुक्रवार ७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

द्वारकानाथ संझगिरींचा जन्म १५ नोव्हेंबर १९५० रोजी दादरच्या हिंदू कॉलनीत झाला. किंग जॉर्ज स्कूल (आताचे राजा शिवाजी विद्यालय) आणि रामनारायण रुईया महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. नंतर त्यांनी व्हीजेटीआय (वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट, पूर्वीची व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट), माटुंगा येथून सिव्हिल इंजिनिअरिंग केले. मुंबई महानगरपालिकेत अभियंता म्हणून नोकरी करणाऱ्या द्वारकानाथ संझगिरींना क्रिकेट प्रचंड आवडत होते. संझगिरी मुख्य अभियंता, पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी स्तंभलेखक, लेखक आणि सूत्रसंचालक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली.

संझगिरींनी १९७० च्या उत्तरार्धात क्रीडा विषयक लिखाण सुरू केले. 'दिनांक', 'श्री' मध्ये लिहून कारकिर्दीचा श्रीगणेशा करणाऱ्या संझगिरींनी भारताने इंग्लंडमध्ये १९८३चा विश्वचषक जिंकल्यानंतर निवडक मित्रांच्या सहकार्याने 'एकच षटकार' हे पाक्षिक क्रीडा मासिक सुरू केले. द्वारकानाथ संझगिरी हे 'एकच षटकार'चे कार्यकारी संपादक म्हणून काम करत होते. संझगिरींनी १९८० च्या दशकात 'आज दिनांक', 'सांझ लोकसत्ता', 'मिड-डे', 'तरुण भारत', 'पुढारी' आणि इतर अनेक प्रकाशनांसाठी स्तंभलेखन करायला सुरुवात केली. लोकसत्तामधील त्यांचे क्रीडा

लेख आणि प्रवासवर्णनसंबंधीत स्तंभ गाजले. संझगिरी हे २५ वर्षांहून अधिक काळ 'सामना' या मराठी वृत्तपत्रासाठी क्रिकेट वृत्तांकन करत होते. त्यांनी अनेक क्रिकेट सामन्यांचे कव्हरेज केले. स्तंभलेखनाव्यतिरिक्त, संझगिरी यांनी प्रवास, सामाजिक समस्या, क्रीडा आणि चित्रपट अशा विविध विषयांवर ४० पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी एक एकपात्री स्टँडअप टॉक शो पण केला. या शो चे देशाविदेशात हजारो प्रयोग झाले.

सुनील गावसकर आणि गुंडप्पा विश्वनाथ यांचा त्यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त सत्कार, सचिन तेंडुलकरांच्या विक्रमी ३५व्या कसोटी शतकानिमीत्त त्यांचा सत्कार, १९७१ च्या इंग्लिश मालिका विजेत्या भारतीय संघाचा सत्कार आणि सचिन तेंडुलकरांचा सर्वात अलीकडचा त्यांची पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार अशा अनेक मोठ्या कार्यक्रमांची संकल्पना आणि अंमलबजावणीही त्यांनी केली आहे. 'बोलंदाजी' या टीव्हीवरील कार्यक्रमाचे ते प्रस्तुतकर्ता होते. 'मधु इथे अन् चंद्र तिथे' या टीव्ही मालिकेचे ते पटकथा लेखक होते. क्रिकेट विश्लेषक आणि तज्ज्ञ म्हणून त्यांनी मराठी वृत्त वाहिन्यांसाठी काम केले. द्वारकानाथ संझगिरी २००४ पासून 'ती रा की ट धा' आणि 'स्वरा आर्ट्स' या संस्थांनी सादर केलेल्या संगीतमय कार्यक्रमांसाठी सूत्रसंचालन करत होते. या संगीतमय कार्यक्रमांमध्ये हिंदी चित्रपट आणि संगीत उद्योगातील दिग्गजांना संगीतमय श्रद्धांजली दिली जात होती.

फार्मर आयडीला सर्व्हर डाऊनचा फटका

शहापूर : शासनाने शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी सक्तीचे केले असून शेतकरी आपला आधार लिंक मोबाईल आधारकार्ड व ७/१२ घेऊन आधार सेंटर, सी.एस.सी. सेंटर व तलाठी कार्यालय अशा ठिकाणी धावपळ करून आपले फार्मर आयडी बनविण्यासाठी मागील दहा-पंधरा दिवसापासून प्रयत्न करीत आहेत. परंतु सर्व्हर डाऊन होत असल्यामुळे शेतकऱ्यांना दिवसभर ताटकळत राहावे लागत आहे.

शेतकरी आयडी बनवतांना कधी सर्वर डाऊन, तर कधी आधार कार्डवरील माहिती परिपूर्ण असताना बहुतांश केंद्रावर शहापूर तालुका गायब झाल्याचे दिसून येत आहे.कधी शेतकरी फोटो दिसत नाहीत. त्यामुळे पुढील ७/१२ किंवा ओटीपी येणे थांबते. दरम्यान ऑपरेटर देखील खूप प्रयत्न करून सुद्धा नोंदी होत नाहीत याबाबतची माहिती शहापूर तहसीलदाराच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना २०० ते २५० रुपये खर्च करूनही फार्मर आयडीपासून वंचित रहावे लागत आहे. याबाबत तलाठी कर्मचारी ऑनलाईन तांत्रिक बिघाड असल्याचे कारण पुढे करत आहेत. तो दूर करण्यासाठी महसूल विभागाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

तालुक्यातील भातसई, शेरे, शेई, अंबर्जे, मासवणे, नडगाव, डोळखांब, बाबघर इ. भागातील शेतकऱ्यांची नोंदणी होत नाही. यामुळे ते हैराण आहेत. पीएम किसानचा १९ वा हप्ता २४ फेबुवारी रोजी वितरित होत असून, फार्मर आयडी अभावीशेतकरी त्यापासून वंचित राहणार आहेत .

नाशिक शहरामध्ये वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादेशी घुसखोरांना अटक!

बांधकाम साईटवर पाळत ठेऊन पोलिसांनी केली कारवाई

नाशिक : नाशिक पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेने अवैधरित्या घुसखोरी करून शहरामध्ये वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादशी नागरिकांना अटक केली. हे सर्व बांगलादेशी नागरिक शहरातील विविध भागातील बांधकामाच्या साइटवर आपली ओळख लपवून राहत होते.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत या घटनेची सविस्तर माहिती दिली. मध्यवर्ती गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण माळी यांना मिळालेल्या गोपनीय माहिती नंतर मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने या

संशयित घुसखोर नागरिकांवर हुशारीने पाळत ठेवली होती. या कामगिरी दरम्यान गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी साईट सुपरवायझर, बांधकाम मजूर यांचे वेशांतर केले होते.

पथकाने आडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका बांधकाम साइटवर जाऊन सदर बांगलादेशी घुसखोरांच्या वास्तव्याची खातरजमा केली. सदर व्यक्ती बांग्लादेशी घुसखोर असल्याचे निष्पन्न होतात तांत्रिक विश्लेषण करून आठ संशयित लोकांना ताब्यात घेण्यात आले.

सुमन कलाम गाझी (वय २७), अब्दुल्ला अलीम मंडल (३०), शाहीन माफिजुल मंडल (२३), लासेल नूर आली शंतर (२३), असाद अर्शद अली मुल्ला (३०), अलीम सुआन खान (३२), अल अमीन आमिनूर शेख (२२) व मोसिन मोफिजुल मुल्ला (२२) अशी या बांगलादेशी घुसखोरांची नावे आहेत. त्यांच्याजवळ भारतीय नागरिकत्वाचा पुरावा मागितला असता तो ते सादर करू शकले नाहीत. तसेच दोन जणांकडे आधार कार्ड मिळाले आहे. ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची अधिक चौकशी केली असता बांगलादेशातील एका व्यक्तीने त्यांना सीमापार करण्यास मदत केल्याचे सांगण्यात आले. यातील आरोपी सुमन गाझी हा सर्वप्रथम भारतात आला व त्यानंतर त्याने त्याच्या संपर्कातून उर्वरित आरोपींना भारतात आणि पुढे नाशिक मध्ये आणले.

बांगलादेशी नागरिकत्वाचे सापडले पुरावे

ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदिप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल, सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास चव्हाणके प्रविण माळी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेरखान पठाण, किशोर देसले, बाळु बागुल, नामदेव सोनवणे, पोलीस हवालदार गणेश वाघ, समिर चंद्रमोरे, मनिषा जाधव, वैशाली घरटे, अतुल पाटील, गौरख खांडरे, युवराज कानमहाले यांच्या पथकांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांविषयी कुठलीही नाराजी नाही : एकनाथ शिंदे

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०१ फेब्रुवारी

राज्यात महायुतीचे काम समन्वयाने सुरू आहे. भाजपा किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विषयी कुठलीही नाराजी नसल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. आभार सभेच्या अनुषंगाने ते नांदेड येथे आले असता पत्रकारांशी बोलत होते.

राज्यात महायुतीचे काम अत्यंत चांगल्या पद्धतीने, समन्वय ठेवून सुरू आहे. मी मुख्यमंत्री होतो तेंव्हा देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री होते. आता ते मुख्यमंत्री आहेत

तर मी उपमुख्यमंत्री आहे. ज्याप्रमाणे देवेंद्र फडणवीस माझ्या पाठीशी होते त्याच प्रमाणे मी देखील त्यांच्या पाठीशी आहे. राज्यात महायुतीने विकासाचे प्रकल्प राबविल्यामुळेच जनतेने विधानसभा निवडणुकीत भरभरून साथ दिली. योजना बंद होणार असल्याची अफवा सुरू असली तरी या योजना बंद होणार नाहीत. त्यातच महाविकास आघाडी सरकारने बंद केलेली मराठवाडा पावर ग्रीड योजना देखील सुरू करण्यात येणार आहेत. महाशक्तीपीठ महामार्गाला देखील शेतकऱ्यांचा विरोध नाही. काही ठिकाणी विरोध असेल तर त्या शेतकऱ्यांशी चर्चा करण्यात येईल. महामार्गामुळे नुकसान होत असल्यास मार्गाला वळन देण्यात येणार असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस पाणी पुरवठामंत्री गुलाबराव पाटील, आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर आदींची उपस्थिती होती.

पिनाका रॉकेट लाँचर सिस्टीमसाठी १०,२०० कोटींचा करार

नवी दिल्ली, ०६ फेब्रुवारी : संरक्षण मंत्रालयाने आज, गुरुवारी पिनाका मल्टी-बॅरल रॉकेट लाँचर वेपन सिस्टीमसाठी १० हजार २०० कोटी रुपयांचा करार केला. नागपूरच्या सोलर इंडस्ट्रीज आणि मुनिशन्स इंडिया लिमिटेड (एमआयएल) कंपनीसोबत हा करार करण्यात आला. यासंदर्भात संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने गेल्या आठवड्यात भारतीय लष्करास दारूगोळा खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली.

एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी संजीव सेठी यांची नियुक्ती

मुंबई : एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाचं अध्यक्षपद परिवहन विभागाच्या सचिवांना देण्यात आले आहे.एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी अप्पर मुख्य सचिव परिवहन संजीव सेठी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना गृह विभागाकडून राजपत्र जारी करत मोठा बदल करण्यात आला आहे. महायुतीत रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाबाबतचा वाद समोर आला होता. त्यानंतर रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती देण्यात आली होती.

आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृह विभागानं राजपत्र प्रकाशित करत पुढील आदेशापर्यंत अप्पर मुख्य सचिव परिवहन संजीव सेठी यांच्याकडे देण्यात आलं आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचं अध्यक्षपद यापूर्वी परिवहन मंत्र्यांकडे असायचे. एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या काळात नियमात बदल करुन भरत गोगावले यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे एसटीचं स्टेअरींग होतं. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या एका निर्णयानं प्रताप सरनाईक यांना धक्का बसला आहे.

राज्यात महायुती सरकारच्या काळात एसटी महामंडळाचं अध्यक्षपद शिवसेनेकडे आहे. एकनाथ शिंदे सरकारच्या काळात नियमामध्ये बदल करुन एसटीचं अध्यक्षपद भरत गोगावले यांना देण्यात आलं होतं. एसटीच्या उत्पन्नवाढीसाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी नुकताच कर्नाटक राज्याचा दौरा केला होता. आता एसटी महामंडळाचं अध्यक्षपदी परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजीव सेठी यांच्याकडे अध्यक्षपद देण्यात आलं आहे.त्यामुळे देवेंद्र फडणवीसांच्या या निर्णयामुळे महायुतीत नाराजी व्यक्त होताना दिसत आहे.

भारताची 'चांद्रयान-४' मोहिम २०२७ मध्ये - जितेंद्र सिंह खडकाचे नमूने आणणार

नवी दिल्ली : भारत २०२७ मध्ये चंद्रावरील खडकांचे नमुने पृथ्वीवर परत आणण्यासाठी 'चांद्रयान-४'ही मोहिम प्रक्षेपित करेल. अशी माहिती केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी एका मुलाखतीत दिली. यासंदर्भात जितेंद्र सिंह म्हणाले की, भारत २०२६ मध्ये खोल समुद्राचा शोध घेण्यासाठी 'समुद्रयान' मोहिम देखील प्रक्षेपित करेल आणि 'गगनयान' ही मोहीम देखील भारतीय अंतराळवीरांच्या पहिल्या तुकडीसह अवकाशात झेपावेल.

बाबासाहेबांच्या सहवासातील अनंत दाशरथे यांना ज्ञानसंदिप शिक्षण संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर

संस्थेच्या वर्धापनदिनी समारंभपूर्वक पुरस्कार प्रदान करणार

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : डॉ. आंबेडकरनगर येथील ज्ञानसंदिप शिक्षण संस्थेतर्फे यंदापासून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. संस्थेचा शनिवारी, १५ फेब्रुवारी ३५ वा वर्धापन दिन आहे. या सोहळ्यातच पहिल्या जीवनगौरव पुरस्काराने अनंत दाशरथे यांचा सन्मान केला जाईल, असे संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सोनवणे यांनी मंगळवारी, ४ फेब्रुवारी येथे जाहीर केले.

नागसेन वनातील मिलिंद कॉलेजचे बांधकाम सुरू असताना दाशरथे यांनी १९५४ ते १९५५ दरम्यान बाबासाहेबांची सेवा केली आहे. सुमारे वर्षभर दाशरथे बाबासाहेबांच्या सहवासात होते. त्यानंतर त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयातही काम केले. पुढे त्यांनी मनपाच्या ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून काम पाहिले. दरम्यान खडकेश्वर येथे परिमल प्रकाशन संस्थेची स्थापना करून अनेक कथा, साहित्य, काव्यसंग्रह आणि वैचारिक ग्रंथ त्यांनी प्रकाशित केले आहेत. सामाजिक, साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊनच त्यांना जीवनगौरव पुरस्कार दिला जाणार आहे.

मर्चंट नेव्हीतील तरुणाचा संशयास्पद मृत्यू, मुंबईच्या समुद्रात आढळला मृतदेह

मुंबई : मर्चंट नेव्हीतील तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाला आहे, त्याचा मृतदेह ससून डॉकजवळ समुद्रात आढळला आहे. सुनील पाचार असे या तरुणाचे नाव आहे. तो २३ वर्षांचा होता.

मूळचा राजस्थानमधील शिखर येथील निवासी असलेला सुनील पाचार मर्चंट नेव्हीत होता. तो एका मालवाहक जहाजावर कार्यरत होता. या मालवाहक जहाजाचे मुख्य प्रभारी देबाशीष मोंडल यांनी पोलिसांना दिलेल्या निवेदनात सुनील पाचारच्या मृत्यू चुकून पाण्यात पडल्यामुळे झाल्याचे नमूद आहे. सुनील आणि आणखी एक नाविक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी ड्रायव्हिंग डेकवर आराम करत होते. दुसरा नाविक चहा बनवायला गेला असताना सुनीलला जाग आली. सुनील अर्धवट झोपेत लघवीसाठी गेला आणि तोल जाऊन किंवा पाय घसरुन पाण्यात पडला; अशा स्वरुपाचे निवेदन देबाशीष मोंडल यांनी पोलिसांना दिले. मात्र सुनीलच्या कुटुंबीयांनी त्याच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त केला आहे.

सुनीलचा चुलत भाऊ रमेश मुंड यांनी संशय व्यक्त केला आहे. सुनीलकडून मिळालेल्या माहितीआधारेच त्यांनी हा संशय व्यक्त केला आहे. जहाजावर सुनीलचा सचिन नावाच्या सहकारी नाविकाशी गर्लफ्रेण्डवरुन वाद झाला होता. या वादानंतर सुनील बेपत्ता झाल्याचे रमेशने सांगितले. सुनील पाचार ज्या जहाजावरुन बेपत्ता झाल्याचे सांगत होते त्या जहाजावर तो नोव्हेंबर २०२४ पासून काम करत होता; अशीही माहिती त्याच्या घरच्यांनी दिली. सुनील पाचारचा मृतदेह सापडल्यानंतर तो शवविच्छेदनासाठी सेंट जॉर्ज रुग्णालयात पाठवला आहे. रुग्णालयातून शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर पुढील कारवाईबाबत निर्णय घेता येईल, असे पोलिसांनी सांगितले.

सुनील पाचार ३ फेब्रुवारी २०२५ पासून मालवाहक जहाजावरुन बेपत्ता होता. त्याची सगळीकडे शोधाशोध करण्यात आली मात्र तो सापडला नाही. त्यानंतर ४ फेब्रुवारी २०२५ रोजी यलो गेट पोलीस ठाण्यात सुनील हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली. यानंतर ५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी दीडच्या सुमारास ससून डॉकजवळ समुद्रात सुनीलचा मृतदेह आढळला.

छावा चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी विकी कौशलने घेतले घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचं दर्शन

छ. संभाजीनगर : अभिनेता विकी कौशलचा 'छावा' चित्रपट गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र चर्चेत आहे.छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमावर आधारित हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे प्रेक्षक देखील उत्सुक झाले आहेत. अशातच चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी अभिनेता महादेवाच्या भक्तीत तल्लीन झाल्याचा पाहायला मिळतोय. छावा सिनेमाच्या प्रमोशनसाठी सध्या विकी कौशल संभाजीनगर येथे पोहोचला आहे.

या शुभकार्याची सुरुवात अभिनेत्याने घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेत केली आहे. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आला आहे. यावेळी विकी मंदिरात पूजा करण्यात मग्न असलेला दिसतो आहे.

सोशल मीडियावर विकी कौशलचे व्हायरल होणारे फोटो पाहून त्याच्या चाहत्यांनी त्याला आगामी सिनेमासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, येत्या १४ फेब्रुवारीला 'छावा' हा सिनेमा जगभरात प्रदर्शित केला जाणार आहे. लक्ष्मण उतेकर यांनी चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. त्यामुळे सिनेरसिकांची उत्सुकता देखीस शिगेला पोहचली आहे.

अभिनेता विकी कौशलने या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली आहे. तर अभिनेत्री रश्मिका मंदाना संभाजी महाराजांची पत्नी महाराणी येसूबाईंच्या भूमिकेत दिसणार आहे.

मध्य प्रदेशमध्ये वायुदलाचे लढाऊ विमान कोसळले

शिवपुरी : मध्य प्रदेशमधील शिवपुरी शहराजवळ वायुदलाचे दोन आसनी मिराज २००० हे लढाऊ विमान कोसळले. या दुर्घटनेत जीवितहानी झालेली नाही.

प्रशिक्षणादरम्यान लढाऊ विमान कोसळले. या प्रकरणी वायुदलाने चौकशीचे आदेश दिले आहेत. वैमानिक आणि सहवैमानिक सुरक्षित आहेत. विमान जमिनीवर कोसळण्याच्या आधी दोघेही विमानातून बाहेर पडून पॅराशूटच्या मदतीने सुरक्षितरित्या जमिनीवर उतरले आहेत. विमान कोसळल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले, त्यांनी तातडीने आगीवर नियंत्रण मिळवले. कोसळलेल्या विमानाचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाले आहेत.

१०वी, १२ वी कॉपीमुक्त परीक्षा; मनाई आदेश, भरारी पथकांची नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर, दि.६ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता १० व व १२ वी च्या परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च याकालावधीत होणार आहेत. परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडाव्या यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी मनाई आदेश जारी केले असून भरारी पथकांच्या नियुक्तीचे आदेशही दिले आहेत.

परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्र परिसरात व त्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी परीक्षा केंद्र परिसराच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी मनाई आदेश जारी केले आहेत. त्यानुसार परीक्षा केंद्र व त्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात परीक्षार्थी, परीक्षेसाठी नेमलेले कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी वगळून अन्य कुणाही व्यक्तिस प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्र परिसरात पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तिंना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. १०० मीटर परिसरात झेरॉक्स दुकाने सुरु ठेवण्यास, सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी बुथ, आयएसडी बुथ, फॅक्स केंद्र, मोबाईल, वायरलेस सेट, ट्रान्झिस्टर, रेडीओ, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप इ. जवळ बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. हे आदेश दि.११ फेब्रुवारी ते दि.१८ मार्च या कालावधीत अंमलात राहतील असे कळविण्यात आले आहे.

भरारी पथके नियुक्त

या परीक्षा कालावधीत जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त वर्ग १ अधिकाऱ्यांची भरारी पथके नियुक्त करण्याचे आदेशही अपर जिल्हा दंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत. त्यानुसार प्रत्येक तालुक्यात तहसिलदारांच्या नेतृत्वात भरारी पथके नियुक्त करण्यात आले आहेत. एका पथका किमान चार सदस्य असतील व एक सदस्य महिला असेल. त्याच प्रमाणे प्रत्येक परीक्षा केंद्रावर एक बैठे पथकही नियुक्त असेल व त्यातही एक सदस्य महिला असेल. परीक्षा सुरळीत होण्याच्या दृष्टीने या पथकांनी कारवाई करावी,असे निर्देश देण्यात आले आहेत.

२० हून अधिक जिल्ह्यांमध्ये १००० जलस्रोतांचे संवर्धन

मुंबई : जल संसाधनांची सुरक्षा आणि ग्रामीण समुदायांची उन्नती करण्याप्रती आपली कटिबद्धता दृढ करत टाटा मोटर्सने महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केली. या करारांतर्गत राज्यातील पाणीटंचाई असलेल्या प्रांतांतील २० हून अधिक जिल्ह्यांमधील १००० जलस्रोतांचे संवर्धन करण्यात येईल. २०२४ मध्ये, टाटा मोटर्सने महाराष्ट्र सरकारचा जमीन व जल संवर्धन विभाग, नाम फाऊंडेशन आणि स्थानिक समुदायांसोबत सहयोगाने समुदाय-आधारित गाळ काढून टाकण्याचा उपक्रम 'गाळमुक्त धरण गाळमुक्त शिवार योजना'चा फायदा घेत महाराष्ट्रातील ३५६ जलस्रोतांचे संवर्धन केले.

क्रिकेट आयकॉन्स आणि सेलिब्रिटींसाठी हेअर ट्रान्सप्लांट

मुंबई - यूजेनिक्स हेयर साइंसेज ने आपल्या प्रतिष्ठित स्थानाची पक्की ग्वाही दिली आहे आणि हेअर रिस्टोरेशनच्या क्षेत्रात क्रिकेट दिग्गज, आंतरराष्ट्रीय क्रीडापटू आणि बॉलिवूड सेलिब्रिटी यांच्याकडून विश्वास मिळवला आहे. दिल्लीत, एनसीआर, मुंबई, हैदराबाद आणि भुवनेश्वरमधील अत्याधुनिक क्लिनिकसह, यूजेनिक्स हेअर ट्रान्सप्लांटच्या अत्याधुनिक उपायांसाठी एक विश्वासार्ह गंतव्यस्थान बनले आहे, जे वैज्ञानिक तज्ञतेला आणि कलात्मकतेला सामोरे जात आहे.दिग्गजांमध्ये सामील व्हा - क्रिकेटच्या एलीटचे विश्वासार्ह निवड क्रिकेट आयकॉन्स मोहम्मद शमी, रवी शास्त्री, मोहम्मद अझरुद्दिन आणि मायकेल बेव्हन यांनी यूजेनिक्स मध्ये विश्वास ठेवला आहे आणि त्याच्या अत्याधुनिक हेअर ट्रान्सप्लांट तंत्रज्ञानाने त्यांना अनुभवाचे परिवर्तन केले आहे. नैसर्गिक, अपारदर्शक आणि दीर्घकाळ टिकणारे परिणाम देण्यासाठी प्रसिद्ध असलेले यूजेनिक्स आता क्रिकेट आणि इतर क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींची अविवादित निवड बनले आहे.

व्हिज्युअल सोल्यूशन्स मार्केटमध्ये क्रांती

मुंबई - भारताच्या डिस्प्ले तंत्रज्ञानाच्या व्यवसायाला आकार देण्यासाठी एका परिवर्तनकारी पाऊल उचलत, शार्प बिझनेस सिस्टम्स (इंडिया) ने अभिमानाने एनईसी इंडियाच्या डिस्प्ले बिझनेसच्या अधिग्रहणाची घोषणा केली. हे एकत्रीकरण शार्पच्या व्हिज्युअल सोल्यूशन्स पोर्टफोलिओला लक्षणीयरीत्या विस्तृत करते, भारताच्या वेगाने विस्तारणाऱ्या डिस्प्ले मार्केट आणि रिटेल, शिक्षण, विमान वाहतूक, उत्पादन, आरोग्यसेवा आणि स्मार्ट शहरे यासारख्या प्रमुख क्षेत्रांना सक्षम बनवण्याच्या त्याच्या अटल वचनबद्धतेवर भर देते. हे धोरणात्मक युती शार्पला नावीन्यपूर्णतेच्या आघाडीवर ठेवते, जे भारताच्या गतिमान क्षेत्रांमध्ये अतुलनीय मूल्य प्रदान करण्यास आणि डिजिटल परिवर्तन चालविण्यास तयार आहे. एनईसी डिस्प्ले बिझनेसशी एकात्मता साधून, शार्प बी२बीआणि विशिष्ट बाजारपेठे दोन्ही प्रभावीपणे सेवा देण्यासाठी सुसज्ज आहे, भारतीय ग्राहकांना बेस्पोक सोल्यूशन्स, उत्कृष्ट ग्राहक समर्थन आणि डिस्प्ले तंत्रज्ञानाची व्यापक श्रेणी प्रदान करते. उत्पादन, नियंत्रण केंद्रे आणि विमानतळ यासारख्या २४/७ ऑपरेशन्स महत्त्वपूर्ण असलेल्या उद्योगांना समर्थन देण्यासाठी वचनबद्ध, हे विलीनीकरण शार्पला भारताच्या डिजिटल प्रगतीमध्ये त्याचे नेतृत्व मजबूत करणाऱ्या नवीन क्षेत्रांमध्ये नवीन वाढीच्या संधी अनलॉक करण्यासाठी त्याच्या भागीदार परिसंस्थेचा आणखी विस्तार करण्यास अनुमती देते.

होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडियाकडून रस्तासुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन

चिपळूण : रस्ता सुरक्षेप्रती अविरत कटिबद्धता दाखवत होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया (एचएमएसआय)ने आज चिपळूण, महाराष्ट्रयेथे रस्ता सुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन केले. या उपक्रमानेडीबीजे कॉलेज आणि मेरी माता स्कूलमधील २७०० हून अधिक विद्यार्थी व कर्मचारीवर्गामध्ये जनजागृती केली, ज्यामधून तरूणांना रस्त्यावर जबाबदारीने वागण्याबाबत प्रेरित करण्याप्रती एचएमएसआयची समर्पितता अधिक दृढ झाली.

सुरक्षित वाहतूक वातावरणाला आकार देण्यामध्ये तरूण बजावणाऱ्या महत्त्वपूर्ण भूमिकेला ओळखत एचएमएसआयने सर्वसमावेशक व परस्परसंवादात्मक प्रोग्राम्सच्या माध्यमातून रस्त्यावर सुरक्षितता बाळगण्याची सवय बिंबवण्यासाठी मोहिमेची रचना केली. शाळा, महाविद्यालये आणि सरकारी व गैर-सरकारी संस्थांमध्ये असे उपक्रम नियमितपणे राबवत एचएमएसआय रस्त्यावरील अपघात मोठ्या प्रमाणात कमी करण्याचा आणि रस्त्यावर जबाबदारीने वागण्याच्या संस्कृतीला चालना देण्याचा प्रयत्न करते. या मोहिमा रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी गरजेची पूर्तता करतात आणि विशेषत: तरूण राइडर्समध्ये जबाबदार ड्रायव्हिंग सवयी बिंबवण्याचा प्रयत्न करतात.

खाकी लव्हर

उठ माझ्या जिवलग दोस्ता
धर वर्दी मिळण्याचा रस्ता
यार हरला म्हणून खचू नकोस
भित्र्यासारखा रडत बसू नकोस
सोपा नको समजू वर्दीचा रस्ता
उठ माझ्या जिवलग.....

आता घे वर्दीचा ध्यास
धर अभ्यासाची कास
अर बनव की स्वतःचा रस्ता
उठ माझ्या जिवलग.....

गाळ घाम,आटव रक्त
तुझ्यामागे मायबाप फक्त
किती देणार त्यांच्या जीवाला खस्ता
उठ माझ्या जिवलग.....

सांग तुझ्या जिवलगाना यंदा नाही भेटणार
पण मायची आन यंदा वर्दी नक्की शिवणार
आपलेच जिवलग ते समजून घेतील ना दोस्ता
उठ माझ्या जिवलग.....

आता कर जीवाचं रान
बदल आयुष्याचं पान
तुला खाकी वर्दीची आन
आर काय की जीवाला खस्ता
उठ माझ्या जिवलग.....

----केशवपुत्र

३६ व्या हिअरिंग केअर क्लिनिकचे उद्घाटन

पुणे - इअर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडने पुण्यातील हिंजवडी येथे त्यांचे नवीन क्लिनिक उघडले आहे. हे कंपनीचे ३६ वे क्लिनिक आहे, जे सर्व्हे क्रमांक १४२/१, एएच कॅपिटल बिल्डिंग, फेज-१ रोड, एसबीआय बँकेसमोर आहे. या नवीन केंद्राद्वारे, कंपनी पुण्यातील लोकांना चांगल्या श्रवण सुविधा प्रदान करण्याचा प्रयत्न करत आहे. उद्घाटन कार्यक्रमाला अनेक आरोग्य तज्ञ, कानाचे डॉक्टर आणि स्थानिक लोक उपस्थित होते. या सत्रादरम्यान, श्रवणविषयक समस्या आणि त्यावरील उपायांवर चर्चा करण्यात आली. श्रवणशक्ती कमी झाल्यामुळे दैनंदिन जीवन आणि संभाषणावर परिणाम होतो, परंतु बरेच लोक त्याकडे दुर्लक्ष करतात. इअर सोल्युशन्सचे उद्दिष्ट याबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि लोकांना योग्य उपचार प्रदान करणे आहे.

ईयर सॉल्यूशंस गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ श्रवण सेवा प्रदान करत आहे. कंपनी उच्च दर्जाचे श्रवणयंत्र आणि वैयक्तिक काळजी प्रदान करते.

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,अहिल्यानगर

(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक) (अवसायनांतर्गत) - बँक रोड,पोस्ट बॉक्स नंबर-७, अहिल्यानगर-४१४००१
Email - recovery@nucb.in Website-www.nucb.in, Ph-0241-2343641/42,Fax No.2346951

ताबा नोटीस
रुल८(१) नुसार

ज्या अर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक लि., अहिल्यानगर (मल्टि- स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अंसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (अँक्ट) २००२ (५४ Of २००२) अन्वये त्यांना सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ३ वाचता प्राप्त अधिकाराचा वापर करुन सिक्युरिटी इंटरेस्टच्या (एन्फोर्समेंट) नियम २००२ नुसार मागणी नोटीस पाठवून सूचना केली होती. थकबाकी मागणी नोटीस दिल्याचे तारखेपासून ६० दिवसांच्या आत त्यावरील व्याज व इतर कायदेशीर खर्चासह भरण्यास सांगितले होते. कर्जदार हे खालील रक्कम परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने कर्जदार व त्यांचे जामीनदार आणि तमाम जनतेला सदरच्या नोटिसेद्वारे सूचित करण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन कायदा कलम १३ (४) नियम ८ प्राप्त अधिकारानुसार खालील सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खालील नमूद तारखेनुसार मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. कर्जदार, जामीनदार व अन्य आणि सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक लि., अहिल्यानगर (मल्टि- स्टेट शेड्युल्ड बँक) यांचा बोजा राहिल. सुरक्षित मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कायदयाच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

कर्जदार/सह कर्जदार/ जामीनदार यांचे नाव व शाखा	मालमत्तेचे विवरण चतु:सिमेसह	मागणी सूचनेत निर्देशित केलेली रक्कम व दिनांक
शाखा - जालना शाखा कर्जदार- मे.गणेश प्रोव्हिजन प्रोप्रा.- श्री. सुरेश रामेश्वर शर्मा जामिनदार- १) श्री. निलेश राजेंद्रकुमार शर्मा २) श्री. दत्तप्रसाद रामेश्वर भुतडा	अ) कर्जदार श्री.सुरेश रामेश्वर शर्मा यांचे नावावरील मिळकतचे वर्णन:- डिस्ट्रीक्ट जालना सब डिस्ट्रीक्ट ता. जालना पैकी मौजे श्रीकृष्णनगर येथील जिल्हा परिषद हद्दीतील ग्रामपंचायत श्रीकृष्णनगर येथील गट नं. ९३ (याचा जुना गट नं. २०७,२०८ व २०९ पैकी) यातील प्लॉट नं. २८९ याचे क्षेत्रफळ ८४.०० चौ.मी. ही संपूर्ण मिळकत चतु:सीमा खालील प्रमाणे :- पूर्वेस:- प्लॉट नं. ३१८ पश्चिमेस:- ६ मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस:-प्लॉट नं. २९० उत्तरेस :- प्लॉट नं. २८८	मागणी सुचना दि.: २८/११/२०१८ नजरगहाण कर्जाची दि.: ३१/१०/२०२१८ ची येणेबाकी रक्कम रु. ५,७०,२८५/- (अक्षरी रु. पाच लाख सत्तर हजार दोनशे पंच्याऐंशी फक्त) + दि. ०१/११/२०१८ पासून त्यावरील होणारे व्याज आणि त्यावरील खर्च प्रत्यक्ष ताबा दि.: ३१/०१/२०२५

ठिकाण- जालना
दिनांक- ३१/०१/२०२५

प्राधिकृत अधिकारी
नगर अर्बन को. ऑप.बँक लि.(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक) केंद्रशासनाधिन अवसायानाअंतर्गत, अहिल्यानगर

ARL

जाहिर प्रगटनास आक्षेप

(मौजे एकलहेरा ता. गंगापूर येथील गट नं. ४४ मधील दिगंबर आसाराम गांगर्डे यांच्या नावावरील १ हे. ६२ आर)

माझे पक्षकार मयुरी उमाकांत गांगर्डे यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,

असे की, माझे पक्षकार मयुरी उमाकांत गांगर्डे यांनी उमाकांत गांगर्डे तसेच दिगंबर आसाराम गांगर्डे व इतर यांचे विरूद्ध मा. दिवाणी व फौजदारी गंगापूर येथे पि.डब्लयु.डि.व्ही.ए.नं. ६२/२०२३ (मयुरी विरूद्ध उमाकांत व इतर) हा दाखल केला असून सदर प्रकरण हे आजही मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणात मौजे एकलहेरा येथील गट नं ४४ मधील दिगंबर गांगर्डे यांच्या नावावरील १ हे. ६२ आर जमीन ही जप्ती योग्य संपत्तीच्या यादीत समाविष्ठ आहे व सदर मिळकतीशी माझे पक्षकार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार गुंतलेले असल्याने तसेच संबंधीत खटला प्रलंबीत असतांना त्रयस्त व्यक्ति हक्कसंबंध निर्माण होणे बेकायदेशीर आहे. सदर जमीनीबाबतच्या कुठल्याही प्रकारच्या खरेदी-विक्री व इतर मागनि हस्तांतरणास माझे पक्षकार यांचा तिव्र विरोध आहे. तसेच जमीन घेणान्याविरुद्ध योग्य त्या न्यायालयात योग्य ती दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करणार आहेत. त्यामूळे सदर जाहिर प्रगटनाद्वारे तमान जनतेस कळविण्यात येते की, मौजे एकलहेरा येथील गट नं. ४४ मधील दिगंबर आसाराम गांगर्डे यांच्या नावावरील १ हे. ६२ आर जमीनीबाबत कोणीही कुठल्याही प्रकारचा खरेदी विक्री व्यवहार करू नये व केल्यास सदर व्यवहार हा बेकादेशीर राहील व माझे पक्षकार यांच्यावर तो बंधनकारक राहणार नाही. करिता हे जाहिर प्रगटन.

जाहिर प्रगटन देप्पार तर्फे
ॲड. दत्ता एकनाथराव पानकड़े
मो.नं. ९५९५६६६६२२०

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

सिव्हिल एम.ए. क्र.१०१ /२०२५ पुढील तारीख २१/०३/२०२५

अर्जदार : १) रेखा भ्र. गजानन तांबेकर, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम रा रांजणगाव शे.पुं. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) वैभव पि. गजानन तांबेकर वय २० वर्षे, धंदा शिक्षण रा रांजणगाव शे.पुं. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) दिपाली भ्र. निवृत्ती लहाने, वय २५ वर्षे, धंदा घरकाम रा. हिवरावळी ता. जाफ्राबाद जि. जालना ४) कोमल पि. गजानन तांबेकर वय १९ वर्षे धंदा शिक्षण रा रांजणगाव शे.पुं. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) राधाबाई भुलाजी तांबेकर, वय ७५ वर्षे, धंदा निरंक रा. वरील प्रमाणे,

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ५ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. अमोल पी. ठाकुर यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची जनकमाता आहे व अर्जदार क्र.५ ही अर्जदार क्र.१ ची सासु असुन अर्जदार क्र२ ते ४ यांची आजी आहे. अर्जदार क्र.१ चे पति, अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र.५ चा मुलगा नामे गजानन भुलाजी तांबेकर हे मुळचे सावखेड नागरे ता. जाफ्राबाद जि. जालना येथील रहिवाशी होते ते नौकरीच्या कामानिमीत्त रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथे राहण्यास आले होते व ते दिनांक १०/०३/२०१९ रोजी मौजे रांजणगाव शे.पु. ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे, मयत गजानन भुलाजी तांवेकर यांचा अंत्यविधी हा त्यांचे मुळ गावी केला असल्याने त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र हे त्यांचे मुळ गावचे आहे. मयत गजानन भुलाजी तांबेकर यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०६/०२/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर

O.w NO.993/25
Public Trusts Registration Office, Aurangabad
Address: Public Trust Registration Office, Aurangabad, Near Baba Petrol Pump, Adalat Road, Aurangabad Aurangabad, Aurangabad, Aurangabad
Date : 05/02/2025

Public Notice

Service Request Number: ARN/00220/18/25
Inquiry/case No.:.....
Name of the Trust: SANT TUKARAM MAHARAJ CHARITABLE TRUST BAJAJNAGAR CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
Address of the Trust: PLOT NO RX 5/12 PANDURANG HOUSING GROUP, MIDC WALUJ, BAJAJNAGAR Chhatrapati Sambhajinagar, Aurangabad, Aurangabad
Registration Number of the Trust (if): SANT TUKARAM MAHARAJ CHARITABLE TRUST BAJAJNAGAR CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
Name of the Applicant: SUREKHA SUNIL SHINDE
To
All Concerned having interest

Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Greater Mumbai Region.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

Movable Property

SR	Property Details	Estimated Value
1.	1. Cash In Hand in possession of president	9000.00

Value of Movable Property : Rs. 9000/- Only
(In Words Rs. Twenty Thousand Only)
Immovable Property

SRNO	Town Or Village	CS Or Municipal Area	Assessment Or	Tenure Or Nature	Estimated Value
		Or Survey No	Judiciary		

Value of Immovable Property: Rs. 00/- Only (In Words Rs. Only

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days. from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be. completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 04/02/2025.

Superintendent
Public Trusts registration Office, Aurangabad

जावक क्रमांक/८२२/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक
न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,
बाबा पेट्रोल पंपाजवळ,, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर,
औरंगाबाद, औरंगाबाद
दि. २८/०१/२०२५

चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन. क्रमांक: ARN/35321/18/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक :

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक साई गणेश चॅरिटेबल ट्रस्ट वडगाव कोल्हाटी छत्रपती संभाजीनगर बाबत ।

न्यासाचा पत्ता :- आर एच नं ४ गट नं ०९, गणपती मंदिरच्या समोर,, आनंद नगर,, वडगाव कोल्हाटी, छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद, वडगाव खु.

अर्जदार : ज्योती मारोती कांबळे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

अ.क्र.	तपशील	अंदाजे मूल्य
१	Cash In Hand in possession of president	9000.00

(अ) जंगम मिळकतः रोख रु. ९०००/- मात्र
(अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्ण)

अ.क्र.	शहर किंवा गांव	सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.	क्षेत्र	मूल्याकन	मुदत / कालावधी किंवा स्वरूप	अंदाजे मूल्य
१.	NILL	0	0	0	0	0

(ब) स्थावर मिळकत रोख रु. ००/- मात्र - (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २७-०१-२०२५ रोजी दिली.

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

जाहीर प्रगटन

मा.ए.के. दामटे साहेब, दिवाणी न्यायाचाहिर प्रमुख, क. स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात

एम.ए.क.६९/२०२५
CNR-MHAU080002392025

अर्जदार : १. कलाबाई फकिरचंद बेडवाळ वय ६० वर्ष, व्यवसाय घरकाम रा.तळणी ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर २. अलका संजय सिहरे वय ४२ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. कवलाची वाडी ता. फुलंब्री जि.छ. संभाजीनगर ३. गलकाबाई ईश्वर महेर वय ३८ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. गणेशपुर जामडी (जा) ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर ४. मालताबाई गजानन गोमलाडू वय ३६ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. भिवदरी ता. पिशोर जि.छ. संभाजीनगर ५. प्रेमचंद फकीरचंद बेडवाळ वय ३४ वर्ष, व्यवसाय मजुरी रा.तळणी ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर ६. लताबाई चरनसिंग काकस वय ३२ वर्ष, व्यवसाय घरकाम रा.आजमपुर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर ७. कविता अनिलकुमार गोठवाळ वय ३१ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. चारनेरवाडी ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय छ. संभाजीनगर

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड.एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे फकिरचंद आसाराम बेडवाळ हे मौजे तळणी ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी होते. त्यांचा दि.०४.०५.२०२४ रोजी मौजे तळणी ता.सिल्लोड येथे मृत्यू झाला आहे. मयतास अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क.२ ते ४ व ६ व ह्या मुली आहे. तसेच अर्जदार क. ५ हा मुलगा आहे. अर्जदारां व्यतिरिक्त मयत फकिरचंद आसाराम बेडवाळ यांना इतर कुणीही कायदेशीर वारस नाही. मयताची आई नामे विरदावाई आसाराम बेडवाल दि.०७.१०.२००७ रोजी मयत झालेले आहे. मयत नामे फकिरचंद आसाराम बेडवाळ यांच्या वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व महसुल कामासाठी आवश्यकता आहे. अर्जदार क.१ व ९ हेच त्यांचे एकमेव वारसदार आहे. त्यामुळे मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारण घडले आहे.

ज्याअर्थी अर्जदार हे मयत नामे फकिरचंद आसाराम बेडवाळ यांचे अर्जदार वारस नाही असे समजाविण्याचे असतील व वारस प्रमापतत्र देण्या बाबत आक्षेप, उजर, हरकत असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत उजर, आक्षेप, हरकत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर होवून सादर कराव्यात. जर मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न नोंदविल्यास अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दि.०४/०२/२०२५ रोजी माइकी सही शिक्याद्विशी दिले. पुढील तारीख ०४/०३/२०२५

आदेशावरुन
विभागीय लिपिक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय सिल्लोड

जाहीर प्रगटन

मा. ए.के. दामटे साहेब, दिवाणी न्यायाधीश साहेब, क.स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात

एम.ए.क.९३/२०२५
CNR-MHAU080003082025

अर्जदार : १. शेख आलमनूर अब्दुल कादर वय ५६ वर्ष, व्यवसाय शेती रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर २. महमदनूर अ. कादर शेख वय ५६ वर्ष, व्यवसाय व रा. वरील प्रमाणे ३. शेख साहेब नूर कादर वय ४८ वर्ष,व्यवसाय व रा. वरील प्रमाणे ४. शेख नुसरत कादर वय ४४ वर्ष, व्यवसाय व रा. वरील प्रमाणे ५. वाहेबनुर अ. कादर शेख वय ४७ वर्ष, व्यवसाय व रा. वरील प्रमाणे ६. शबाना बेगम शेख शफिक वय ४२ वर्ष, व्यवसाय घरकाम रा.धोबी गल्ली, सिल्लोड ता.सिल्लोड जि.छ. संभाजीनगर ७. जरीना बेगम शेख शौकत वय ४८ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. बुध्द वाडा, सिल्लोड ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय छ. संभाजीनगर.

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड.एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे अ. कादर अ.इब्राहिम शेख हे मौजे घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी होते. त्यांचा दि.०५.१२.२०१० रोजी मौजे घाटनांद्रा ता.सिल्लोड येथे मृत्यू झाला आहे. तसेच मयताची पत्नी नामे ताहेरबी अब्दुल कादर शेख याचा दि.३१.१२.१९९७ रोजी मृत्यू झालेला आहे. तसेच मयताची मुलगी मयत नामे रुबिना कादर शेख हिचा दि.२०.११.२०२२ रोजी मृत्यू झालेला आहे. मयताची मयत मुलगी ही अविवाहित होती. मयताचे अर्जदार क.१ ते ५ मुले असून अर्जदार क. ६ ते ७ ह्या मुली आहेत. अर्जदार व्यतिरिक्त मयत अ. कादर अ. इब्राहिम शेखयांना इतर कुणीही कायदेशीर वारस नाही. मयत नामे अ. कादर अ. इब्राहिम शेख यांच्या वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व महसुल कामासाठी आवश्यकता आहे. अर्जदार क.१ ते ७ हेच त्यांचे एकमेव वारसदार आहे. त्यामुळे मा.न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारण घडले आहे.

ज्याअर्थी अर्जदार हे मयत नामे अ. कादर अ. इब्राहिम शेख यांचे अर्जदार वारस नाही असे समजाविण्याचे असतील व वारस प्रमापतत्र देण्या बाबत आक्षेप, उजर, हरकत असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत उजर, आक्षेप, हरकत या न्यायालयात लेखो पुराव्यासह हजर होवून सादर कराव्यात. जर मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न नोंदविल्यास अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०४/०२/२०२५ रोजी माड्करीही कियानिशी दिले. पुढील तारीख विभागीय लिपिक १०/०३/२०२५

आदेशावरुन
विभागीय लिपिक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय सिल्लोड

जाहीर प्रगटन

मा. ए. बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधीश साहेब, क. स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात

एम.ए.क.९१/२०२५
CNR-MHAU080003062025

अर्जदार : १. लक्ष्मीबाई माणिकराव जाधव वय ८५ वर्ष, व्यवसाय निरंक रा.माडगाव ता.सिल्लोड जि.छ. संभाजीनगर २.रावसाहेब माणिकराव जाधव वय ५४ वर्ष, व्यवसाय शेती रा. वरील प्रमाणे ३. लक्ष्मण माणिकराव जाधव वय ४९ वर्ष, व्यवसाय शेती रा. वरील प्रमाणे ४. अनुसयाबाई साहेबराव सुलताने वय ६० वर्ष, व्यवसाय घरकाम रा.लोनवाडी ता.सिल्लोड जि.छ. संभाजीनगर ५. वत्सलाबाई प्रभाकर बडक वय ५९ वर्ष, व्यवसाय घरकाम रा.पळशी ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय छ. संभाजीनगर

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड.एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे माणिकराव विठोबा जाधव हे मौजे माडगाव ता. सिल्लोड येथील रहिवासी होते त्यांचा दि.२१.०७.२०२४ रोजी निधन झालेले आहे. मयताची अर्जदार क.१ ही पत्नी असून

टीजेएसबी बँकेचा वर्धापनदिन उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर – छत्रपती संभाजीनगरच्या गुरु गोविंदसिंग चौकाजवळील टीजेएसबी बँकेचा ५४ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.शालिवाहन नागरी सहकारी पतसंस्था पैठणचे चेअरमन किशोर चव्हाण , मयांक इंडस्ट्रीचचे आशिष ढाले व ज्योतिबा टेक्नॉलॉजीचे संचालक सुधीर सुर्वे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले.याउद्गाटन प्रसंगी ढगडइ बँकेचे क्लस्टर हेड हेमंत पाडाळकर , ऍडिशनल ब्रांचमॅनेजर विवेक बकरे असिस्टंट ब्रांच मॅनेजर प्रशांत खिस्ती यांची प्रमुख उपस्थिती होती.आलेल्या सर्व निमंत्रितांना बॅकेंच्या ग्राहकांना अल्पोपहार.. चहा कॉफी देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

टीजेएसबी बँकेच्या वर्धापन दिनाच्या स्वागतासाठी रांगोळी कलावंत सुधीर कोर्टीकर यांनी सजवलेल्या फुलांच्या व रंगाच्या रांगोळ्या साऱ्या निमंत्रितांचे मनं सुखावून गेल्या.

श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल वेरूळ येथे क्रीडा भारती देवगिरी प्रांतच्या संयुक्त विद्यमाने सूर्यनमस्काराच्या प्रात्यक्षिकाचे आयोजन

बिडकीन दि ६ फेब्रुवारी : छत्रपती संभाजीनगर येथील श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल वेरूळ येथे क्रिडा भारती देवगिरी प्रांत मातृशक्ती यांच्या संयुक्त विद्यमानाने गुरुकुलातील सर्व विद्यार्थ्यांना रथसप्तमी निमित्त सूर्यनमस्कार प्रात्यक्षिक घेऊन सूर्यनमस्काराचे महत्त्व सांगण्यात आले. तसेचक्रिडा भारती देवगिरी प्रांत सहमंत्री प्राध्यापिका डॉ मीनाक्षी मूलिया यांनी सर्व विद्यार्थीयांना सूर्यनमस्काराचे महत्त्व व शरीर संवर्धनसाठी शारीरिक व मानसिक सुदृढतेसाठी सूर्यनमस्कार महत्त्वाचे आहे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.योग शिक्षिका व जलतरणाचे प्रशिक्षक पद्मावती धारवाडकर क्रीडा भारती मातृशक्ती प्रमुख यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून दाखविले व विद्यार्थ्यांकडून करून घेतले. या कार्यक्रमासाठी ४५० विद्यार्थी उपस्थित होते तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर व क्रीडा भारतीचे पदाधिकारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष श्री.जगद्गुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज तसेच संस्थेचे सचिव १०८वे सचिव महंत सेवागिरी जी महाराज, विद्यालयाचे मुख्याध्यापक वी,यु, बोरसे, क्रीडा शिक्षक पी डी सूर्यवंशी ज्येष्ठ शिक्षक,पर्यवेक्षक विकी आदाने, वस्तीग्रह अध्यक्ष सौरभ खैरे,जारवाल गुरुजी,बागडे गुरुजी सर्व विद्यार्थी आदींची उपस्थिती होती.

गंगापूर वकील संघाकडून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

गंगापूर दि.६: गंगापूर वकील संघ आयोजीत क्रिकेट स्पर्धा २०२४-२०२५ मध्ये एकुण ४ संघाने सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचा अंतीम सामना दि.२६/०१/२०२५ रोजी लॉयर ११ व सुपर ११ संघामध्ये झाला. अंतीम सामन्यात लॉयर ११ संघ विजय झाला. लॉयर ११ संघाचे अंतीम सामन्यात सामनावीर अड. वाय. एन. जाधव व लॉयर ११ संघाचे अड.एस. बी. शेख हे मालीकावीर ठरले. तसेच सुपर ११ संघाचे अड. टी.व्ही. कोल्हे हे उत्कृष्ठ गोंलदाज तसेच अड. अनिल इंगळे हे उत्कृष्ठ फलंदाज ठरले. स्पर्धेचे आयोजन वकील संघाचे अध्यक्ष अँड. के. आर.कर्हाळे यांनी केले, तसेच स्पर्धेचे बक्षीस वितरण मा. न्यायधिश ए.बी. इंगोले साहेब यांच्या हस्ते देण्यात आले.

मेन रोड बसस्थानकाजवळ मुतारी नसल्याने कुचंबणा

पैठण दि ०६ :- पर्यटननगरी पैठण बसस्थानकासमोर मेन रोडवरील महत्वाची बाजारपेठेत पुरुषांसाठी लघुशंकेसाठीच मुतारी बंद असल्याने याठिकाणी नागरिकांची कुचंबणा होत असून शहरात नाविण्याने निर्माण होणाऱ्या ई टॉयलेट या परिसरात व्हावे अशी नागरिकांची मागणी आहे.

बसस्थानक समोर मोठी बाजारपेठ असून याठिकाणी नेहमी नागरिकांची वर्दळ असते. परिसरात नपच्या वतीने खूप वर्षांपासून शॉपिंक सेंटर मध्ये मुतारीचे निर्माण करण्यात आले होते. परंतु काही महिन्यांपूर्वी याठिकाणी ड्रेनेज बिघडल्याने घाण पाणी नागरिकांच्या दुकानात शिरत होते तसेच परिसरात मोठया प्रमाणात दुर्गंधी पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते म्हणून नागरिकांनीच ती मुतारी बंद केली आहे. परंतु आता लघुशंकेसाठी जागाच नसल्याने परिसरात नपच्या वतीने पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र ई टॉयलेट निर्माण करावे अशी मागणी होत आहे.

वेरूळ येथे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण सत्कार

खुलताबाद प्रतिनिधी .वेरूळ येथे भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी वेरूळ येथील श्री बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर महादेवास पूजा अभिषेक केला व खुलताबाद येथील भद्रा मारुती येथे महा अभिषेक पूजन करून मनोभावाने दर्शन घेतले यावेळी भाजपचे प्रदेश सरचिटणीस .संजय केणेकर जिल्हा अध्यक्ष संजय खंबायाते तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे गंगापूर तालुका विस्तारक गणेश हजारी , यांनी घृष्णेश्वर मंदिर येथे भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष माजी, मंत्री रवींद्र चव्हाण यांना घृष्णेश्वराची फोटो फ्रेम भेट देऊन वेरूळ भाजपा च्या वतीने सत्कार करण्यात आला. माजी, जी प उपाध्यक्ष एल जी गायकवाड तालुका सरचिटणीस सतीश दांडेकर. खुलताबाद शहराध्यक्ष परसराम बारगळ ज्ञानेश्वर बारगळ , संदीप आवताडे

.सोन सोनवणे .भाजपा ज्येष्ठ नेते प्रभाकर थोरात .सुखदेव पाटील ठेंगडे .शशांक टोपरे सागर मातकर व इतर भाजप कार्यकर्ते उपस्थित होते

अभिनेता विकी कौशल'चे एमजीएममध्ये जल्लोषात स्वागत

छत्रपती संभाजीनगर, दि.६ : प्रसिद्ध अभिनेता विकी कौशल याचे महात्मा गांधी मिशन विद्यापीठात उत्साहपूर्ण वातावरणात जल्लोषात स्वागत करण्यात आले. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'छावा' हा चित्रपट १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात संभाजी महाराजांची भूमिका अभिनेता विकी कौशल याने साकारली आहे. या चित्रपटाचे प्रमोशन करणे आणि एमजीएम विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी आज विकी कौशल एमजीएम विद्यापीठात आला होता. रुक्मिणी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्याने विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम,कुलगुरू डॉ. विलास सपकाळ,एमजीएम परिवारातील सर्व सदस्य, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना विकी कौशल म्हणाला, मी पहिल्यांदा छत्रपती संभाजीनगर येथे आलो आहे. मी मुंबईचा मुलगा असून मला चांगली मराठी बोलता येते. आपण सर्वांनी चित्रपटाच्या ट्रेलर'ला खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत हे आतापर्यंतच्या सर्वाधिक पाहिलेल्या ट्रेलर पैकी एक ट्रेलर आहे. या चित्रपटास ए. आर. रहमान यांनी संगीत दिले आहे.

आज आपल्या सर्वांना भेटून मला मनापासून आनंद झाला आहे. अशा प्रकारचा उत्साह मला इतर कुठेही पाहायला मिळाला नाही. आपण सर्वांनी येत्या १४ तारखेला चित्रपट गृहात जाऊन छावा हा चित्रपट पहावा, अशी विनंती करतो असे यावेळी अभिनेता विकी कौशल म्हणाला.

अनोख्या पद्धतीने महिलांनी केली संक्रांत साजरी

वैशाली नरेंद्र देशमुख यांनी वान टाळून वाढविला संक्रांतीचा मान !

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी .नवीन वर्षातील पहिला सण मकर संक्रांतीचा हा सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. महिला मकर संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत घरोघरी हळदी कुंकूवाचा समारंभाचे आयोजन करतात. हा हळदी कुंकूवाचा सोहळा रथसप्तमी म्हणजे ४ फेब्रुवारीपर्यंत चालतो या दरम्यान परंपरे नुसार स्त्रिया एकमेकींना भेट वस्तू देतात त्यास वाण असे म्हणतात नेमका हाच खर्च टाळून त्याचा सदुपयोग

समाजसेवेत करता येईल का याचा विचार सौ.वैशाली नरेंद्र देशमुख यांना आला त्यांनी हा विचार आपल्या मैत्रिणींना बोलून दाखविला त्यांची ही कल्पना साधना कापडणीस यांना आवडली मग उभयतांना सुमित पंडीत व पूजा पंडीत चालवत असलेल्या बेवारसांन साठि च्या माणुसकी वृद्ध सेवालयाची ख्याती ऐकून होत्या,सेवेसाठी माणुसकी वृद्धसेवालय हे योग्य ठिकाण आहे,

याची जाणीव झाली त्यांनी वाणाचे पैसे वाचवून जमा झालेल्या रकमेतून वृद्ध सेवालयातील वृद्धा सेवा घडावी या सदहेतूने किराणा साहित्य माणुसकी वृद्ध सेवालयास भेट दिले व प्रत्येक संक्रातीला हा उपक्रम चालवण्याचा मानस व्यक्त केला,त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.यावेळी माणुसकी वृध्द सेवालयातील वृद्ध व नरेंद्र देशमुख शाखा अभियंता जी.प.प्रा.शरद सोनवणे, समाजसेवक सुमित पंडित,सौ वैशाली नरेंद्र देशमुख,सौ.साधना कापडणीस, समाजसेवीका पुजा पंडित आदि उपस्थित होते

अंगणवाडी सेविका यांना बालविकास प्रकल्प अंतर्गत मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ६ फेब्रुवारी : दि ४ फेब्रुवारी रोजी अंगणवाडी सेविका यांना, कौटुंबिक हिंसाचारापासु महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ते २००६ अन्वय प्रचार प्रसार प्रसिध्दी करण्यात आली,व महिला व बालकांना महिला बालविकास विभागाच्या विविध योजना राबविण्यात येतात यांची माहिती देण्यात आली बालसंगोपन योजना, पिंक ई रिक्षा,बाल संरक्षण

समिती स्थापन करणे, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महील चे लैंगिक शोषण या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

बाल विवाह,,या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात अंगणवाडी सेविका, बालविकास प्रकल्प अधिकारी पाटील मॅडम, बालविकास प्रकल्प अधिकारी,गहिवार, मॅडम,डोकलवार,सर,तवार,सर,व पि,डी,बमनाथ,तालुका संरक्षण अधिकारी महिला बालविकास विभाग,अभय केंद्र पैठण यांनी वरील योजनेची माहिती दिली.

प्रयागराज महाकुंभमेळ्यात निनादणार जनजाती संस्कृती रक्षणाचा शंखनाद

छत्रपती संभाजीनगर – प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात वनवासी कल्याण आश्रमाच्या वतीने ६ ते १० फेब्रुवारीपर्यंत भव्य जनजाती सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सत्संगात देशभरातील सुमारे २५ हजार जनजाती भाविक उपस्थित राहून आपल्या धर्म, संस्कृती व परंपरेच्या रक्षणाचा संकल्प करणार आहेत.

अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम देशभरातील १२ कोटी जनजाती समाजाच्या धर्म, संस्कृती व परंपरेच्या रक्षणासोबतच जनजाती क्षेत्रात विविध सेवाकार्य राबवत आहे. गेल्या काही वर्षांपासून देशभरात आयोजित विविध कुंभपर्वात जनजाती समाजाला एकत्र आणून आपल्या प्राचीन संस्कृतीचे विराट दर्शन घडविण्यासाठी कल्याण आश्रम निरंतर प्रयत्न करत आहे. नाशिक, उज्जैन, प्रयागराज अशा कुंभमेळ्यात आतापर्यंत जनजाती समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला आहे. प्रयागराजयेथे सुरू असलेल्याऐतिहासिक महाकुंभाच्यानिमित्ताने यंदाही जनजातीसत्संगाचे भव्य आयोजन कल्याणआश्रमाच्या वतीने करण्यातआले आहे. ता.६ फेब्रुवारीते १० फेब्रुवारीपर्यंतआयोजित विविध कार्यक्रमांमध्येदेशभरातील २५ हजारांहूनअधिक जनजाती समाज एकत्र येऊनस्वतःच्या धर्म,संस्कृतीव परंपरेच्या रक्षणाचा संकल्पकरेल.

यंदा ६ फेब्रुवारी रोजी युवा कुंभाचे आयोजन होणार आहे, हे या कुंभपर्वाचे वैशिष्ट्य आहे. यात देशभरातील १० हजार युवक सहभागी होऊन या विराट सांस्कृतिक महासागराचे दर्शन करतील. या कार्यक्रमात २० निवडक प्रतिभावंत युवकांचा सन्मानही केला जाणार आहे.

ता. ७ फेब्रुवारी रोजी भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यात देशभरातील आलेले जनजाती बंधु व भगिनी त्यांच्या पारंपरिक वेशभूषा आणि नृत्यासह कुंभस्नानाचे पुण्य प्राप्त करतील. या जनजाती सत्संगात देशभरातील विविध जनजातींची सुमारे १५० नृत्य पथके सहभागी होणार आहेत. ती त्यांच्या पारंपरिक नृत्य – संगीताचे सादरीकरण करून ' तू मी एक रक्त' या भावनेचा संदेश संपूर्ण जगाला देतील. हे सांस्कृतिक कार्यक्रम ७, ८ और ९ फेब्रुवारी रोजी जनजातीय नृत्य – संगीतासह होतील. चार वेगवेगळ्या मंचावर हे सांस्कृतिक प्रदर्शन होईल.

या सत्संगात १० फेब्रुवारी रोजी संत संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध प्रांतांतून आलेली जनजाती समाजातील संत मंडळी धर्म- संस्कृतीवरील त्यांचे विचार मांडतील. यात मुख्यतः महामंडलेश्वर यतींद्रानंद गिरि महाराज, स्वामी अवधेशानंद गिरी, आचार्य महामंडलेश्वर रघुनाथ महाराज (फरशीवाले बाबा) इत्यादी प्रमुख संत मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहतील.

हे वर्ष जनजाती अस्मितेचे नायक असलेले भगवान बिरसा मुंडा यांचे १५० जयंती वर्ष है। ऐतिहासिक महाकुंभाच्या पर्वात हे वर्ष आलेले असल्यामुळे एक उत्सव पर्व म्हणून हा कुंभ साजरा करण्याचा संकल्प घेऊन अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाशी संलग्न सेवा समर्पण संस्थानचे कार्यकर्ते या आयोजनाच्या यशासाठी अथक प्रयत्न करत आहेत.

'रा. स्व. संघ जनकल्याण समिती'तर्फे आरोग्यविषयक जागृती मोहीम

रविवारी 'सेवा भवन दौड़'

पुणे : 'सेवा भवन' या पुण्यातील रुग्णसेवा प्रकल्पातर्फे 'सेवा भवन दौड़' या मूत्रपिंडाच्या स्वास्थ्या विषयी जनजागृतीपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'सेवा भवन दौड़'चा प्रारंभ रविवारी, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता होईल. या उपक्रमापासून 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती'च्या आरोग्यविषयक जनजागृती मोहिमेचाही प्रारंभ होणार आहे.

'जनकल्याण समिती'तर्फे मंगळवारी आयोजित पत्रकार परिषदेत समितीचे कार्यवाह प्रमोद गोन्हे आणि 'सेवा भवन' प्रकल्पाचे कार्यवाह पलाश देवळणकर यांनी ही माहिती दिली. 'रन फॉर किडनी हेल्थ' हा विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी 'सेवा भवन दौड़'चे आयोजन करण्यात आले आहे. 'जनकल्याण समिती'तर्फे 'सेवा भवन' हा सेवा प्रकल्प चालवला जातो. या प्रकल्पाच्या वतीने 'सेवा भवन दौड़' होत असून कर्वेनगरमधील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेपासून त्याचा प्रारंभ होईल.

या 'दौड़'चे पाच किलोमीटर आणि दहा

किलोमीटर असे दोन टप्पे आहेत. या शिवाय 'चॅरिटी रन' हा उपक्रमही केला जाणार आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, लेखक, दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, संघाचे अ. भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर, प. महाराष्ट्र प्रांताचे कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत 'सेवा भवन दौड़'चा प्रारंभ होईल.

'जनकल्याण समिती'तर्फे आरोग्यविषयक जागृती मोहीम सुरू केली जात असून या मोहिमेचा प्रारंभ 'सेवा भवन दौड़' या उपक्रमापासून केला जाणार आहे. या मोहिमेत प्रामुख्याने तज्ज्ञ डॉक्टरांची आरोग्यविषयक व्याख्याने, विविध विषयांवर चर्चासत्र, आरोग्य शिबिरे, जिज्ञासूंचे शंका-समाधान, महिलांसाठी संवादसत्र, योग, स्वास्थ्य, जीवनशैली याबाबतचे मार्गदर्शन आदी कार्यक्रमांचे आयोजन 'जनकल्याण समिती'तर्फे 'सेवा भवन'मध्ये केले जाणार आहे.

'सेवा भवन' या प्रकल्पात अल्प दरात डायलिसिसची सुविधा आहे. पुण्यात उपचारांसाठी येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची निवास, भोजन आदी व्यवस्थाही अल्प शुल्कात केली जाते. याशिवाय निःशुल्क स्वास्थ सल्ला आणि समुपदेशन केंद्र चालवले जाते. किडनी आजारासंबंधीची जनजागृती आणि 'सेवा भवन' प्रकल्पाची माहिती समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी 'सेवा भवन दौड़' आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या उपक्रमामध्ये १८ वर्षांवरील महिला आणि पुरुषांना सहभागी होता येणार आहे. त्यासाठी नोंदणी आवश्यक असून ८२७५३९६३९७ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करता येईल.

अधिक माहितीसाठी संपर्क – पलाश देवळणकर ७७९८२३०४३८

संघ हीच जीवनगाथा

अलकः- (३३) **प्रार्थना**

रा.स्व.संघात आज संस्कृत प्रार्थना म्हणतात. या आधीची प्रार्थना मराठी व हिंदीत होती. ही संस्कृत प्रार्थना फेब्रुवारी १९३९ मध्ये नागपूर जवळील सिंदी येथील बैठकीत तयार केली. तेव्हा त्या बैठकीत स्वतः सरसंघचालक डॉक्टर हेडगेवारजी, श्री गोळवलकर गुरुजी, श्री बाबासाहेब आपटे, श्री बाळासाहेब देवरस, श्री अप्पाजी जोशी, श्री नानासाहेब टालाटुले आदि प्रमुखांचा सहभाग होता. श्री नरहरी नारायण भिडे यांनी संस्कृत मध्ये अनुवाद केला. व श्री यादवराव जोशींनी चाल लावली. नंतर १८ मे १९४० पासून नित्य प्रार्थना म्हणून अनिवार्य केली.

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम् ।
महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।।१।।

प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङ्गभूता इमे सादरं त्वां नमामो वयम् त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयं शुभामाशषं देहि तत्पूर्तये। अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिम् सुशीलं जगद् येन नम्र भवेत् श्रुतं चैव यत् कण्टकाकीर्णमार्गं स्वयं स्वीकृतं नः सुगङ्कारयेत् ।।२।।

समुत्कर्ष निःश्रेयसस्यैकमुग्रम् परं साधनं नाम वीरव्रतम् तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम् । विजेत्री च नः संहता कार्यशक्तिर् विधायास्य धर्मस्य संरक्षणम् परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्र समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ।।३।। ।। भारत माता की जय ।।

प्रार्थनेचा अर्थ माहित असावा; नुसती पोपटपंची नको. प्रार्थनेच्या आशयात समरस होऊन प्रार्थना म्हटली पाहिजे. मनुष्य जीवनात प्रार्थनेबरोबरच प्रतिज्ञापण महत्त्वाची असते. प्रतिज्ञा म्हणजे निर्धार व याच्या पूर्ततेसाठी परमेश्वराला जी विनंती करतो ती प्रार्थना. म्हणूनच प्रतिज्ञा आणि प्रार्थना यांची स्वयंसेवकांनी सांगड घालणे संघाला अपेक्षित आहे. म्हणून पुढील अलक मधून अर्थासहित प्रार्थना लिहीत आहे. व त्या पुढील अलक मध्ये भाष्य म्हणजेच आशय लिहीन. क्रमशः

अभिप्राय

आजचे मना सज्जना हे अलक वाचले. कम्युनिस्टांचां प्रताप वाचला. आपले सर्व अलक मी माझ्याकडे सेव करून ठेवले आहेत.

समर्पक लेखन. संघासंबंधीत अनेक गोष्टींची उकल होते आहे.

अभिनंदन आणि शुभेच्छा

अभिप्रायः- मुकुंद कानिटकर संभाजीनगर

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

अजमेर येथे NOIW ची १९ वी अखिल भारतीय त्रैवार्षिक परिषद

छत्रपती संभाजीनगर : नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ इन्शुरन्स वर्कर्स (NOIW), एक ट्रेड युनियन १९६९ पासून भारतीय आयुर्विमा महामंडळामध्ये कार्यरत आहे. त्यांची १९वी त्रैवार्षिक परिषद ९-१० फेब्रुवारी २०२५ रोजी अजमेर, (राजस्थान) येथे होणार आहे. देशभरातून सुमारे १२०० निवडक प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. परिषदेत विमा कर्मचाऱ्यांशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा केली जाईल, यासह: १. वर्ग III आणि वर्ग खत कर्मचाऱ्यांची तात्काळ भरती. २. विविध विषयांवर संस्थेसोबत माहितीची देवाणघेवाण बैठक. ३. तात्पुरत्या आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे शोषण ४. पेन्शनधारकांबाबत विविध समस्या. विमा क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूक (FDI) १००% पर्यंत वाढवण्याच्या केंद्र सरकारच्या विधेयकावरही या परिषदेत चर्चा होणार आहे आणि NOIW ची मते यात चर्चिले जाणार आहेत.या परिषदेसाठी 'सशक्त NOIW-समृद्ध LICA समर्थ भारत' असे घोष वाक्य निर्धारित केले आहे. संमेलनाचे ठिकाण : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, जे.एल.एन. मेडिकल कॉलेज, अजमेर. संमेलन यशस्वी करण्यासाठी अजमेर विभागाचे कार्यकर्ते अथक परिश्रम घेत आहेत. एक भव्य गेट मीटिंग होईल. १० फेब्रुवारी २०२५ रोजी अजमेर येथील एलआयसीच्या विभागीय कार्यालयासमोर आयोजित करण्यात आली आहे. आमच्या इन्शुरन्स वर्कर्स ऑर्गनायझेशन छत्रपती संभाजीनगरचे ३९ प्रतिनिधी परिषदेत उपस्थित राहणार आहेत अशी माहिती विभागीय संघटनेचे सरचिटणीस प्रफुल्ल कुलकर्णी यांनी दिली.

बिडकीन येथे अखंड हरिनाम सप्ताह, भावार्थ रामायण कथा व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रारंभ

बिडकीन दि ६ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील कोकणवेश मारुती मंदिर येथे प पु देवशरणजी बाबाजी हनुमान मंदिर बिडकीन,व प पु महंत भास्करगिरीजी महाराज श्रीक्षेत्र देवगड,प पु सद्गुरू प्रसाद महाराज अमळनेर यांच्या कृपा आशीर्वादाने ३१ वर्षापासून सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह दि ६ फेब्रुवारी गुरुवार पासून आयोजित करण्यात आला आहे, या सप्ताहामध्ये सकाळी ज्ञानेश्वरी पारायण वाचन ह भ प कृष्णा महाराज आरगडे, बार्शीकर, व रामायण प्रवक्ते ह भ प डॉ शंकर महाराज छबीलवाड, तसेच रोज सकाळी पहाटे चार वाजेपासून रोज भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे, व रोज रात्री आठ ते दहा या वेळेमध्ये किर्तनाचे आयोजित करण्यात आले आहे, दि ६ रोजी ह भ प कृष्णा महाराज मोगल,निलजगाव,दि ७ रोजी ह भ प संजय महाजन शिंदे,रोहिलगड,दि ८ रोजी ह भ प भानुदास महाराज कोल्हापूरकर,दि ९ रोजी ह भ प श्रावण महाराज अहिरे, मालेगाव,दि १० रोजी ह भ प केशव महाराज मुळीक, आळंदी देवाची,दि ११ रोजी ह भ प कृष्णा महाराज नवले, श्रीक्षेत्र पैठण,दि १२ रोजी ह भ प विष्णू महाराज जगताप, गीता मंदिर श्रीक्षेत्र पैठण,दि १३ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत ह भ प कृष्णा महाराज आरगडे, बार्शीकर यांचे काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसाद प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, बिडकीन व परिसरातील गावातील भाविक भक्तांनी या सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आव्हान समस्त गावकरी व श्री सावता भजनी मंडळ बिडकीन यांनी केले आहे,

पिंपळवाडी पिराची येथील ऊरूसाला प्रारंभ

पैठण दि ०६ : सर्वधर्म समभावचे प्रतीक असलेल्या व शेकडोंच्या वर्षांची परंपरा असलेल्या पैठण तालुक्यातील पिंपळवाडी पिराची येथील शादावल साहब दर्गा ऊरूसास बुधवार पासून सुरूवात झाली असून गुरुवारी याठिकाणी छबिना मिरवणूक काढण्यात आली. या ऊरूसासनिमीत्त संदल मिरवणूक, छबिना मिरवणूक तसेच कुस्त्यांच्या दंगलीचे

ही आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी सायंकाळी संदल मिरवणूक, गुरूवारी छबिना मिरवणूक व उद्या शुक्रवारी कुस्तींची दंगल होणार आहे. यात एक हजार पासून ते २१ हजार रुपये पर्यंत कुस्ती खेळविली जाणार आहे. शनिवार रात्री कव्वालीचा कार्यक्रम होणार असून यात अहमदाबाद येथील इम्तीयाज नाजा आणि बेंगळुरू येथील शमा कौसर यांच्यात जंगी मुकाबला होणार आहे. ऊरूसासाठी राहाट पाळणे,खेळणी, खाद्यपदार्थ, कपडे,भांडी आदी दुकाने थाटण्यात आली असून.उरूस कमिटीच्या वतीने व्यवस्थापन केले जात असल्याची माहिती उरूस कमिटीचे अध्यक्ष नासेर शेख, उपाध्यक्ष मनोज थोटे,अहेमद शेख,सत्तार शेख, उपसरपंच बिलाल शेख,मुनाफ शेख, नईम शेख ,राजू दिलवाले,जाकेर शेख, रहीम शेख यांच्यासह आदींनी दिली.यावेळी ऊरूस परिसरात एमआयडीसी पैठण पोलीस ठाण्याचे सपोनि जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी यांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

अग्रलेख...

अर्बन नक्षल्यांबद्दलच्या प्रेमाचे न उमजणारे कोडे

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर लोकसभेत झालेल्या दोन दिवसांच्या चर्चेला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या ओघवत्या शैलीत कुणाचेही नाव न घेता गांधी घराणे, काँग्रेस पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांना चांगलेच आडव्या हाताने घेतले. संविधानाचे नाव घ्यायचे, हातात संविधानाची प्रत बाळगायची आणि घटनाविरोधी कृत्ये करायची, हे धोरणच या साऱ्यांनी गेल्या काही काळापासून भारतीय राजकारणात राबवले आहे. पंतप्रधानांनी म्हटल्याप्रमाणे शहरी नक्षलवाद्यांना संविधान समजू शकत नाही, ही बाब यापूर्वीही अनेकवार अधोरेखित झाली आहे. देशातील अनेक राजकारण्यांवर या विचारांचे गारुड रुंजी घालत आहे. स्वतः मुख्यमंत्री असताना अरविंद केजरीवाल यांनी नवी दिल्लीत रस्त्यावर उतरून केलेले आंदोलन देशाची जनता आजही विसरलेली नाही. अर्बन नक्षल्यांच्या पाठिंब्याने दिल्लीत झालेल्या शाहीनबाग आंदोलनाला काँग्रेस आणि आम आदमी पार्टीची फूस होती हे लपून राहिलेले नाही. किसान आंदोलनामागील शक्तीही उजागर झाल्या, ज्यांची जवळीक अर्बन नक्षलवाद्यांशी होती. देशात ठिकठिकाणी होणारी आंदोलने आणि त्यामागील शक्ती ज्या पूर्वी ओळखणे दुरापास्त होते, ते मोदींच्या कार्यकाळापासून सहजसाध्य झाले आहे. या साऱ्या शक्तींची बोलण्याची भाषा एक आणि कृती मात्र देशविरोधी असते. म्हणूनच पंतप्रधानांना म्हणावे लागले की, भारतीय संघराज्याविरुद्ध लढायची घोषणा करणारे संविधानातील भावना समजू शकत नाहीत. देशाची एकता, अखंडता काय हेदेखील समजू शकत नाही. संविधानाचे नाव घ्यायचे, गरिबांबद्दल कणव असल्याचे दाखवायचे आणि शिशमहल उभारायचा, दारू घोटाळा करायचा, मंत्र्यांच्या घोटाळ्यांवर पांघरूण घालायचे, सातत्याने केंद्र सरकारसोबत पंगा घेण्याचे केजरीवालांचे राजकारण आपण बघितले आहे. आता तर विरोधी पक्षनेते राहुल गांधी हेदेखील त्याच मार्गाने निघाले आहेत. आम आदमी पार्टी आणि काँग्रेस यांच्यात कोण अर्बन नक्षल्यांच्या जास्त जवळ आहे, हे दाखवून देणारी कृती करण्याची स्पर्धाच लागली आहे. काँग्रेसने गतकाळात आणि वेळोवेळी गरिबी हटावचा नारा दिला पण कधीच देशातील गरिबी हटविली नाही. सातत्याने भांडवलशाही आणि घराणेशाहीचे राजकारण केले. सत्ता शाबूत ठेवण्यासाठी गावगुंड, अर्बन नक्षल, माओवादी, मार्केट फोर्सेस, सांस्कृतिक मार्क्सवाद, डीप फेक, बाह्य शक्ती, जिहाद्यांची मदत घेतली. आता तर काँग्रेसचे युवराज डाव्या विचारसरणीच्या कोंडाळ्यामध्ये पुरते फसलेले दिसत आहेत. आम्ही तर म्हणतो राहुल गांधींच्या रूपात सात दशकांनंतर हिंसक आणि देशद्रोही नक्षलवादी चळवळीला नेतृत्व प्राप्त झाले आहे. त्यांनी इंडियन स्टेटविरुद्ध पुकारलेल्या 'एल्गार'मुळे काँग्रेसच्या अत्यंत घातक आणि अराष्ट्रीय मानसिकतेचे दर्शन घडत आहे. आपण असेही म्हणून शकतो की, त्यांच्या वेळोवेळीच्या हिंदूविरोधी, कम्युनिस्टधार्जिण्या कृतींमुळे देशातून नाहीशा होत चाललेल्या नक्षल चळवळीला जणू काही अघोषित नेतृत्वच झाले आहे.

राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव आदी इंडिया आघाडीतील नेते मंडळींनी ज्या शहरी नक्षलवाद्यांना अभय दिलेले आहे, त्यांनी देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात नुसता हैदोस घातला आहे. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील डाव्या विचारांच्या आणि काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनांचा राष्ट्रविरोधी कृत्यांमध्ये असलेला सहभाग लपून राहिलेला नाही. जी जी म्हणून राष्ट्रीय प्रतीके आहेत, ती नाकारण्याचा धंदाच यांनी आरंभला आहे. एकीकडे महाराष्ट्रासह देशभरात नक्षल चळवळ नेस्तनाबूत होत असताना शहरी नक्षलवादी आणि त्यांच्यामार्फत नक्षलवाद्यांना मिळणारे सैद्धांतिक पाठबळ कसे काय खपवून घेतले जाऊ शकते? आज जगभरातील हिंदूंना आपल्या हिंदू असण्याबद्दल गौरव वाटत असताना, ही मंडळी साऱ्या अहिंदू कृत्यांची री ओढत आहेत. वर्षानुवर्षे शहरी नक्षलवाद हा आपल्यामध्ये उच्चभ्रू मुखवटा घेऊन उजळ माथ्याने वावरत आहे. आजपर्यंत व्यवस्थेवर काँग्रेस आणि डाव्या विचारसरणीच्या लोकांचे वर्चस्व असल्याने त्यांच्याद्वारे पोषित शहरी नक्षलवाद सर्व व्यवस्थांमध्ये खोलवर रुजला. कधी भांडवलदारांना विरोध करणे, कधी पर्यावरणाचा मुद्दा उपस्थित करून विकास प्रकल्पांना विरोध करणे, कधी वनवासींच्या अस्मितेचा मुद्दा मांडून ग्रामीण भागातील विकास प्रकल्पांना विरोध करणे, कधी शेतकऱ्यांच्या गरिबीचा मुद्दा उपस्थित करून रासायनिक खते आणि औषधांना विरोध करणे, अशा एक ना अनेक मुद्यांचे भांडवल करून, जनतेत कायम अस्वस्थता निर्माण करायची आणि त्यांना सरकारविरुद्ध पेटवायचे, हा शहरी नक्षलवाद्यांच्या कार्यप्रणालीचा भाग झालेला आहे. भारतीय शिक्षणव्यवस्था पाश्चिमात्यांच्या मानसिकतेच्या चौकटीत अडकवून ठेवण्याचे काम शहरी नक्षलवाद्यांनी बेमालूमपणे केले. आज आपली तरुण पिढी जो इतिहास शिकते आहे, तो डाव्या विचारसरणीने कलुषित केलेला आहे. याचा परिणाम असा झाला की येथील विद्यार्थ्यांना आपल्याच इतिहासाचा, संस्कृतीचा, धर्माचा, आपल्या तत्त्वज्ञानाचा, आपल्या साध्या जावनशैलीचा विसर पडलेला दिसतोय. भारताची परंपरा सर्व विचारांचे स्वागत करणारी असली तरी यात स्वतःच्या अस्तित्वाचे व मूळ भारतीय विचारांचे विस्मरण व्हावे, असा निश्चितच याचा अर्थ होत नाही. माओवाद्यांनी कायम भारताच्या अस्तित्वावर घाला घातला व यासाठी त्यांनी परिणामकारक पद्धतीने शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून भारतीयांना स्वःचे विस्मरण करायला भाग पाडले. भारतीयत्वाचे अर्थात् राष्ट्रीयत्वाचे अर्थात् हिंदुत्वाचे विस्मरण झाल्याने आपल्याच प्रथा, परंपरांबद्दल आक्षेप घेणारे अभारतीय निर्माण झाले. काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खडगे यांनी केलेले वक्तव्य याठिकाणी उपस्थित केले जायला हवे. खडगे महाशय म्हणतात, गंगेत डुबकी लावल्याने देशातील गरिबी नाहीशी होईल का? त्यांचे म्हणणे याच विचारसरणीचे समर्थन करणारे आहे. ते म्हणतात त्या प्रमाणे गंगेत डुबकी मारल्याने गरिबी नाहीशी होणार नसली तर त्या मिळालेल्या ऊर्जेत लक्षावधी लोकांची बेरोजगारी दूर करण्याची निर्माण होणारी धर्मशक्ती कशी काय दुर्लक्षित केली जाऊ शकते? एकीकडे शासनाला धोरणलकवा झाल्याचा आरोप करायचा आणि एखादी कृती केली किंवा निर्णय घेतला तर त्याविरुद्ध हो हल्ला करायचा, संपाची हाळी द्यायची, आंदोलनाचा इशारा द्यायचा, यातसुद्धा शहरी नक्षलवाद्यांचा हातखंडा आहे. कुठल्याही शासकीय निर्णयाविरुद्ध कधी आदिवासींना उकसवायचे, कधी शेतकऱ्यांचा मुद्दा उपस्थित करायचा, कधी महिलांच्या गळचेपीचा मुद्दा लावून धरायचा आणि कधी मागासवर्गीय, अनुसूचित जाती, धार्मिक अल्पसंख्यक आदींचा मुद्दा आळवायचा हे त्यांना वर्षानुवर्षांच्या अनुभवाने चांगलेच ठावूक झालेले आहे. मुळात १०० वर्षांचा इसिहास असलेल्या काँग्रेस पक्षाने आणि या पक्षाच्या नेतृत्वाने शहरी नक्षलवाद्यांसोबत उभेच का म्हणून राहावे, हा खरा प्रश्न आहे. शहरी नक्षलवाद आता अखेरचे आचके देऊ लागला आहे. त्याच्या पाठिंब्याने सुरू झालेली नक्षलवादी चळवळ आता देशातील उण्यापुऱ्या ८-१० जिल्ह्यांपुरती उरलेली आहे. कर्नाटक राज्यातील अखेरच्या नक्षलवाद्याने शरणागती पत्करल्याने हे राज्य नक्षलमुक्त म्हणून घोषित करण्यात आले आहे. नक्षल्यांचा बालेकिल्ला असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातही नक्षलवादाला अखेरची घरघर लागली आहे. या परिस्थितीत काँग्रेस पक्षाकडून त्यांना मिळणारी रसद अजूनही का थांबलेली नाही, हा शोधाचा विषय आहे. राहुल गांधी यांच्या विधानांकडे केवळ 'बालिश' आणि 'अज्ञानी' या भूमिकेतून बघून चालणार नाही. लोकसभेचे विरोधी पक्षनेतेपद भूषविणारा हा आधुनिक चारू मुझुमदार देशासमोरील अत्यंत गंभीर संकट म्हणून उभा ठाकला आहे, ही बाब ध्यानात घेतली जायला हवी. चारू मुझुमदार हे नक्षल चळवळीचे जनक होते. त्यांच्याच पुढाकारातून नक्षल चळवळ सुरू झाली. प्रारंभी केवळ सरकारी यंत्रणा आणि भांडवलदारांविरोधात उभ्या ठाकलेल्या नक्षलवादाला कधी आणि केव्हा आपल्याच बांधवांच्या रक्ताची चटक लागली हे कळलेच नाही. जेव्हा आपल्याच बांधवांच्या रक्ताला चटावलेल्या नक्षल चळवळीचा बुरखा फाटायला लागला तसतशी या चळवळीबद्दलची वनवासींची सहानुभूतीही आटू लागली. त्यांच्याबद्दलचे आटलेले प्रेम राहुल गांधी आणि त्यांचा पक्ष पुन्हा का मिळवून देऊ पाहात आहे, हे न उमजणारे कोडे आहे?

इतस्ततः

डॉ. विवेक राजे

शुद्धी सभेची स्थापना

पाच दिवसांनी येणाऱ्या ११ फेब्रुवारी या दिवसाचे खरे तर विशेष महत्त्व आहे. पण काळाच्या ओघात अनेक घटना व्यक्ती, समाजाच्या विस्मृतीत जातात. त्यातही इतिहासाची मोडतोड करून ठरावीक विचारसरणी, विशिष्ट व्यक्ती समूह आणि एकारलेल्या अब्राहमिक धर्मांचेच हित साधण्यासाठी सगळी बुद्धिमत्ता गहाण टाकण्याच्या काळात तर सामाजिक विस्मृती विशेषत्वाने लक्षात येते. राज्यकर्ता पक्ष आणि त्याच्या नेत्यांचे यामुळेच भले होत असते. या देशात स्वातंत्र्यापासून असेच लोक सत्तेवर होते. त्यांनी डाव्या विचारसरणीच्या लोकांना समाजाच्या डोळ्यापुढे सातत्याने असत्य कथन करीत एक पडदा उभा करण्याच्या बोलीवर, या देशातील शिक्षण व्यवस्था आंदण देऊन टाकली. परिणामतः काँग्रेस पक्षाचे ज्या लोकांशी मतभेद होते किंवा ज्यांनी कोणत्याही कारणाने गांधी-नेहरू यांना विरोध केला त्यांचे कर्तृत्व पुसून टाकण्याचाच प्रयत्न केला गेला. ज्यांचे कार्यकर्तृत्व पुसून टाकण्याचा प्रयत्न केला गेला, अशाच अनेक लोकांपैकी एक म्हणजे स्वामी श्रद्धानंद. ११ फेब्रुवारी १९२३ ला त्यांनी भारतीय शुद्धी सभेची स्थापना केली. त्या दिवसापासूनच त्यांनी आपल्या शुद्धीकरण आंदोलनाला सुरुवात केली. ज्याप्रमाणे मुसलमानांना आणि ख्रिश्चनांना हिंदूचे धर्मांतरण करण्याचा अधिकार आहे, त्याप्रमाणे मलाही त्यांचे शुद्धीकरण करून त्यांना स्वधर्मात परत घेण्याचा अधिकार आहे. भूतकाळात घडलेल्या कोणत्याही कारणाने जर माझे कोणी हिंदू बांधव धर्मांतरित झाले असतील तर त्यांना परत हिंदू धर्मात घेणे हे माझे कर्तव्य ठरते. त्यांना हिंदू धर्मात परत येण्याचा हक्क आहे. सनातन धर्मात प्राचीन काळापासून ही प्रथा अस्तित्वात आहे, असे ते सांगत असत.

१९१२ मध्ये ते कलकत्ता प्रांताच्या प्रवासात असताना त्यांचे या प्रश्नांकडे लक्ष गेले. १९११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावर कर्नल मुखर्जी यांनी एक सिद्धांत मांडला होता; ज्याद्वारे मुखर्जींनी असे प्रतिपादन केले की, जर हिंदूंची संख्या याच वेगाने कमी होत राहिली तर, ४०० वर्षांनंतर या देशात हिंदू समाजाचे अस्तित्व शिल्लक उरणार नाही. या सिद्धांताचा स्वामी श्रद्धानंदांनी सखोल अभ्यास केला आणि ते या निष्कर्षाप्रत पोहोचले की, यासाठी हिंदू समाजाने संघटित होणे आवश्यक आहे. संघटित होऊन हिंदू समाजाने आपल्यातील सामाजिक विषमता, जातिवाद, अस्पृश्यता आणि स्त्री अवहेलना आदी दोषांचे निराकरण केले पाहिजे तसेच परधर्मात गेलेल्या वा हिंदू धर्मात येऊ इच्छिणाऱ्या सर्वांना हिंदू धर्मात सामावून घेतले पाहिजे. हिंदू धर्मात शुद्धीकरणाची व्यवस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. यासाठी ते याज्ञवल्क्य स्मृती, मनुस्मृती, देवल स्मृती, पाराशर स्मृती, बृहस्पती स्मृती, यम स्मृतीचे दाखले देऊन अहिंदूंना हिंदू करून घ्यावे म्हणून हिरिरीने प्रचार करू लागले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यातही शुद्धीकरण करून अहिंदूंना हिंदू करून घेत असत; याचे दाखले ते आपल्या भाषणात देत असत. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाजांनी शुद्धीकरणासाठी एक स्वतंत्र व्यवस्था उभी केली होती. हे कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यास 'पंडितराव' असे संबोधले जात असे.



याच काळात त्यांच्या एका शिष्याने त्यांना ख्वाजा हसन निजामी यांनी लिहिलेले 'दाइ-ए-इस्लाम' हे पुस्तक दिले. हे पुस्तक अत्यंत गोपनीयपणे भारतात फक्त मुसलमानांनाच वितरित करण्यात आले होते; ज्यात हरप्रकारे हिंदूंना इस्लाममध्ये धर्मांतरित करण्याचे आवाहन करण्यात आले होते. विशेष म्हणजे या पुस्तकात तेव्हा संख्येने सात कोटी असलेले दलित अस्पृश्य हा या धर्मपरिवर्तन करण्यासाठी सगळ्यात सोपा लोकसमूह आहे, हे हिरिरीने सांगण्यात आले होते. विविध हिंदू लोकसमूहांना मुसलमान करायचे. दुसरे म्हणजे आपली लोकसंख्या वाढवत न्यायची. मग हिंदूंच्या बरोबरीने राजकीय अधिकार मागायचे. याद्वारे मुस्लिम लोकसंख्या वाढवून 'दार-उल-हरब'ची निर्मिती करायची, अशी कारस्थानी व्यूहरचना या पुस्तकात सांगितली होती. त्याने अस्वस्थ झालेल्या स्वामी श्रद्धानंदांनी शुद्धी सभेची स्थापना करून शुद्धीकरण चळवळीला वेग दिला. त्या योगे १९२३ च्या अखेरपर्यंत उत्तर भारतात जवळजवळ ३० हजार मुसलमानांना हिंदू समाजात परत आणण्यात त्यांना यश आले. शुद्धीकरण चळवळीला मुस्लिम आणि हिंदू दोन्ही समाजांमधून विरोध केला गेला. आग्रा आणि मथुरा या शहरांच्या जवळ मलकानी राजपूताचा समाज राहात होता. या मलकानी राजपूतांचे बहुतेक रीतिरिवाज हे हिंदू होते. यांना आवाहन करण्यापलीकडे तेथील राजपूत सभेने काहीही केले नाही. श्रद्धानंदांनी मात्र यातील बहुतेकांना हिंदू करून घेण्यात यश मिळविले. याच काळात गोव्यातील पोर्तुगीजांनी जबरदस्त अत्याचार करून कॅथोलिक ख्रिश्चन केलेल्या गौड ब्राह्मणांना परत हिंदू धर्मात घ्यावे म्हणून वैष्णव आश्रमाचे प्रमुख विनायक महाराज मसूरकर यांना विनंती केली गेली. मसूरकर महाराजांनी पोर्तुगीज सरकारचा प्रचंड विरोध असतानाही शुद्धीकरणाद्वारे त्यांना परत हिंदू धर्मात घेतले. आत्ता-आत्तापर्यंत हा लोकसमूह तेथे नवे गौडा म्हणून ओळखला जात होता. या शुद्धीकरण चळवळीला इ. स. १९२८ मध्ये दडपण्याचा पोर्तुगीज सरकारने प्रयत्न सुरू केला तेव्हा डॉ. मुंजे, न. चिं. केळकर यांनी गोव्याला शिष्टमंडळ नेले. तिथे गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नर जनरलची काही अटींवर शुद्धीकरणाला मान्यता मिळविली. छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, मसूरकर महाराज, डॉ. मुंजे, स्वामी श्रद्धानंद अशा लोकोत्तर नेत्यांनी शुद्धीकरण चळवळीला नेहमीच बळ दिले. म्हणजे हिंदुत्ववादी नेतृत्वाने अहिंदूंना हिंदू करून घेण्यासाठी नेहमीच कार्य केले. शुद्धी चळवळीच्या यशामुळे चिडून अब्दुल रशीद नावाच्या मुस्लिम व्यक्तीने स्वामी श्रद्धानंदांवर भ्याड हल्ला केला. त्यातच स्वामी श्रद्धानंदांचा मृत्यू झाला. शुद्धी सभा आणि शुद्धीकरण चळवळीबद्दल जराही आस्था नसलेल्या गांधींनी स्वामी श्रद्धानंदांच्या खुनाचा साधा निषेधदेखील केला नाही. पण त्यांच्या खुन्याला झालेल्या फाशीच्या शिक्षेवर मात्र नापसंती व्यक्त केली होती. डॉ. मुंजेंना शुद्धीकरण कार्यामुळे जीवे मारण्याच्या सतत धमक्या दिल्या जात असत. त्याला जराही भीक न घालता डॉ. मुंजे अखेरपर्यंत शुद्धीकरण चळवळीचे काम करीतच राहिले.

मुस्लिम अनुनय काँग्रेसच्या इतका अंगवळणी पडला होता की, या विचारधारेला तथाकथित धर्मनिरपेक्षता म्हणजे काय, याचेही भान उरले नव्हते. आज १०० वर्षांनंतर काँग्रेस अहिंदूंच्या आक्रमक विस्तारवादाला कोणत्याही प्रकारे विरोध सहन करू शकत नाही. त्यामुळेच एनआरसी, समान नागरी कायदा, बांगलादेशी आणि रोहिंग्या मुसलमानांची परत पाठवणी अशा गोष्टींचा विरोध काँग्रेस करते आहे. दुर्दैवाने आज हिंदू समाज शुद्धीकरण चळवळीचा गांभीर्याने विचार करताना दिसत नाही. काही लोक आणि साधुसंत जरी शुद्धीकरण चळवळीला महत्त्व देताना दिसत असले, तरी हिंदू समाजाचा एक मोठा वर्ग या विषयाबाबत गंभीर नाही, असेच म्हणावे लागते. शुद्धी चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप येणे आवश्यक आहे. त्याच वेळी हिंदू या बाबतीत अतिरिक्त आक्रमक होणार नाहीत, याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. मानवी जीवनात श्रद्धांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रद्धा व्यक्तिगत जीवनात प्रत्येक व्यक्तीला एक निश्चित दिशा देण्याचे काम करते. त्याचप्रमाणे समाजजीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करीत असते. शुद्धी चळवळ नवश्रद्धांची निर्मिती असते. म्हणून हिंदू समाजाने सामंजस्य राखत एका निश्चित गतीने शुद्धी चळवळ चालविणे गरजेचे आहे. विविध ठिकाणी शुद्धीकरण वा घरवापसी होत असताना हिंदू समाजाला हे दायित्व पेलावेच लागेल. हिंदू संस्कृती आणि हिंदू धर्म विचारांमध्येच हे दायित्व पेलण्याची आंतरिक क्षमता आहे, हेही खरेच.

९८८१२४२२२४

वेध

विजय कुळकर्णी

जागतिक व्यापारयुद्धात स्वदेशीचे महत्त्व!

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन, कॅनडा इत्यादी देशातून अमेरिकेत आयात करण्यात येणाऱ्या उत्पादनांवरील कर वाढविण्याचा आदेश दिला. त्यामुळे जागतिक व्यापारयुद्ध भडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या जागतिक व्यापारयुद्धातून भारतीयांनी वेळीच धडा घेतलेला बरा. भारतीय नागरिकांनी स्वदेशी वस्तूंचा स्वीकार करणे आवश्यक आहे. देशात तयार होणाऱ्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर खरेदी करून आपल्याच देशातील कारागिरांच्या हाताला अधिकचे काम देता येईल. परिणामी, लघुउद्योगांना चालना मिळून कारागिरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे समाधान नागरिकांना मिळेल आणि भारतही प्रत्येक बाबतीत इतर देशांकडे न वळता आत्मनिर्भर होईल. सोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भारताला जागतिक स्तरावर तिसरी आर्थिक महाशक्ती करण्याचे स्वप्नही लवकरच पूर्ण होईल.

डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनमधून आयात होणाऱ्या उत्पादनांवर १० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लावण्याची घोषणा केली. या घोषणेला काही तासांतच चीनने अमेरिकेतून आयात करण्यात येणाऱ्या विविध वस्तूंवर १० ते १५ टक्के आयातशुल्क लावण्याची घोषण करून प्रत्युत्तर दिले. एवढेच नाही तर, गुगलची चौकशी करण्याबरोबरच इतर व्यापार संबंधित उपाययोजना केल्या जाणार असल्याचे चीनने जाहीर केले आहे. चीनच्या व्यापार व वाणिज्य मंत्रालयाने याबाबत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकेने केलेली एकतर्फी करवाढ ही जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांचे उल्लंघन आहे. चीन व अमेरिकेच्या व्यापारी संबंधांना नुकसानकारक आहे. देशाचे व्यापारी हित पाहता अमेरिकेतून आयात करण्यात येणाऱ्या कोळसा, द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी) यावर १५ टक्के अधिक कर लावण्यात येणार आहे. याशिवाय कच्चे तेल, कृषी उपकरणे, मोठ्या कार, पिकअप ट्रक इत्यादींवर १० टक्के अधिक आयातशुल्क आकारण्यात येईल. अमेरिकेने लावलेल्या आयात शुल्काविरोधात जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) कडे याचिका दाखल करण्यात आल्याचेही चीनच्या व्यापार व वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे. दरम्यान, अमेरिकेने कॅनडा व मेक्सिको यांच्यावर २५ टक्के आयात शुल्क लावण्याच्या निर्णयाला पुढील महिनाभरासाठी स्थगिती दिली आहे. मात्र, चीनमधून आयात करण्यात येणाऱ्या मालावर मंगळवारपासूनच १० कर लावण्यास सुरुवात केली आहे. याचा परिणाम चिनी वस्तूंच्या किमतीवर होऊन त्या महागणार आहेत. चीनमध्ये तयार होणाऱ्या वस्तू जगभरात स्वस्त दरात विकल्या जातात. त्याचा परिणाम अमेरिकेत तयार होणाऱ्या वस्तूंच्या किमतीवर होतो. भारतातही यापूर्वी मेड इन चायना उत्पादनांना मोठ्या प्रमाणात मागणी होती. कारण या वस्तू भारतीय उत्पादनापेक्षा स्वस्त होत्या. अगदी फटाक्यांपासून विद्युत दिव्यांच्या माळा, मोबाईल, सायकल इत्यादींच्या भारतीय बाजारपेठेवर चीनचे एकप्रकारे अधिराज्य होते. अमेरिकेत देखील चीनने तसाच प्रयत्न चालविला होता. त्यामुळे अमेरिकन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी ट्रम्प यांनी हे पाऊल उचलले असावे. तसेच, इंग्रजांनी जवळपास संपूर्ण जगावर वसाहतवादातून राज्य केले. आजही जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिका आणि चीन यांच्यात जागतिक बाजारपेठा काबीज करण्यावरून व्यापारयुद्ध पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

चीनने अमेरिकेकडून आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंवर आयातशुल्क वाढविण्याच्या निर्णयाचे मेक्सिकन राष्ट्राध्यक्षांनी स्वागत केले आहे. त्यांनी याबाबत पत्रकार परिषद घेऊन ड्रग्ज तस्करी रोखण्यासाठी सीमेवर १० हजार सुरक्षा दलाचे जवान तैनात करण्यास सहमती दिली. त्यानंतर ट्रम्प यांनी व्यापार कर लावण्याचा निर्णय मागे घेतला. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी देखील अमेरिकन उत्पादनांवर २५ टक्के कर लावण्याचा निर्णय जाहीर केला. त्यात मद्य, फर्निचर आणि संत्रा ज्यूसचा समावेश आहे. त्यांनी कॅनेडियन नागरिकांना अमेरिकन वस्तूंचा वापर न करता स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन केले आहे. या विषयातील तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार ट्रम्प यांनी कॅनडा, मेक्सिकोसारख्या सहयोगी देशांवर आयात शुल्क वाढवून एकप्रकारे व्यापारयुद्ध पुकारले आहे. याचा फायदा घेऊन चीनने या देशांसोबत आपले संबंध मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. याचा परिणाम जागतिक व्यापारावर होणे निश्चित आहे. जागतिक करारानुसार भारतावरही या घटनेचे चांगले वाईट परिणाम होणे क्रमप्राप्त आहे. याचा विचार करून सरकार व नागरिकांनी वेळीच सावध होऊन स्वदेशीला प्राधान्य द्यावे, असे सुचवावेसे वाटते.

८८०६००६१४९

दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

काँग्रेस नेत्यांना झाले तरी काय?

मागील आठवड्यात याच स्तंभात 'खडगे तुम्हीसुद्धा' या शीर्षकाखाली काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्याबाबत केलेल्या एका वादग्रस्त विधानाचा आढावा घेतला होता. यावेळी पुन्हा एकदा खडगे यांनी महाकुंभमेळ्याबाबत असेच फक्त वादग्रस्तच नाही अतिशय आक्षेपार्ह असे विधान करत आपण कधीच सुधारणार नसल्याचे दाखवून दिले आहे. महाकुंभमेळ्यात स्नान करून खडगे यांनी देशातील गरिबी दूर होणार का, असा आचरटपणाचा प्रश्न विचारला होता.

यावेळी महाकुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत हजारो लोकांचा मृत्यू झाल्याचा दुसरा अतिशय गंभीर आरोप खडगे यांनी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होताना केला. खडगे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तर आहे, पण राज्यसभेतील विरोधी पक्षनेते या घटनात्मक पदावरही आहे. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांना सरकारवर आरोप करण्याचा अधिकार आहे, पण कोणताही आरोप करताना पुराव्यानिशी करायला पाहिजे. महाकुंभमेळ्यात काही दिवसांपूर्वी चेंगराचेंगरीची दुर्दैवी घटना घडली होती. त्यात ३० जण ठार तर ६० जण जखमी झाल्याचे उत्तरप्रदेश सरकारने अधिकृतपणे जाहीरही केले होते. मग या दुर्घटनेत हजारो लोक मृत्युमुखी पडल्याचा आरोप खडगे कशाच्या आधारावर करतात, ते त्यांनी सांगितले पाहिजे. खडगे यांच्या या विधानावर सत्ताधारी भाजपाच्या सदस्यांनी आक्षेप घेतला असता, हा माझा अंदाज आहे, माझा आकडा चुकीचा असेल तर सरकारने बळींचा योग्य आकडा जाहीर केला पाहिजे, असे तारही खडगे यांनी तोडले. कोणाला दोषी ठरवण्यासाठी मी आरोप करत नाही, माझा आरोप खोटा सिद्ध झाला तर मी माफी मागायलाही तयार असल्याची मखलाशी खडगे यांनी केली. आपला बिनबुडाचा आणि धादांत खोटा आरोप मागे घेण्याचे आवाहन अध्यक्ष जगदीप धनकड यांनी खडगे यांना केले, पण आपला आरोप मागे घेण्यास नकार देण्याची मुजोरी खडगे यांनी केली. त्यामुळे तुमच्या आरोपाच्या समर्थनार्थ सायंकाळपर्यंत पुरावे सादर करण्याचा निर्देश धनकड यांनी दिला होता. मात्र हा स्तंभ लिहीत असेपर्यंत तरी खडगे यांनी कोणताही पुरावा सादर केला नव्हता, असे समजते. हे कमी झाले की काय म्हणून याच भाषणात खडगे यांनी गेल्या दहा वर्षांत १ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा आरोपही केला. आजकल खडगे सगळे आरोप हजारो वा लाखातच करतात, असे दिसते.

१३ जानेवारीला सुरू झालेल्या महाकुंभमेळ्यात पहिल्या दिवसापासूनच हजारांत नाही तर काही लाखांत भाविक आहे. देशातीलच नव्हे परदेशातील माध्यमांचे कॅमेरे त्याठिकाणी २४ तास सज्ज आहेत. अशा स्थितीत तेथे होणारी कोणतीही घटना वा दुर्घटना लपवता येत नाही, पण आले खडगेच्या मना तेथे कोणाचे चालेना, असे म्हणावेसे वाटते. हे कमी होते की काय म्हणून समाजवादी पक्षाच्या खासदार जया बच्चन यांनीही आगीत तेल ओतणारे विधान केले. महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीत जे मृत्युमुखी पडले, त्यांचे मृतदेह गंगा नदीत फेकण्यात आले, त्यामुळे या नदीचे पाणी प्रदूषित झाले, असा दुसरा हास्यास्पद आरोप जया बच्चन यांनी केला. मृतदेह गंगेत फेकले असते तरी ते वाहत जाऊन कुठे तरी दिसले असते. खडगे आणि बच्चन यांचा आरोप बोलबच्चनसारखा वाटतो. मुळात महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरीच्या घटनेत एक भाविक जरी मृत्युमुखी पडला तरी तो चिंतेचा विषय म्हटला पाहिजे. चेंगराचेंगरीच्या घटनेचे राजकारण करत उत्तरप्रदेशातील योगी आदित्यनाथ यांच्या सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याच्या आधी खडगे यांनी कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या घटनांचा अभ्यास केला असता तर असा आरोप करण्याची त्यांची हिंमत झाली नसती. पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना ३ फेब्रुवारी १९५४ ला म्हणजे मौनी अमावास्येला प्रयागराज येथे झालेल्या झालेल्या चेंगराचेंगरीत ८०० जणांचा मृत्यू झाला होता. राजीव गांधी पंतप्रधान असताना १९८६ मध्ये अलाहाबाद येथे झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत २०० जणांचा बळी गेला होता. महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी होण्याची आणि त्यात काही भाविकांचा मृत्यू होण्याची पहिली घटना नाही.

सामान्यपणे कोणत्याही मोठ्या मेळ्यात विशेषतः कुंभ वा महाकुंभमेळ्यात लाखोंच्या संख्येत भाविक येत असतात. त्यामुळे अनेकदा सरकारी पातळीवर कितीही मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली व्यवस्था अपुरी पडते. सामान्य लोकही उत्साहाच्या भरात आवश्यक ती खबरदारी घेत नाही. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत नाही. त्यातून अशा दुर्दैवी घटना घडत असतात. त्यामुळे अशा घटनांचे राजकारण करण्याचे सर्वच पक्षांनी टाळले पाहिजे. राजकारण करण्यासाठी तसेच सरकारला घेरण्यासाठी आणि त्याच्यावर तुटून पडण्यासाठी विरोधी पक्षांजवळ विषयाची कमतरता कधीच नसते. सपाच्या जया बच्चन यांच्याकडून तर अशी अपेक्षा ठेवणेच मूर्खपणाचे आहे. कोणतेही कर्तृत्व नसताना समाजवादी पक्ष जया बच्चन यांना सातत्याने राज्यसभेत का घेतो, हे अनाकलनीय आहे.

लाडकी बहिण, लाडका भाऊ योजना बंद होणार नाही

शिवसेना मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नांदेडमध्ये ग्वाही

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०६ फेब्रुवारी

महायुती सरकारने सुरु केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, लाडका भाऊ योजना बंद होणार नाहीत, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नांदेड येथे शिवसेनेकडून आयोजित केलेल्या आभार सभेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, सचखंड म्हणजे सत्याची भूमी आणि येथे सत्याचाच विजय झाला. नांदेडी जिल्ह्यातील सर्वच ९ जागा महायुतीच्या जिंकून आल्या. हे यश लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडके ज्येष्ठ यांचे आहे. याच मैदानावर लाडक्या बहिणींचा मेळावा घेतला होता. हजारो बहिणी आशिर्वाद द्यायला आल्या होत्या. तुमच्या १५०० रुपयांच्या ओवाळणीमध्ये खोडा घालणाऱ्या सावत्र भावांना जोडा दाखवला नाही तर बहिणींनी जोरात वाजवला पण असे शिंदे म्हणाले. बहिणींनी एकच मारला पण सॉलिड मारला, सावत्र भाऊ दृष्ट भाऊ यांना चारीमुंड्या चित केलं. नांदेडकर जनतेने महायुतीला पैकीच्या पैकी मार्क, १०० टक्के रिझल्ट आणि १०० टक्के स्ट्राईक रेट राखला असे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मतदारांचे आभार मानले. बाळासाहेब सांगायचे की, खऱ्याला खरे म्हणा आणि सत्याची बाजू उचलून धरा. निवडून आल्यानंतर मतदारांचे आभार मानण्यासाठी इथे आवर्जून आलो, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून इथ कोणी मालक आणि नोकर नाही. बाळासाहेब असताना कार्यकर्त्यांना सवंगडी म्हणायचे मात्र त्यांच्यानंतर काहीजण कार्यकर्त्यांना घरगडी समजत होते, अशी टीका त्यांनी उबाठावर केली. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले होते की, राजा का बेटा राजा नही बनेगा जो काम करेगा वही राजा बनेया असा आपला पक्ष आहे. आता शिवसेनेत कामाचे मेरिट चालते. बाळासाहेब आणि आनंद दिघे यांचे विचार

घेऊन पुढे चाललोय असे ते म्हणाले. लोकसभेत उबाठापेक्षा आपल्याला २ लाख तर विधानसभेत १५ लाख जास्त मते मिळाली. बाळासाहेबांच्या विचारांचे खरे वारसदार आणि खरी शिवसेना कोण हे मतदारांनी निवडणुकीत दाखवून दिले. शिवसेना वाढत आहे आणि राज्यभरातून उबाठा आणि इतर पक्षातील लोक शिवसेनेत पक्ष प्रवेश घेत आहेत, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. यावेळी उबाठा पक्षाचे परभणी जिल्हा प्रमुख विशाल कदम शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला.

लोकहिताच्या योजना कोणतेही सरकार आले तरी बंद करता कामा नये मात्र महाविकास आघाडीने दुर्देवाने ते केले होते. महायुती सरकार आल्यानंतर मराठवाडा वॉटरग्रीड, जलयुक्त शिवार अशा योजना पुन्हा सुरु केल्या. मागील अडीच वर्षात सरकारने इतकं काम केले आहे की कार्यकर्ते ताठ मानेने जनतेसमोर जाऊ शकतात. सरकारी योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायचा आहे त्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ते म्हणाले की, गरिबीची जाण असल्यामुळेच आम्ही लाडकी बहिण योजनेचा निर्णय घेतला. मराठावाड्याची दुष्काळवाडा ही ओळख पुसायची आहे. महायुती सरकारने मराठवाडा वॉटरग्रीड योजनेला पुन्हा चालना देण्याचा निर्णय घेतला. जलयुक्त शिवार योजना सुरु केली. अडीच वर्षात शेतकऱ्यांच्या योजनांसाठी ४५००० कोटी रुपये दिले. शेतकरी सन्मान योजनेत वर्षाला १२००० रुपये दिले. एक रुपयात पीक विमा दिला, वीज बील माफ केले. त्यामुळेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पदापेक्षा लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ म्हणून मिळालेला हा बहुमान आणि ही ओळख सर्वात मोठी असल्याची भावना यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली. विधानसभा निवडणुकीत मतदारांनी महायुतीवर मतांचा वर्षाव केला. यामुळे राज्यातीलच नाही तर देशातील विश्लेषकांनी तोंडात बोट घातली. शिवसेनेचे चार आमदार नांदेडच्या विकासाचा चौकार मारतील, नांदेडचा चेहरामोहरा बदलतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. हळद संशोधन केंद्राचे काम लवकरच सुरु होणार आहे. एमआयडीसीचा प्रश्न सोडवणार आहे. पाण्याचा विषय, रस्त्याचे विषय मार्गी लावू, असे शिंदे म्हणाले. गाव तिथं शिवसेना, घर तिथं शिवसैनिक यामाध्यमातून पक्षाला पुढे जायचे आहे. लोकांचा शिवसेनेवर विश्वास आहे, कोरोना काळात शिवसैनिकांनी केलेले काम लोकांनी लक्षात ठेवला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीचा विजय करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, सदस्य नोंदणी सुरु ठेवावू, असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

संक्षिप्त वृत्त

सिडको सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी त्र्यंबक कदम

नवीन नांदेड-सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ बिग्रेड २०२५ चा अध्यक्षपदी त्र्यंबक कदम

यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सिडको येथील शिवजन्मोत्सव २०२५ ची कार्यकारिणनिची निवड ३ फेब्रुवारी रोजी सिडको येथील जिजाऊ सृष्टी येथील एका बैठकीत करण्यात आली. त्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यावेळी बैठकीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती निवड कार्यकारिणी पुढील प्रमाणे अध्यक्षपदी त्र्यंबक कदम तर सचिवपदी साहेबराव गाडे, कोषाध्यक्ष वसंतराव कदम, उपाध्यक्षपदी रघुनाथ ताटे, मधुकर गायकवाड, कोषाध्यक्ष वसंतराव कदम, सहसचिव विनोद वंजारी, दिपक्भरड, सह कोषाध्यक्ष ऊतमराव जाधव, संघटक नामदेव चव्हाण, सदस्य ब्रम्हाजी वडजे,अशोक कदम, बालाजी हिवराळे, प्रमोद गाडेकर, संदिप कदम, गोविंदराव मजरे, शेख मोईन लाटकर, कोंडीबा घोरबांड, एकनाथ पाटील, सुभाष सुर्यवंशी, यांच्यी निवड करण्यात आली आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय पाटील घोगरे, दिगांबर शिंदे, ऊतम जाधव, सोपानराव पांडे, सतिश बस्वदे, दिलिपराव कदम भगवानराव ताटे यांच्या सह विविध क्षेत्रातील सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर पदाधिकारी तसेच ज्येष्ठ नागरिकांनची उपस्थिती होती.

श्री यदुराज (वनदेव) संस्थान माहूरगड येथे अखंड दत्त नाम सप्ताहाला सुरवात

माहूर-येथील निसर्गरम्य घनदाट जंगलात असलेल्या सनातन, अतिप्राचीन श्री यदुराज संस्थान वनदेव येथे दरवर्षी प्रमाणे प.पू.कृपा सिंधु समर्थ गुरुवर्य कैवल्य निज पदवासी खुशाल पुरीजी महाराज बापू

यांच्या पुण्यतिथिनिमित्त माघ शुद्ध जया एकादशी दिनांक १ ते ८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित अखंड दतनाम सप्ताहाला सुरुवात करण्यात आली असून, या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा! असे आवाहन मठाधिश तथा मुख्य पुजारी प.पू. श्री दत्तपुरीजी महाराज यांनी केले आहे. या पुण्यतिथी सोहळ्यादरम्यान दररोज पहाटे पाच वाजता तिर्थस्थापना, काकड आरती, अखंड दतनामाचा जप तसेच माघ शुद्ध दशमी दिनांक ७ फेब्रुवारी शुक्रवारी रात्री ९ वाजता आनंद दत्त महापुजा १२८ वीसी श्रीफळांच्या पुजेला सुरवात करण्यात येईल. दिनांक ८ फेब्रुवारी रोजी शनिवारी काकडा आरतीने या पुजेची सांगता करण्यात येणार असून, आठ वाजता श्रींची समाधी अभिषेक, महाआरती व सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत महाप्रसादाने या पुण्यतिथी सोहळ्याची सांगता करण्यात येणार आहे. या धार्मिक कार्यक्रमांच्या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा! असे आवाहन संस्थानचे मठाधिश तथा मुख्य पुजारी प.पू.श्रीदत्तपुरीजी महाराज यांनी केले आहे.

पोलीस अंमलदार शेख रिहाना यांच्यावतीने पितळेची घंटी अर्पण

आदमपूर-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी व देगलूर पोलीस स्टेशन कार्यालयातील कार्यरत पोलीस अंमलदार शेख रिहाना महेबुबसाब यांच्या वतीने गुरूवार दि.०६ फेब्रुवारी रोजी आदमपूर गावातील मुख्य रस्त्यांलगत असणाऱ्या देवाला सोडलेल्या गाईच्या स्मारकास(जानीगाईचा वट्टा)साडेतीन किलो. पितळेची घंटी विधिवत अर्पण करण्यात आली. येथील हेमाडपंथी महादेव मंदिर,हनुमान मंदिर,दत्त मंदिर,विठ्ठल रूक्मिणी मंदिर खुल्या परिसरात मुख्य रस्त्यांलगत एक फार पूर्वीपासूनचे देवाला सोडलेल्या गाईचे स्मारक अस्तित्वात आहे.त्यालाच लागून हे पिंपळाचे झाड आहे.शेख कुटुंबियांनी गतकाळापूर्वी केलेल्या नवसाची परीपूर्ती भक्तिभावात करण्यात आली.

उपमुख्यमंत्री शिंदे यांचे नांदेड विमानतळावर स्वागत

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०६ फेब्रुवारी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांचे नांदेडच्या गुरुगोविंद सिंह जी विमानतळावर एक दिवसाच्या दौऱ्यासाठी दुपारी दीडच्या सुमारास आगमन झाले. त्यांच्यासोबत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील उपस्थित होते.

नांदेडच्या गुरु गोविंद सिंह जी विमानतळावर त्यांचे बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ. हेमंत पाटील,आ. बालाजी कल्याणकर,आ.बाबुराव कदम कोहळीकर,आ.संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर आदींची उपस्थिती होती. विमानतळावर त्यांचे भव्य स्वागत झाले. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे श्री.हुजूर साहिब सचखंड गुरूद्वाराकडे रवाना झाले. दुपारी दोनच्या सुमारास ते येथील नवा मोंढा मैदानावर जाहीर आभार सभेला संबोधित करतील. त्यानंतर विश्रामगृहावर विविध क्षेत्रातील मान्यवरांसोबत त्यांची बैठक आहे. सायंकाळी ते मुंबईकडे प्रयाण करतील.

कुंडलवाडी येथील भीमराव बडूरकर यांना आदर्श पत्रकार पुरस्कार

तभा वृत्तसेवा
कुंडलवाडी,दि. ०६ फेब्रुवारी

तालुकास्तरीय गंगा - रमाई स्मृती आदर्श शिक्षक व आदर्श पत्रकार २०२५ दि.८फेब्रुवारी रोजी आयोजक पत्रकार सुभाष दरबस्तेवार यानी आयोजित केला आहे.

कुंडलवाडी येथील पत्रकार सुभाष दरबेस्तेवार आपल्या आई वडिलांच्या च्या स्मरणार्थ तालुका स्तरीय गंगा - रमाई आदर्श शिक्षक व पत्रकार पुरस्कार ठेवण्यात आला होता हया मध्ये आदर्श शिक्षक म्हणून साने गुरुजी विद्यालयातील शिक्षक शंकर कुर्णापले तर आदर्श पत्रकार म्हणून भीमराव बडूरकर यांना २०२५ चा पुरस्कार घोषित झाला आहे. सदर पुरस्कार वितरण सोहळा व्यंकटेश मंदिर नरागल्ली कुंडलवाडी येथे दि.८फेब्रुवारी रोजीआयोजित केले असून हया कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कुणाल लोहगावकर राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून साईनाथ उत्तरवार,(माजी चेअरमन),राजेश्वर उत्तरवार ,(उपा.पानसरे महविद्यालय अर्जापू र),तर प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.डॉ. बालाजी चिरडे,अशोक कांबळे (अध्यक्ष सर्वोदय छा.कुंडलवाडी), ज्ञानेश्वर शिंदे (सा.पो. नि.पो. स्टे. कुंडलवाडी) तसेच शिक्षण विस्तार अधिकारी बिलोली जी. बी. बिरमवार हे उपस्थित राहणार आहेत तरी सर्वांनी उपस्थित राहवे असे अहावान आयोजक पत्रकार सुभाष दरबेस्तेवार यांनी केले आहे.

इराणमध्ये बेपत्ता झालेला वसमतचा अभियंता सुखरूप मायदेशी : खा. डॉ. अजित गोपछडे

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०६ फेब्रुवारी

हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील उद्योजक अभियंता योगेश पांचाळ हे इराणमध्ये बेपत्ता झाले होते. बेपत्ता झालेल्या अभियंता पांचाळ यांचा शोध घेऊन त्यांना मायदेशी सुखरूप आणण्यात आले आहे. यासाठी खा.डॉ. अजित गोपछडे यांनी परराष्ट्रमंत्र्यांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडेही सातत्याने पाठपुरावा केला होता. इराणच्या दूतावासाकडेही खा. गोपछडे यांनी संपर्क साधला होता. खा. डॉ. गोपछडे यांच्या प्रयत्नांमुळे मराठवाड्याचा भूमिपुत्र बेपत्ता झालेला अभियंता योगेश पांचाळ हा सुखरूप घरी पोहोचला आहे. वसमत येथील उद्योजक अभियंता योगेश पांचाळ हे दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी इराणमध्ये गेले होते. इराणमध्ये काही नवे उद्योग भारतात आणण्याच्या अनुषंगाने ते अभ्यास करीत असतांना इराण पोलिसांनी पांचाळ यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना तुरूंगात ठेवण्यात आले. वसमत येथील तरुण अभियंता इराणमध्ये बेपत्ता झाल्याचे समजताच खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राज्यमंत्री पवित्रा मार्गेरिटा आणि परराष्ट्र राज्यमंत्री किर्तीवर्धन सिंह व देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे निवेदन दिले. सदरील बेपत्ता अभियंत्याचा शोध घेऊन त्याला मायदेशी परत आणावे अशी विनंती केली. याचवेळी इराणच्या दूतावासाशी संपर्क साधला. अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राज्यमंत्री पवित्रा मार्गेरिटा, कीर्तीवर्धन सिंह यांच्या प्रयत्नांतून बेपत्ता झालेला वसमतचा उद्योजक अभियंता योगेश पांचाळ यांना भारतात सुखरूप आणण्यात आले आहे.

बातमीचा राग मनात धरून पत्रकाराला चक्क जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या अवैधधंदे चालकावर कडक कारवाई करा!

वाई बाजार येथिल घटनेसंबंधी पत्रकारांच्या शिष्टमंडळाकडून लेखी निवेदनाद्वारे मागणी

तभा वृत्तसेवा
माहूर,दि. ०६ फेब्रुवारी

माहूर तालुक्यातील वाई बाजार येथे ड्राय-डे च्या दिवशी अवैध दारु विक्री होत असल्यासंबंधी एका पत्रकाराने वृत्तपत्रात बातमी प्रकाशित केल्याचा राग मनात धरून त्यांना जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी संबंधित अवैध धंदे चालकावर योग्य ती कायदेशीर कारवाई करून पत्रकार संरक्षण कायद्यानुसार संरक्षण देण्याच्या मागणीसाठी दि.०६ रोजी सिंदखेड पोलीस ठाण्यात माहूर तालुका पत्रकारांच्या वतीने लेखी निवेदन देण्यात आले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ शाखा माहूरचे सदस्य तथा वाई बाजार येथील तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष पत्रकार कैलाश बेहेरे यांनी दि. ३० जाने. (म. गांधी पुण्यतिथी) रोजी ड्राय डे च्या दिवशी वाई बाजार येथे देशी दारू दुकान परिसरात विक्री होत असलेल्या नियमबाह्य देशी दारू विक्रीच्या संबंधात बातमी प्रकाशित केली होती. याबाबतची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला देवून सिंदखेड पोलीसांनाही पत्रकार बेहेरे यांनी याबाबत अवगत केले होते. तथापि दि. ३१ रोजी दैनिक 'श्रमिक लोकराज्य' या वृत्तपत्रांमध्ये ड्राय डे च्या दिवशी दारूची बेफाम विक्री या मथळ्याखाली प्रकाशित केलेल्या वृत्तांकनात वाई (बाजार) येथे देशी दारू दुकानातच नव्हे तर अनेक पान टपरीवर सुद्धा मिळते असा उल्लेख केला होता. त्यामुळे सदर बातमीचा राग मनाशी धरून पान टपरी च्या आड अवैध दारू विकणारे सुनील दत्ता मडावी व दत्ता सोमला मडावी यांनी मंगळवार दि. ४ फेब्रुवारी रोजी आठवडी बाजाराच्या दिवशी भर चौकात गाठून ... आमचे विरुद्ध बातमी का लावली ?, यापुढे लावली तर घरात घुसून जीवानिशी मारू! अशी खुलेआम धमकी बेहेरे यांना दिली होती.

दरम्यान,बातमीचा राग मनात धरून बेहेरे यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या इसमांवर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीसाठी गुरुवार दि. ६ रोजी पत्रकार कैलाश बेहेरे यांच्यासह अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ शाखा माहूरचे तालुकाध्यक्ष सरफराज दोसानी, संघटनेचे सचिव राजकुमार पडलवार यांच्या नेतृत्वाखाली सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक रमेश जाधवर यांना पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या असलेले लेखी निवेदन देण्यात आले असून, पत्रकार बेहेरे यांना संरक्षण देऊन संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.. निवेदण्याच्या प्रति जिल्हा पोलीस अधिक्षक, नांदेड यांच्यासह उपविभागीय पोलीस अधिकारी, माहूर यांनाही देण्यात आल्या आहेत.

अज्ञात वाहनाच्या धडकेत वानर मृत्युमुखी

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०६ फेब्रुवारी

देगलूर तालुक्यातील ग्राम वझरगा येथील मन्याड नदी पुलाजवळ नांदेड हैद्राबाद महामार्गालगत अज्ञात वाहनाच्या धक्क्याने गुरुवार दि.०६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता एक वानर दुर्देवी मरण पावलेले आढळून आले.

मन्याड नदी पुलाजवळ दाट झाडी आणि पाण्याची व्यवस्था होत असल्याने त्याठिकाणी माकड व वानरांचा वर्षभर त्या ठिकाणी मुक्त संचार असतो. थडीसावळी, अटकळी ता.बिलोली येथील गावातील काही मजूरवर्ग कामानिमित्त देगलूर येथे जात असताना त्यांना हे मृत्यूमुखी पडलेले वानर दृष्टीस पडले. भूतदयेप्रती भक्तिभाव जपत थडीसावळी, अटकळी गावातील काही हनुमान भक्त नागरिकांकडून त्या वानरावर हिंदू संस्कृती प्रमाणे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. वानराच्या अशा दुर्दैवी मरणाने गाव परिसरातील भक्तांकडून हळहळ व्यक्त करण्यात आली. संबंधित ठिकाणी वनविभागामार्फत मुक्या प्राण्यांकरीता सुचनावजा फलक महामार्गावरील वाहनधारकांसाठी लावण्याचीही चर्चा भक्तगणांत ऐकावयास मिळाली.

नांदेडचे नवे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पदभार स्वीकारला

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ०६ फेब्रुवारी

नांदेड जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आज गुरुवारी सकाळी रुजू झालेत. पूर्व जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला.

यावेळी त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत स्वागत झाले. यावेळी मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यापूर्वी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. सन २०१५ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी असणारे राहुल कर्डिले यांनी यापूर्वी अमरावती सहाय्यक जिल्हाधिकारी , परभणी सहाय्यक जिल्हाधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा जिल्हाधिकारी आणि सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आदी पदे त्यांनी भूषविली आहेत. मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची छत्रपती संभाजी नगर येथे वस्तू व सेवा कर सहआयुक्त पदावर बदली झाली आहे. अभिजीत राऊत गेल्या अडीच वर्षापासून नांदेड येथे जिल्हाधिकारी पदावर कार्यरत होते.

दुचाकीचा अपघात; एक जण ठार तर एक जण जखमी

तभा वृत्तसेवा
निवघा (बा),दि. ०६ फेब्रुवारी

नातेवाईकाच्या लग्नासाठी दुचाकीवर निघालेल्या दोघांपैकी एकाचा बसच्या चाकाखाली येऊन चिरडून मृत्यू झाला तर एक जण जखमी ल्याची घटना बुधवारी सांयकाळी ५ वाजता घडली.

कोपरा (ता. पुसद) येथील उत्तम हटकर हे नातेवाईकाच्या मुलीचे लग्न असल्याने सासुरवाडी निवघा (बाजार) ता. हदगाव येथे आला होता. निवघा बाजारहून मेव्हणा नितीन गव्हाणे यांच्यासोबत दुचाकी ने पळसा (ता. हदगाव) येथे जात असताना धानोरा पाटीजवळ ऊसाने भरलेला ट्रक उभा होता.

त्या ट्रकला बाजू देऊन समोर जाताना समोरून येणाऱ्या हदगाव- बाळापूर बस येत होती. तेवढयात दुचाकीला उभ्या असलेल्या ऊसाच्या ट्रकचा धक्का लागून दुचाकीवर मागे बसलेले उत्तम हटकर (२८) हे बसच्या चाकाखाली आल्याने त्यांचा चिरडून मृत्यू झाला. तर नितीन गव्हाणे हे किरकोळ जखमी झाल्याची माहिती उपस्थितांनी दिली. सदरील घटनेचा तपास बिट जमा दार जुडे साहेब व गायकवाड साहेब करीत आहे.

आई-वडीलच देव माणुस आहेत त्यांचा सन्मान करून संस्कृतीला जपावे : गणेश शिंदे

तभा वृत्तसेवा
उमरी,दि. ०६ फेब्रुवारी

विद्यार्थ्यांनी आई - वडिलाची सेवा म्हणजे ईश्वर सेवा समजून सामाजिक संस्कृती जपावी तरच कुंटुबाचा समाजात आदर व मानुसकीचा दर्जा मिळतो असे शैक्षणिक क्रिडा शिक्षक गणेश शिंदे बोळसेकर यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देताना अध्यक्षीय भाषनात बोलत होते .

उमरी नूतन विद्यालय हायस्कूल येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम दि ६ फेब्रवारी रोजी घेण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी क्रीडाशिक्षक गणेश शंकरराव शिंदे बोळसेकर हे होते. यावेळी गणेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला आणि विद्यार्थीचे कौतुक करीत शिक्षणा सोबत सामाजिक संस्कृतीचा मोलाचा संदेश दिला आहे. विद्यालयातर्फे मुख्याध्यापक एन. एम. लखमोड यांनी शाळेची संस्थेची भूमिका मांडली निरोपाचा क्षण नाही तर शुभेच्छांचा सण आहे पाऊल बाहेर पडताना विद्यार्थी सोबतचा लळा रेंगाळणारे मन आहे मुख्याध्यापक म्हणाले, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांकडून दहावी च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जी. एस. शिंदे, प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक आर. जी. पुपलवाड , विशेष शिक्षक ए. बी. जोजारे , मुख्याध्यापक एन. एल. लखमोड , उपमुख्याध्यापक सुरळीकर, पर्यवेक्षक व्हि. एल. शिंदे आदी उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नववीच्या विद्यार्थिनींनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले आहे .

संक्षिप्त वृत्त

ठेवीदारांचा आक्रोश मुंबईत धडकणार

तभा वृत्तसेवा
बीड दि.६ फेब्रुवारी

ज्ञानराधासह जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या पतसंस्था, मल्टिस्टेटमधील फरार आरोपी अर्चना कुटेंसह सर्व संचालक मंडळाला पंधरा दिवसांत अटक करा नसता मुंबईच्या आझाद मैदानावर ठेवीदारांचा आक्रोश पहायला मिळेल असा इशारा देत ठेवीदारांचे पुढील आंदोलन मुंबईत करणार असल्याची घोषणा ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांनी ठेवीदारांच्या जनआक्रोश मोर्चात केली. या मोर्चात ठेवीदारांनी प्रशासन व पोलिसांविरोधात प्रचंड रोष व्यक्त केला. दरम्यान आमदार सुरेश धस यांनी उबाळे यांच्या मोबाईलवरुन ठेवीदारांशी संवाद साधला.

जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव) आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. या ठेवी परत मिळाव्यात, अर्जना कुटे यांच्यासह फरार असलेल्या अध्यक्ष व संचालक मंडळांना अटक करावी, मल्टिस्टेट,पतसंस्थांच्या तपासाची माहिती ठेवीदारांना द्यावी या मागण्यांसाठी ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाली मंगळवारी (दि.४) बीडमध्ये ठेवीदारांचा जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन मोर्चास सुरुवात झाली. पुढे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकला. मोर्चात पुन्हा एकदा ठेवीदारांची एकजुट दिसून आली. यावेळी प्रा.सचिन उबाळे म्हणाले की, निवडूका झाल्या. खासदार, आमदार निवडून आले. जिल्ह्याला दोन मंत्रीपदे मिळाली परंतू दोनही मंत्री कामाचे नाहीत. आमदार आणि खासदार म्हणजे सारा गाव मामाचा आणि एक नाही कामाचा अशी अवस्था झाली आहे. ठेवीदार आमदारांना भेटून निवेदन देतात मात्र पुढे काहीच होत नाही. यामुळे ठेवीदारांनी आता अधिक आक्रमक होणे गरजेचे आहे. आता ठेवीदारांनी खासदार व आपआपल्या तालुक्यातील आमदारांच्या घरासमोर आंदोलन करावे असेही उबाळे म्हणाले.ज्ञानराधाचे माजी सीओ प्रल्हाद काळे यांना अटक करावी, फरार आरोपी असलेल्या ज्ञानराधाच्या आक्का अर्चना कुटेंसह सर्व संचालक मंडळाला अटक करुन त्यांची प्रॉपर्टी जप्त करावी ही मोर्चाची प्रमुख मागणी आहे. फरार आरोपींना अटक करण्यासाठी प्रशासन व पोलिसांना १५ दिवसांचा कालावधी देत आहोत. पंधरा दिवसात सर्व आरोपी अटक झाले नाही तर मुंबईच्या आझाद मैदानावर ठेवीदारांचे आंदोलन करणार असल्याची घोषणा प्रा. उबाळे यांनी मोर्चात केली. यावेळी ठेवीदारांनीही हात वर करुन मुंबईतील आंदोलना पाठिंबा दिला. दरम्यान मोर्चा बीडसह मराठवाड्यातील ठेवीदारांनी भर उन्हात मोठ्या संख्येने सहभागी होत एकजुट दाखवत प्रा.सचिन उबाळे यांना भरभक्कम पाठिंबा दिल्याचे दिसून आले.

कु.स्नेहा दुधाळ हिला राज्यस्तरीय खुल्या लावणीनृत्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक

तभा वृत्तसेवा
बीड दि.६ फेब्रुवारी

सौ. के. एस. के. काकू कृषी महाविद्यालयाची प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु. स्नेहा दुधाळ हिने गंगाई- बाबाजी महोत्सव २०२५ खुल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकवले.

कु. स्नेहा हिने लाही लाही होते अंगाची या गीतावर बहारदार लावणी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली आणि छाप पाडत भगवान विद्यालय, आष्टी जि. बीड आयोजित आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय खुल्या लावणीनृत्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकवले. यामध्ये तिला सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ९००१/- रु. रोख रक्कम प्रदान करण्यात आली.

बक्षीस वितरण गंगाई - बाबाजी महोत्सव २०२५ चे अध्यक्ष मा. आ. भीमराव धोंडे, प्रमुख अतिथी श्री. राम शिंदे, सभापती - विधान परिषद, महाराष्ट्र राज्य, सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री - कल्याणी चौधरी आणि श्री. अजय भीमराव धोंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

स्नेहाला या स्पर्धेत यश मिळवण्याकरिता महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. प्रविण मांजरे आणि जिमखाना उपाध्यक्ष प्रा. सचिन राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आवडत्या क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी तसेच यश मिळवण्यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना विविध क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी महाविद्यालय प्रशासन तत्पर असते. राज्यस्तरीय स्पर्धेत बक्षीस पटकाविल्याबद्दल संस्थेचे सचिव मा. श्री. जयदत्त क्षीरसागर, सहसचिव डॉ. गोविंद साळुंके तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, सांस्कृतिक विभाग, जिमखाना विभाग आणि प्राध्यापक कर्मचारी यांनी अभिनंदन केले. कु. स्नेहाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हजारो बाल कलाकारांनी रेखाटले खा.डॉ.श्रीकांत शिंदेचे आकर्षक चित्र

तभा वृत्तसेवा
बीड दि.६ फेब्रुवारी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान बीड शहरात आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले असून काल दि. १ फेब्रुवारी रोजी २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील १०३ शाळांमधून हजारो बाल कलाकारांनी चित्रकला आणि रांगोळी स्पर्धेत उस्पुर्त सहभाग नोंदवला. चित्रकला स्पर्धेत वयोगट इयत्ता पाहिली ते तिसरी- फुलांची टोपली, वयोगट इयत्ता चौथी ते सहावी- राष्ट्रीय पक्षी मोर आणि वयोगट- इयत्ता सातवी ते दहावी मधील बाल कलाकारांना संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे यांचे चित्र काढण्यासाठी विषय दिले होते. कमालीची गोष्ट सर्व वयोगटातील बाल कलाकारांनी आकर्षक अशे चित्र काढून स्वतःच्या कलेचे दर्शन घडवले यादरम्यानच जिल्हाभरातील ७२ शाळांमध्ये समूह रांगोळी स्पर्धा पार पडली असून बाल कलाकारांनी एकत्रित येऊन शाळेच्या प्रांगणात माझ्या शाळेची ईमारत हा विषय घेऊन उभेउभ रांगोळी काढली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते खुंटेफळ साठवण तलाव

तसेच शिंपोरा ते खुंटेफळ बोगदा कामाचे भूमिपूजन

नदीजोड प्रकल्पातून मराठवाडा कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

तभा वृत्तसेवा
बीड दि.६ फेब्रुवारी

२०१४-१५ मध्ये सुरु केलेल्या जलयुक्त शिवार योजनेतून अनेक गावे पाणीदार झाली, भूजल पातळी वाढली, मात्र मराठवाड्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करायचे असेल तर पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात आणणेही महत्त्वाचे आहे. समुद्रात वाहून जाणारे ५३ टीएमसी पाणी राज्यात नदी जोड प्रकल्प राबवून मराठवाड्यात आणण्यात येईल, ज्यामुळे आगामी पिढ्यांना दुष्काळ बघावा लागणार नाही याचे नियोजन शासनाने केले आहे असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वसामान्यांच्या, शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार भक्कमपणे उभे असून त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील खुंटेफळ येथे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक ३ अंतर्गत शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी केली. तसेच कोनशिला अनावरण, विधिवत पूजन करून तसेच रिमोटद्वारे कळ दाबून खुंटेफळ साठवण तलाव ते शिंपोरा बोगदा कामाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा आष्टी उपसा सिंचन योजना एक महत्त्वाचा भाग आहे.

कार्यक्रमास जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, पर्यावरण आणि हवामान बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार नमिता मुंदडा, आमदार विक्रमसिंह पंडित, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी आदींसह माजी आमदार भीमराव धोंडे तसेच लक्ष्मण पवार साहेबराव दरेकर तसेच शंकर देशमुख आदींची उपस्थिती होती.

यावेळी खुंटेफळ येथे आयोजित जाहीर सभेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित जनतेशी संवाद साधला. आष्टी तालुक्यातील या उपसा सिंचन योजनेचा तिसरा टप्पा खुंटेफळ तलावाच्या रूपाने विकसित होत आहे याचे ४०% काम पूर्ण झाले असून आगामी काळात या कामाला अधिक गती दिली जाईल असे मुख्यमंत्री म्हणाले.

या भागात संपूर्ण शेती बागायती करायची असेल तर नदीजोड प्रकल्प आवश्यक आहे. ऑक्टोबर २०२२ मध्ये दिलेल्या पहिल्या सुधारित प्रशासकीय मान्यतांपैकी आष्टी उपसा सिंचन योजना एक होती. तब्बल ११ हजार कोटी रुपयांची मंजुरी मिळाली आणि निधीही उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे हे काम वेगाने सुरू आहे. धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. ही योजना पूर्ण झाल्यावर या भागाचा दुष्काळ आता भूतकाळ ठरेल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. याशिवाय, या प्रकल्पात शेतकऱ्यांना थेट लाभ मिळावा, यासाठी ठिबक सिंचन प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेमुळे पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

नागरीकांच्या सुविधेसाठी प्रोजेक्ट संवाद

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भा.पो.से.) यांचा स्तुत्य उपक्रम

तभा वृत्तसेवा
बीड दि.६ फेब्रुवारी

बीड जिल्ह्यात नागरीक हे मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे बहुतांश वेळा त्यांना पोलीस स्टेशनशी संबंधीत काम असेल तर त्यांना पोलीस स्टेशनला पोहचायला बराच वेळ लागतो. त्याच बरोबर पोलीस स्टेशनला पोहचण्यासाठी बस भाडे/स्वतःचे वाहन असल्यास इंधन खर्च या स्वरुपात पैसाही खर्च होतो. पोलीस स्टेशनला गेल्यानंतर बऱ्याच वेळा काम होत नाही. किंवा नागरीकांचे समाधान होत नाही. त्यामुळे नागरीकांना वरीष्ठांकडे दाद मागण्यासाठी दुरचा प्रवास करावा लागतो. त्यामुळे नागरीकांचे आर्थीक नुकसान तर होतेच परंतु त्याच बरोबर त्यांना शारिरीक व मानसीक हालही होतात.

याच बाबींचा विचार करुन व नागरीकांना चांगली सेवा देण्याच्या भावनेतून पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भा.पो.से.) यांचे संकल्पनेतुन संवाद प्रकल्प' हा उपक्रम बीड जिल्हा पोलीस दलात राबवला जात आहे. यासाठी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी QR Code तयार केला आहे. सदरचा QR Code हा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांचे कक्षात व पोलीस ठाणे अंमलदार यांचे कक्षात लावण्यात आला आहे. नागरीकांनी आपल्याकडे असलेल्या मोबाईलद्वारे सदरचा ठउ उेवश स्कॅन केल्यानंतर त्यांच्या मोबाईलचे स्क्रिनवर एक लिंक

येईल. ती लिंक उघडल्यानंतर एक माहीतीचा फॉर्म येईल. त्यामध्ये नागरीकांना

१) स्वतःचे नाव,
२) मोबाईल क्रमांक,
३) ज्या पोलीस ठाण्याच्या संबंधी काम आहे त्या पोलीस ठाण्याचे नाव निवडणे,
४) पोलीस ठाणे येथे भेट देण्याचे कारण किंवा माहीती,
५) पोलीस ठाणे येथे भेट दिल्यानंतर किंवा पोलीस ठाण्याच्या कामकाजावर आपण समाधानी आहात काय?
६) समाधानी/असमाधानी असल्याचे कारण,
७) तुम्ही दिलेली भेट यावरुन पोलीस ठाणेस किती गुण द्याय? (गुण १-५),
८) सुधारणेसाठी सुचना.

सदरची माहीती भरुन ती सबमीट करणे आवश्यक राहील. एखादी व्यक्ती पोलीस स्टेशनच्या कामकाजाबाबत असमाधानी असल्यास त्यांची पोलीस अधीक्षक कार्यालयाकडुन २४ तासांच्या आत समस्या जाणून घेवुन समाधान करण्याचा प्रयत्न केला जाईल. सदरचा ठउ उेवश हा सोशल मिडीयाच्या माध्यमातुन सुद्धा नागरीकांपर्यंत पोहचवला जाणार आहे. त्यामुळे एखाद्या नागरीकास अवैध धंदे किंवा इतर महत्वाची गोपनीय माहीती द्यायची असेल तर ते सदरचा ठउ उेवश स्कॅन करुन माहीती देवू शकतात. अशा व्यक्तींचे नांव व मोबाईल क्रमांक गोपनीय ठेवले जाईल. तसेच याद्वारे नागरीकांना त्यांच्या काही तक्रारी असल्यास त्या QR उेवश द्वारे देवु शकतात. नागरीकांनी केलेल्या तक्रारी, दिलेल्या प्रतिक्रीया, सुचना ह्या पोलीस अधीक्षक हे स्वतः पाहु शकणार आहेत. तसेच नागरीकांनी केलेल्या प्रत्येक तक्रारीची दखल पोलीसांकडुन घेतली जाणार आहे.

गणपती नगर बीड येथील अखंड हरिनाम सप्ताह आयोजन करण्यात आले होते यावेळी नवनाथ अण्णा शिराळे पाटील

मत्स्य व्यवसायासठी पात्र संस्थानी बोली प्रक्रियेत भाग घ्यावा

तभा वृत्तसेवा
बीड दि.६ फेब्रुवारी

बीड जिल्ह्यातील ५०० एकर खालील जलक्षेत्र असलेल्या तांदुळवाडी त. तालुका धारूर (सरासरी जल क्षेत्र २७.२५ हेक्टर) हा पाटबंधारे तलाव मासेमारी संदर्भात ठेक्याने देण्यासंदर्भात शासनाने सन २०१९ मध्ये निर्णय घेतला या निर्णयातील तालुक्यातील मच्छी व्यवसाय सहकारी संस्थे अंतर्गत (बोली) जाहीर लिलाव पद्धतीने ठेक्याने देण्यासाठी दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीची सभा झाली त्या सभेमध्ये जिल्ह्यातील तांदुळवाडी ता. धारुर पाटबंधारे तलाव जाहीर लिलावा पध्दतीने ठेक्याने देण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित आहे.

लिलावातील तलावाचे नांव न्युनतम तलावठेका रक्कम, तलावठेका सुरक्षा अनामात रक्कम व वार्षिक इष्टत्तम मत्स्यबोटुकली संचयन किमतीच्या १० टक्के रक्कम तसेच अटी व शर्ती सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय बीड यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहेत. तरी पात्र संस्थानी बोली प्रक्रियेत भाग घ्यावा असे असे आवाहन मत्स्य व्यवसायचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.भुजलाशयीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था नोंदणीसाठी सुधारित निकषानुसार ५०० हेक्टरच्या आतील एखाद्या तलावावर नोंदणी असलेले संस्था काही कारणास्तव काळया यादीत किंवा बंद असल्यास जवळच्या पाच किलोमीटर अंतराच्या आतील संस्थेचे त्या तलावावर त्या कालावधी करिता निर्धारण करण्यात येईल.

NSS स्वयंसेवक पदाकरिता ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
बीड दि.६ फेब्रुवारी

भारत सरकार तरुणांना डिजिटल कृषी मिशनचे अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेऊ इच्छित आहे. तसेच युवांना स्वंयसेवी गटामध्ये संघटीत करुन त्यांची ऊर्जा आणि क्षमता राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी, वापरण्यासाठी उत्सुक आहे. स्वयंसेवकांना आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, लिंगभेद आणि इत्तर सामाजिक समस्यावर आधारित मोहिमा जागरूकता कार्यक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्यास सांगितले जाऊ शकते आणि आपत्कालीन परिस्थितीत किंवा विविध कार्यक्रमाचे अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार प्रशासनाला मदत करण्याकरिता इच्छुक उमेदवाराकडून, विद्यार्थ्याकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

पात्रता:- शिक्षण किमान पदवी शिक्षण घेणारा किंवा पदवीधर किंवा पदवीत्तर, वय १ जानेवारी २०२५ रोजी १८ वर्षे पूर्ण असावे, उमेदवार ज्या तालुक्यासाठी अर्ज करीत आहे त्या तालुक्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे, ज्यांनी पूर्वी या पदावर काम केलेले आहे ते अर्ज करण्यास पात्र नसतील.

ानधन, कालावधी व जागा प्रत्येक तालुक्यातील ३ स्वयंसेवकांची जास्तीत जास्त तीन महिने किंवा किमान १५ दिवसांसाठी कामाची आवश्यकतेनुसार प्रति महिना ५०००/- हजार रुपये दराने मानधनावर नेमणूक करण्यात येईल. ही सेवा पगारी नोकरी तसेच कायमस्वरूपी नाही. स्वंयसेवकाला सरकारकडून कोणत्याही प्रकारच्या रोजगाराचा दावा करण्याचा कायदेशीर अधिकार नसेल.

अर्ज कसा करावा:-योजनेबद्दलची सविस्तर माहिती तथा अर्जाच्या नमुन्यासाठी नेहरू युवा केंद्र संगठनच्या www.nyks.nic.in या संकेतस्थळाला ऑनलाईन अर्ज सादर करून त्याची प्रत आवश्यक कागदपत्रासह नेहरू युवा केंद्र परभणी येथे दि. ८ फेब्रुवारी २०२५ पूर्वी सादर करावा,नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी बीड,जिल्हा कार्यालय,दिप एजन्सी, नगर रोड, बीड- ४३११२२ मोबाईल क्र. ९८५०९३९८०२ email.qnykbeedgmail.com यावर संपर्क साधावा.

ओबीसी लाभार्थ्यांनां थकित व्याज रक्कम एकरक्कमी भरण्यास ३१ मार्च पर्यंत ५० टक्के सवलत

तभा वृत्तसेवा
बीड दि.६ फेब्रुवारी

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, मुंबई जिल्हा कार्यालय बीड यांच्यामार्फत बीड जिल्हयातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना व्यवसायासाठी अल्प व्याज दराने कर्ज वितरीत करण्यात आलेली आहे त्यापैकी ब-याच लाभार्थ्यांची कर्ज परतफेडीची मुदत संपलेली असून थकित कर्ज वसुली होण्याच्या दृष्टीने ओबीसी महामंडळाच्या थकित कर्ज प्रकरणात संपूर्ण कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करणा-या लाभार्थ्यांनां थकित व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्यासाठी एकरक्कमी परतावा (जढड) योजना दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानुसार ओबीसी महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा घेऊन कर्ज मुक्त व्हावे व होणारी कार्यवाही टाळावी असे आवाहन ओबीसी महामंडळाचे व्यवस्थापक यांनी केले आहे.

परशुराम हिंदू सेवा संघ कार्यकारणी जाहीर

प्रदेश सरचिटणीस रत्नपारखी तर संघटन सरचिटणीसपदी डॉ पाटील

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.६ फेब्रुवारी

परशुराम हिंदू सेवा संघाची कार्यकारिणीची बैठक दि.११ जानेवारी रविवार रोजी माजलगाव येथील भावसार सभागृह येथे उत्साहात संपन्न झाली. यावेळी परशुराम हिंदू सेवा संघा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत देशपांडे नवनियुक्त प्रदेश संघटन सरचिटणीस डॉ. प्रशांत पाटील प्रदेश सरचिटणीस विनायक रत्नपारखी मराठवाडा अध्यक्ष आनंद कुलकर्णी पुणे जिल्हा अध्यक्ष शैलेश खोपटीकर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीच्या प्रसंगी परशुराम हिंदू सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत देशपांडे म्हणाले परशुराम हिंदू संघटना ही विविध क्षेत्रातील अनुभवी व सर्व जातीपातीतील व्यक्तींना सोबत घेऊन हिंदू संघटन वाढवण्याचे काम करत आहे, त्याचाच एक भाग म्हणून आज माजलगाव येथे नूतन कार्यकारणी बैठक संपन्न होत आहे, तसेच पुढील काळातील विविध उपक्रमाबाबत चर्चा करण्यात आली यामध्ये पुढील काळात सर्व जातीय हिंदू धर्म यांच्या वृत्तबंध सोहळा आयोजित करणे, देवस्थान इनाम जमिनी असलेल्या बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला अजून तीव्र रूप देणे यासह शैक्षणिक औद्योगिक, वैद्यकीय क्षेत्रातील समस्येवर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्ह्यासह माजलगाव तालुक्याची कार्यकारणी प्रदेशाध्यक्ष विश्वजित देशपांडे यांनी जाहीर केली व सर्वांचे अभिनंदन कडून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदेश सरचिटणीस तथा नगरसेवक विनायक रत्नपारखी यांनी केले यावेळी त्यांनी परशुराम हिंदू सेवा संघाची भूमिका विशद केली. जातीपातीच्या भिंती तोडून माणुसकीच्या भिंती उभ्या करून सामाजिक समरसता जपत हिंदू म्हणून एकत्रित येणे काळाची गरज आहे त्यामुळे येणाऱ्या काळात सर्व जातींना सोबत घेऊन संघटित होऊन सर्वजण जात म्हणून नाहीतर हिंदू म्हणून एकत्र कार्य करण्यासाठी परशुराम हिंदू सेवा संघटना संपूर्ण महाराष्ट्रात कार्य करत आहे , त्याचाच एक भाग म्हणून आज माजलगाव येथे नूतन कार्यकारणी बैठक आयोजित केलेली आहे , तसेच कुठल्याही जातीतील कुठल्याही क्षेत्रातील, हिंदूवर विनाकारण अन्याय होत असेल तर त्याच्याविरुद्ध आवाज उठवून त्यांना न्याय देण्यासाठी संघटना काम करत आहे असे रत्नपारखी यांनी सांगितले. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्रदेश संघटन सरचिटणीस डॉ प्रशांत पाटील म्हणाले माजलगाव सह संपूर्ण महाराष्ट्रात सर्व जातींना सोबत घेऊन हिंदू संघटन वाढवण्याचे काम करणार आहोत, कारण हिंदू म्हणून एक होणे काळाची गरज आहे हिंदू धर्म टिकला तरच जात टिकेल नुसते जात जात करत बसलो तर धर्म लयाला जाईल.परशुराम हिंदू सेवा संघटनेचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अँड अरविंद पाटील , ता. अध्यक्ष हरिभाऊ नवले , महिला आघाडी ता अध्यक्ष गौरी देशमुख, पवन मोगरेकर, यांनीदेखील या बैठकीमध्ये मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परशुराम हिंदू सेवा संघाचे युवा आघाडी माजलगाब तालुका अध्यक्ष हिमांशू देशमुख तर आभार प्रदर्शन दत्ता महाजन यांनी केले. या कार्यक्रमास नूतन कार्यकारिणी जाहीर झालेले पुरुष व महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

www.tarunbharat.net
तरुण भारत
शुक्रवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२५

छोटे उस्ताद

तुम्हाला माहिती आहे का?

- आपेगाव हे ज्ञानेश्वर महाराजांचे जन्मगाव आहे.
- छत्रपती संभाजी नगर हे हिमरु शालींसाठी प्रसिद्ध आहे.
- रंगीत लाकडी खेळण्यांसाठी सावंतवाडी प्रसिद्ध आहे.
- महाराष्ट्रात मराठवाड्यात सर्वात कमी जंगले आहेत.
- शताब्दी एक्सप्रेस ही महाराष्ट्रातील सर्वात वेगवान रेल्वे आहे.

अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

डोमकावळा

वाघ किंवा बिबट अनेकदा आपली शिकार खाऊन अर्धवट सोडून, पुन्हा भूक लागल्यावर खाण्यासाठी अज्ञात स्थळी दडवून ठेवतो. ही उष्टी शिकार वाघ-बिबट्याने कुठे दडवून ठेवली आहे, याचा माग घेण्याचे मुख्य काम करणारा पक्षी म्हणजे डोमकावळा! डोमकावळा सर्वभक्षी असून अन्न, फळे, उंदीर, लहान पक्षी, किडे खातोच पण, पक्ष्यांची अंडी व पिलांचाही फडशा पाडतो. उष्टी शिकार दिसताच ते गोंगाट करून, मोठ्याने ओरडून शिकाऱ्यांना श्वापदांचा मार्गही दाखविण्याचे काम करतो. म्हणूनच शिकारी लोकांना डोमकावळ्याची एक प्रकारे मदतच होते. आपल्या घराच्या आजूबाजूला सर्वत्र दिसून येणाऱ्या साध्या कावळ्यापेक्षा मोठा व घारीपेक्षा लहान असलेला डोमकावळा लांबीने ४३ सेंमीचा असतो. याचाही रंग चकचकीत काळा असतो मात्र, त्यात जांभळ्या रंगाची लकेर असते. डोळे तपकिरी, चोच जाड, मजबूत आणि पाय काळे असतात. साध्या कावळ्यापेक्षा याच्या गळ्याभोवतीचा पट्टा थोडा मोठा असतो. आपल्या जोरकस घशातून तो 'क्यार्ह' असा काहीसा घोगऱ्या आवाजात ओरडतो. सबंध भारतासह श्रीलंका-ब्रह्मदेशात तो आढळून येतो. ऋतुमानाप्रमाणे आपले स्थान तो बदलतो. डोमकावळे जोडीने किंवा समूहाने जंगली प्रदेशात विहार करतात. नर आणि मादी दिसायला सारखेच असतात. याचा आढळ मनुष्यवस्तीपासून दूर असला तरी, अनेकदा खेड्यापाड्यात, गावात किंवा शहरातही येतो. डोमकावळ्याचा स्वभाव उद्धटपणाचा असून चोरी करण्यात तो वाकबगार असतो. त्यांचे घरटे साधे काटक्यांपासून बनवलेले असते. घरटे बनविणे, अंडी उबविणे आणि पिलांना भरविणे आदी कामे दोघेही मिळून करतात. यांचा विणीचा हंगाम मात्र प्रदेशपरत्वे निरनिराळा असतो. डोमकावळ्याचे पिलू एक महिन्याचे झाले की उडू लागते. दरम्यान, रिकाम्या झालेल्या याच घरट्यात मादी कोकिळ अंडी घालते. डोमकावळा ती अंडी आपलीच समजून ती अंडीही उबवतो. थोडक्यात काय, तर लांब चोचीचा कावळा ही उपप्रजाती व्यापक प्रमाणात डोमकावळा म्हणून ओळखली जाते. एका समूहात ५० पेक्षा जास्त डोमकावळे विहार करतात. डोमकावळ्याचे आयुष्यमान अंदाजे १९ वर्षांचे असते.

डोमकावळा सर्वभक्षी असून अन्न, फळे, उंदीर, लहान पक्षी, किडे खातोच पण, पक्ष्यांची अंडी व पिलांचाही फडशा पाडतो. उष्टी शिकार दिसताच ते गोंगाट करून, मोठ्याने ओरडून शिकाऱ्यांना श्वापदांचा मार्गही दाखविण्याचे काम करतो. म्हणूनच शिकारी लोकांना डोमकावळ्याची एक प्रकारे मदतच होते.

मजेदार चौरस

• खाली दिलेल्या चौकोनातील पहिल्या ओळीत वाहतूकीच्या साधनांचे वेगवेगळे चिन्ह दिलेले आहेत • उरलेल्या अन्य रिकाम्या चौकोनात हे चिन्ह अशाप्रकारे लिहावयाचे आहे की प्रत्येक ओळीत प्रत्येक चिन्ह केवळ एकदाच येईल • प्रत्येक आडव्या, उभ्या आणि तिरप्या ओळीत हे चिन्ह

वाहतूकीचे नियम पाळा व अपघात टाळा



(उत्तर पुढील अंकी)

मागील मजेदार चौरसाचे उत्तर

वंडर गर्ल अनन्या ताजनेकर

संजय पेंडसे/९४२२४४३२९५

बालमित्रांनो, आजचा स्पर्धेचे युग आहे. त्यामध्ये जर आपल्याला टिकाव धरायचा असेल तर आपल्याला जे साध्य करायचं असेल त्याकरीता परिश्रम हे करावेच लागतात. अनन्या छान स्केटिंग करायची. एक-दोन वर्षे स्केटिंग केल्यानंतर ती त्यात प्रवीण झाली. अनेक वेळा तिने पारितोषिकं मिळवली पण, एका अपघातात तिच्या पायाला दुखापत झाली आणि आता आपल्याला काय करता येईल, असा प्रश्न तिला पडला. पण, अनन्या खचून गेली नाही तर असं काहीतरी करू ज्यामध्ये पायाचा जास्तीत जास्त उपयोग होईल आणि आपण आपलं दुःखही विसरू, असं ठरवून ती कराटे या प्रकारात धडे घ्यायला लागली. शिकता शिकता तिने आता पर्पल बेल्टदेखील मिळवला आहे. एवढंच नाही तर कराट्यांसोबत लाठीकाठी, तलवारबाजी या सगळ्या खेळांमध्ये ती आता प्रवीण झाली आहे. तीन वेळा राष्ट्रीय आणि तीन वेळा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत, तिने किमान दहा ते बारा मेडल्स प्राप्त केले आहेत. बघा ना, जर आपण मनाने ठरवलं तर मग अनन्यासारखं खचून न जाता, आपण बरंच काही प्राप्त करू शकतो.

श्री सत्यसाई कॉंव्हेन्ट या शाळेत नवव्या वर्गात शिकणारी आपली वंडर गर्ल अनन्याला शाळेतील मुख्याध्यापिका मनमिळाऊ स्वभावाच्या स्नेहल बांगरे आवडतात. त्या प्रोत्साहन देतात शिवाय, आईसोबतच आजी-आजोबा हे देखील तिला प्रोत्साहन देतात. आंतर शालेय स्पर्धेत शब्दांकुर या स्पर्धेतदेखील तिनं बक्षीस मिळवलंय. अनन्याच्या म्हणण्याप्रमाणे सकाळी सहा ते साडेसात या वेळात जर आपण व्यायाम केला तर दिवसभर उत्साह वाढतो. अनन्याला व्यवसायाची आवड आहे. वडील संगणक शिक्षक आहेत शिवाय फोटोग्राफी त्यांचा छंद आहे. अशा या धैर्यवान अनन्याला तरुण भारतचा छोटे उस्ताद शुभेच्छा देतो.

माकडा रे माकडा

माकडा रे माकडा,
करतोस तू हुप हुप
झाडावरील फळं खाऊन,
मस्ती करतोस खूप
या झाडावरून त्या झाडावर,
मारतोस तू उड्या
छतावरील कौलारू फोडून,
करतोस तू खोड्या
समोरचे पाय म्हणजे,
जणू तुझे हात
उंच शेंड्यावर जाऊन,
बसतोस आंबे खात
मजा वाटते भारी,
लांब शेपटी पाहून
कुणी खोडी केली तर,
येतोस अंगावर धावून
माकडा रे माकडा,
पुरे झाली तुझी मस्ती
झाडावरुन उतरून,
कर आमच्याशी दोस्ती

- रवींद्र चालीकवार

मो.९०११५५९१०६

गणपत

प्रा. भरत खैरकर/९८८१६१५३२९

आसामच्या घनदाट अरण्यात मराठा बटालियनचा ब्रह्मपुत्रा नदीच्या काठावर कॅम्प होता. ट्रेनिंगमध्ये जेव्हा केव्हा ब्रेक मिळायचा तेव्हा तेव्हा जवान त्या नदीवर आपला बराचसा वेळ घालवायचे. त्यामध्ये तिथे कपडे धुणे, आंघोळ करणे, पोहणे इत्यादी कामे चालायची. ते गणेश चतुर्थीचे दिवस होते. काही दिवसांपासून नदीला सारखा पूर होता. तो ४-५ दिवस चालला. पूर ओसरायचं नाव घेत नव्हता. जबरदस्त पावसामध्ये कॅम्पची बऱ्यापैकी वाताहत झाली होती. नेहमीप्रमाणे ७-८ जवान नदीच्या काठावर आपले कपडे धूत होते. एवढ्यात तीन-चार हत्तींचा कळप त्यांच्याकडे धावत येताना त्यांना दिसला. ते घाबरले. काहीजण झाडावर चढले तर काही कॅम्पमध्ये पळाले. दोघे लपून बघत होते. आपण काही केलं नसताना हत्ती आपल्यावर का चालून येत आहेत? हे कोड त्यांना उमगलं नाही. पण क्षणभरच! हत्ती त्यांच्यावर हल्ला न करता त्यांना ओलांडून पुढे नदीच्या दिशेने, काठाकाठाने किंचाळत, रंबल करीत, आरडाओरड करीत बेभान चालले होते. थोड्याच वेळात लक्षात आलं की, हत्तीचं एक पिल्लू नदीच्या पाण्यामध्ये वाहून जात आहे. गटांगळ्या खात आहे आणि त्याला काढण्यासाठी म्हणून उरलेले हत्ती काठावरून त्याच्या मागे जात आहेत. हे लक्षात येताच जवानांनी इतरांची मदत घेऊन हत्तीचे पिल्लू वाचविण्यासाठी हालचाली सुरू केल्या.

हत्तीच्या आईवडिलांचा आपल्या पिल्याला वाचविण्यासाठी प्रयत्न होता. जवानांच्या हे लक्षात आल्यावर त्यांच्या हालचालींना वेग आला. जवानांनी कॅम्पमधून 'टग ऑफ वॉर' खेळतात तो दोर आणला. जवानांनी त्याच्या सहाय्याने चेन बनविली आणि ते पाण्यात उतरले. पिल्लू जसं वाहत आलं तसं साखळीमध्ये त्यांनी त्याला अडकवलं. सुरुवातीला पिल्लाने खूप झटापट केली सुटका करण्यासाठी! मात्र, त्याला जेव्हा लक्षात आलं की, आपल्याला हे वाचवत आहे, तेव्हा ते पिल्लू शांत झालं. नंतर, त्याला ओढत जवानांनी काठावर आणलं. त्याला सोडून दिलं पण, पिल्लू मात्र पुढे जाईच ना! आईवडील पुढे होते तरीही पिल्लू पुढे जाईना. एकदोघांनी मागून त्याला हलकीशी ढोसणी दिली. तरी ते जागचे हलले नाही. शेवटी, सैनिकांनी विचार केला की, पिलाला इथेच सोडून आपल्या कॅम्पमध्ये जाऊ म्हणजे आईवडील त्याला घेऊन जातील. पण, जसे सैनिक पुढे जायला लागले तसे पिल्लूही त्यांच्या मागे जायला लागले. ते पिल्लू कॅम्पमध्ये आले. कॅम्पमध्ये सगळ्यांची तारांबळ उडाली. अरे कुठून आलं? का आलं? मग त्याला त्यांनी फळं, केळी वगैरे खाऊ घातली. त्याला निरखून पाहिल्यावर त्याच्या पाठीवर बऱ्यापैकी मोठी जखम झालेली दिसली. पाण्यामध्ये खडकातून वाहून जाताना ती झाली होती. जखम ताजीच होती. मग रेजिमेंट मेडिकल ऑफिसरला बोलवून सैनिकांनी त्यावर उपचार केले. त्याला मलमपट्टी केली. प्रेमाने त्याच्या पाठीवरून हात फिरवला आणि मग सगळेजण आपापल्या तंबूमध्ये त्याला तिथेच सोडून निघून गेले. थोड्या वेळात हत्तीचे आईवडील आले आणि ते त्या पिल्लाला घेऊन गेले. पण, चार दिवसांनी ते पुन्हा सहकुटुंब आले. आईवडील बाहेरच थांबले पिल्लू मात्र! रेजिमेंट मेडिकल ऑफिसरच्या दवाखान्याकडे निघालं. जिथे त्याला ट्रिटमेंट मिळाली होती. त्या डॉक्टरने परत त्याला मलमपट्टी केली. फळं खायला दिली आणि मग पुन्हा ते पिल्लू आईवडिलांसह परतलं. पुन्हा असंच दोन-तीन दिवसानंतर ते परतलं. दरम्यान, कुठल्याही प्रकारचा आक्रमकपणा किंवा अग्रेशन हत्ती दाखवित नव्हते.फायनल ड्रेसिंग झाल्यानंतर त्याची आरती वगैरे केली. तशी गणेश चतुर्थी चालूच होती. मग, मात्र ते पिल्लू आणि आईवडील कॅम्पकडे भटकले नाही.

दोन वर्षांनंतर त्या ठिकाणी दुसरी बटालियन आली. मराठा बटालियन तिथून दुसरीकडे पोस्ट झाली. तेव्हा त्या नवीन बटालियनलासुद्धा काही हत्ती कॅम्प परिसरात घुटमळताना दिसले. ते तिथल्या तिथे फिरायचे. मात्र, कुठल्याही प्रकारचा आक्रमकपणा दाखवत नव्हते. सामान्यतः हत्ती कॅम्पमध्ये येऊन त्यांचं अन्नधान्य, खायच्या वस्तू उध्वस्त करतात. म्हणून ते संधी बघत आहेत की काय असं नव्या सैनिकांना सुरुवातीला वाटलं. त्यासाठी त्यांनी लक्ष ठेवायला गार्ड लावून ठेवले. मात्र, त्यातला एक हत्ती गेटच्या समोर येऊन सारखा कुणाला तरी शोधतो आहे, असं वाटायचं. पण, तो शांत होता. त्यावरून त्यांना वाटलं की, हे काहीतरी वेगळं आहे. त्यांनी आपल्या हेडक्वार्टरला हे कळविले आणि याच्याआधी जो कुठला कॅम्प, बटालियन येथे होता त्या बटालियनला विचारा की, हे काय प्रकरण आहे? तेव्हा हेडक्वार्टर मधून मराठा बटालियनच्या तेव्हाच्या दोन वर्षांपूर्वीच्या कर्नल समीरला फोन आला की,'काय प्रकरण आहे? ये क्या तुम 'गणपत' लोगोने करके रखा है? यहां रोज हाथी आते है!'

तेव्हा समीरला सुरुवातीला लक्षात आलं नाही. पण लगेच समजलं, आठवलं! 'येस... हम जब वहां रहते थे तब हाथी का छोटा बच्चा वहां आता था! त्याला आम्ही तेव्हा ट्रिटमेंट दिली होती. तो जखमी होता. पूरामधून त्याला बाहेर काढलं होतं. तोच कदाचित आता मोठा झाला असेल. काळजीपूर्वक बघा, त्याला कुठेतरी नवी जखम झालेली असेल. म्हणूनच तो जुन्या डॉक्टरला शोधायला आला असेल. तुमच्या युनिटच्या डॉक्टरला आणून पुढे करा.'

'अरे, वो मारेगा तो नहीं डॉक्टर को?'

'नहीं नहीं...ऐसा नहीं होगा!' एवढे बोलून समीरने हेडक्वार्टरचा फोन ठेवला.

सांगितल्या सूचनेनुसार नव्या बटालियनचा डॉक्टर समोर येताच, तेच दोन वर्षांपूर्वीचं हत्तीचं पिल्लू असलेलं आणि आता प्रौढ झालेला हत्ती एकटाच पुढे येऊन शांत पद्धतीने तोंड खाली करून डॉक्टरच्या पुढे उभा राहिला. डॉक्टरने त्याला प्रेमाने तपासल्यावर लक्षात आलं की, त्याच्या मांडीवर खूप मोठी जखम झाली होती. मार लागला होता. त्याने ड्रेसंग केलं. औषध पाणी केलं. सांगितल्यानुसार केळी, फळं खायला दिली. त्यानंतर ते परत गेले. मागच्या सारखे पुन्हा तीन दिवसानंतर आले. पुन्हा तेच प्रथमोपचार, फळफळावळ आणि प्रेमाचा हात असं दोनदा झाल्यावर! पूर्णतः बरे झालेला हत्ती तिसऱ्यांदा मोठ्या कळपासह आला. आता, मात्र ते सगळे उपचारासाठी न येता सर्व सैनिकांना सलामी देण्यासाठी आले होते. सर्व हत्ती एका मागे एक, उभे राहून सोंड वर करून सारखी मान खालीवर करीत होते. त्यांचे डोळे पाणावले होते आणि सोबतच सैनिकांचेही! परत जाताना सर्वांनी पुन्हा सोंड वर करून जोराचा पोंगा वाजवून सैनिकांचा निरोप घेतला.

बंटीची बंडखोरी

(भाग ३९)

प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२

'बंटी, आपल्या फूटबॉल ग्राऊंडवर काहीतरी रिपेअरी चालू करणार आहेत वाटतं. पुढचे दहा दिवस, ग्राऊंड बंद राहणार आहे,' शिरीषनं सांगितलं.'अरे बापरे... ग्राऊंड बंद म्हणजे आपला खेळही बंद, आपला व्यायाम बंद! कसं होणार आपलं?' बंटी म्हणाला. 'आपल्याला आपल्या सोसायटीच्याच ग्राऊंडवर काहीतरी गेम खेळावा लागेल. व्यायाम करावा लागेल,' यश म्हणाला. 'हो नं! विचार करू. टेस्ट सिरीजमुळे आपलं एका जागी बसणं होतं. शरीर आंबून जातं बसून बसून! फूटबॉलमुळे कसा सर्वांगसुंदर व्यायाम होतो. संध्याकाळचा वेळ ग्राऊंडवर गेल्यावर, मनही प्रसन्न होतं. नुस्तं अभ्यास एके अभ्यास, चांगला नाही. शरीर आणि मन दोन्ही तंदुरूस्त पाहिजे,' बंटी म्हणाला.

'लौकर ठरवावं लागेल. परवापासूनच ग्राऊंड बंद होणार आहे,' स्वानंदनं चिंता व्यक्त केली.'आई, बाबा...काय करू आम्ही आता?' बंटीनं आईबाबांपुढे आपली तक्रार मांडली.'बंटी, एक सुचवू, माझ्या ओळखीचे एक गृहस्थ आहेत, ते लाठी काठी शिकवतात. त्यांना विचारू का?' बाबांनी विचारलं.'लाठी काठी? असे खेळ असतात? मला वाटतं फक्त काही संस्थांमधे परेडच्या वेळी खांद्यावर लाठी धरून परेड करतात,' बंटी म्हणाला. 'हो, लाठी चालवणं कठीण असतं. त्याला खूप सराव लागतो. मी उद्या त्यांना घेऊनच येतो संध्याकाळी! ते समजावून सांगतील तुम्हाला. ठीक आहे?' बाबांनी सांगितलं. 'ठीक आहे,' बंटीनं होकार दिला.

'बंटी लाठी काय किंवा काठी काय, एकच तर असते. त्यात फरक काय असतो?' यशनं विचारलं. 'मला त्याबद्दल फारशी माहिती नाही परंतु, ढाल तलवारीनं जसं शत्रूशी लढता यायचं, धनुष्यबाणानं लढता यायचं, भाल्यानं लढता यायचं, तसं लाठीनंही यायचं, एवढंच मला माहीत आहे. बाबा म्हणत होते,'लाठी चालवणं, लाठीनं लढणं फार अवघड असतं,' म्हणून तर त्यांनी लाठी चालवण्यात तरबेज असणाऱ्या एका काकांना बोलावलंय, तुमचा इंटरेस्ट आहे का, लाठी शिकण्यात?' बंटीनं आपल्या ग्रुपला विचारलं.'हो SS आहे नं! नेहमीच्या गेमपेक्षा काहीतरी वेगळं शिकायला मिळण्यात आनंदच असतो नं?' शिरीष म्हणाला.'बंटी, आपण सोसायटीच्या नोटीस बोर्डवर, नोटीस लावू या की,'ज्या कोणाला लाठी काठीमध्ये इंटरेस्ट असेल, त्यांनी एकत्र जमावं.' बघू कोणाकोणाला स्वारस्य आहे ते,' यश म्हणाला.

'गुड आयडिया यश! समोर गर्दी असली की, शिकवणाऱ्यालाही स्फूर्ती येते, उत्साह वाढतो. मी बाबांना सांगतो तसं! ते बोलावतील काकांना. मग? भेटू या रविवारी सकाळी अकरा वाजता,' बंटीनं सभा समाप्त केली. सोसायटी क्लबच्या बोर्डावर नोटीस लावली गेली. बऱ्याच जणांनी ती पाहिली, वाचली. रविवारी साडेदहा वाजता, बाबांचे मित्र देशपांडे काका आले. त्यांचा चहा-फराळ झाल्यावर, बाबा त्यांना सोसायटीच्या ग्राऊंडवर घेऊन आले. आश्चर्य म्हणजे, लाठीकाठीमध्ये इंटरेस्ट असणारे खूप जण तिथे आधीच जमले होते. बंटी ग्रुपनं आणि दादा ग्रुपनं आधीच लोकांना बसण्यासाठी खुर्च्या लावून ठेवल्या होत्या. पाहुण्यांसाठी टेबल खुर्चीही ठेवली होती. त्यावर कागदी फुलांचा बुके, पाण्याच्या बाटल्या आणि माईक होता. देशपांडे काका प्रसन्न झाले. टाळ्यांच्या कडकडाटात सर्वांनी त्यांचं उत्स्फूर्त स्वागत केलं. बंटीच्या बाबांनी, देशपांडे काकांचं शाल-श्रीफळ देऊन स्वागत केलं. त्यांनी बोलायला सुरूवात केली. 'लाठी काठी हा खेळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून सुरू झालेला मर्दानी खेळ आहे. स्वतःचं रक्षण, शत्रूवर हल्ला करण्यासाठी, लाठीकाठी फिरवण्याची कल्पना

आली. लाठीकाठी स्पर्धाही सुरू झाल्या. त्यात एकमेकांना लाठीने स्पर्श करून गुण मिळवण्याची पद्धत सुरू झाली. लाठी अंगाभोवती थांबू न देता, गरगर फिरवून वर्तुळे निर्माण करणे, हे या खेळाचे कौशल्य आहे.''काका, तुम्ही आता जे सांगितलं की, लाठी स्वतःच्या अंगाभोवती फिरवून, वर्तुळे निर्माण करावी लागतात. ती कशी, याचं प्रात्यशिक देऊ शकाल का?' बंटीनं मध्येच प्रश्न विचारला. 'हो जरूर! चांगला प्रश्न विचारलास बाळा!'

देशपांडे काका उभे राहिले. थोडे बाजूला जाऊन त्यांनी हातात लाठी घेतली. स्वतःच्या अंगाभोवती गरागर फिरवून त्यांनी वर्तुळं निर्माण केली. साऱ्या क्रिया अतिशय वेगानं आणि लिलया केल्या. प्रेक्षकांना संभ्रम निर्माण झाला. साक्षात बाजीप्रभू देशपांडेच जणू त्यांच्यासमोर उभे आहेत आणि दोन्ही हातात तलवारी घेऊन, जिवाच्या आकांतानं लढत आहेत, असा भास प्रत्येकाला झाला.

सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

'ज्या कोणाला लाठी चालवण्यात इंटरेस्ट आहे, त्यांनी इथे यावं. मी सर्वांना पुरतील इतक्या लाठ्या आणल्या आहेत,' काकांनी सांगितलं. बंटी ग्रुप, दादा ग्रुप पुढे आला. देशपांडे काकांनी प्रत्येकाच्या हातात एक एक लाठी दिली.'मुलांनो, एक गोष्ट लक्षात ठेवायची म्हणजे, तुम्ही लाठीकाठी खेळण्यासाठी लाठी हातात घेतली, तेव्हा तुमच्यामध्ये खूप अंतर पाहिजे. एकमेकांना चिकटून उभं रहायचं नाही. नाहीतर, लाठ्या एकमेकांना लागतील,' काकांनी सांगितलं.

सर्वजण एकमेकांपासून दूर उभे राहिले. देशपांडे काकांनी सर्वांना प्राथमिक धडे दिले. प्रत्येकजण आपल्या उजव्या आणि डाव्या बाजूला, हाताने लाठी गरागरा फिरवण्याचा प्रयत्न करू लागला. प्रथम कोणालाच जमलं नाही. देशपांडे काका प्रत्येकाजवळ गेले आणि त्यांना लाठी किती अंतरावर पकडायची, हाताची मूठ कशी असावी, याचे धडे देऊ लागले.'मंडळी, आता मी शत्रूशी लढताना, प्रहार कसे करायचे, त्याबद्दल थोडक्यात सांगणार आहे. प्रथम मी शिकवणार आहे, कर्णप्रहार म्हणजे कानावर मारणे, यात लाठी उभी धरायची आणि दोन्ही अंगांनी जोरात फिरवायची म्हणजे शत्रूच्या कानावर प्रहार करायचा. हा असा...' देशपांडे काकांनी कर्णप्रहाराचं प्रात्यक्षिक दिलं.

'त्यानंतर, मध्य प्रहार म्हणजे शत्रूच्या बरगड्यांवर लाठीने प्रहार करायचा. त्यासाठी लाठी आडवी पकडायची आणि अशी फिरवायची,' परत देशपांडे काकांनी प्रात्यक्षिक करून दाखवलं.'त्यानंतर येतो तो सांधा प्रहार! यात शत्रूच्या गुडघ्यावर प्रहार करायचा असतो. त्यासाठी, लाठी तिरकी आणि गुडघ्यापर्यंत पोहचेल अशी फिरवायची. म्हणजे, गुडघ्याच्या मागच्या बाजूला प्रहार करायचा. ज्यामुळे शत्रूला चालणं शक्य होणार नाही,' काकांनी परत प्रात्यक्षिक करून दाखवलं. 'काका...पण आपल्याला हे प्रहार फक्त युद्धात किंवा मारामारीत करावे लागतील. त्यामुळे एरवी या प्रहारांचा काय फायदा?' बंटीनं विचारलं.

'बरोबर आहे. पूर्वीसारख्या लढाया. शत्रू आता नसतात. हे जरी खरं असलं तरी, प्रत्येकानं जसे कराटे शिकणं गरजेचं आहे तसंच, स्वसंरक्षणासाठी लाठी चालवता येणंही आवश्यक असतं,' काका म्हणाले. 'हो काका, अगदी योग्य बोललात तुम्ही! परवा, आपल्या एका अभिनेत्यावर चोराने चाकूने वार केले. त्याला जर लाठी चालवता येत असती तर, त्याने प्रहार तंत्र वापरून चोराला गारद केलं असतं. याचाच अर्थ लाठी चालवणं, प्रहार शिकणं सगळ्यांना आलं पाहिजे आणि त्यासाठी प्रत्येकाच्या घरी लाठी असणंसुद्धा आवश्यक आहे,' बंटी म्हणाला. 'आजच्या दिवशी एवढी माहिती पुरे! उद्या संध्याकाळपासून सर्वांचं ट्रेनिंग सुरू,' काकांनी सभा संपवली.

पुढच्या दहा दिवसात काकांनी, बंटी ग्रुप आणि दादा ग्रुप सर्वांना, प्रथम वॉर्मिंग अप करायला लावून लाठीचं शास्त्रशुद्ध ट्रेनिंग देणं सुरू केलं. सर्वांनी लाठ्या विकत घेतल्या.'यश, शिरीष...आणि समस्त ग्रुपदोस्तांनो, या दहा दिवसात आपण वेगळ्याच विश्वात रमलो होतो. अगदी फूटबॉल इतका व्यायाम जरी झाला नसला तरी, वेगळा गेम शिकायला मिळाला. याचा आनंद झाला की नाही तुम्हाला?'' बंटीनं विचारलं. 'ऑफ कोर्स...मस्त मजा आली. पण, याचा उपयोग लहान भावांशी भांडणात करू नका,' शिरीशच्या बोलण्यावर सर्वांनी हसून प्रतिक्रिया दिली.

क्रमशः

सोलापूर तरुण भारत
https://epaper.daniktarunbharat.com

जिल्हा वार्षिक योजनेच्या बैठकीत ७५८.५० कोटींची मागणी

हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाढीव निधी देणार- उपमुख्यमंत्री अजित पवार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ६ फेब्रुवारी

हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाढीव निधी देण्यात येणार असून, जिल्ह्यात होणाऱ्या दर्जात्मक विकासकामावर भर देण्याचे निर्देश वित्त व नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री श्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालनातून दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यस्तरीय प्रारुप आराखडा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस मंत्रालयातून अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ, आर् आणि नियोजन राज्यमंत्री ङ आशिष जयस्वाल, आमदार राजू नवघरे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, जिल्ह्याच्या पालकसचिव रिचा बागला, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सर्वसाधारण वार्षिक योजनेतर्गत प्रत्यक्ष १८६ कोटी ५९ लाख रुपयांचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला होता. या आराखड्यास जिल्हा नियोजन समितीने मंजुरी दिली आहे. आज आयोजित राज्यस्तरीय प्रारुप आराखडा बैठकीत जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी ५७१ कोटी ९१ लाख १८ हजार रुपयांची अतिरिक्त मागणी केली आहे. त्यामुळे आता जिल्ह्याचा वार्षिक योजनेचा (सर्वसाधारण) आराखडा ७५८ कोटी ५० लाख १८ हजार रुपये करण्याची म ागणी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केली.

दूरदृश्य प्रणालीद्वारे आमदार सर्वश्री तान्हाजी मुटकुळे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्ह्याची सकारात्मक जीडीपी वाढ ही आनंदाची बाब असून, खात्यावर असलेला उपलब्ध निधी त्वरित खर्च करावा. सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून सरकारचा पैसा योग्य ठिकाणी, दर्जेदार कामे होण्यासाठी खर्च करावा. तसेच जिल्हा वार्षिक योजनेचा चालू वर्षाचा शंभर टक्के निधी खर्च करावा. हिंगोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ, लोकसंख्या, निती आयोगाने आकांक्षित जिल्हे व ता-लुके या सर्व बाबींचा विचार करुन जास्तीत जास्त निधी देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी सांगितले.

राज्यस्तरीय आयोजित ऑनलाईन बैठकीत वित्त व नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर्षीचा राहिलेला निधी वेळेत खर्च करावा. कोणताही निधी व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या विनंतीनुसार मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन आराखडा अंतिम करण्यापूर्वी जास्तीचा वाढीव निधी देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असेही यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी हिंगोली जिल्ह्यातील रस्ते, ग्रामीण रुग्णालय, आरोग्य केंद्रे, प्रशासकीय इमारती, श्री. संत नर्सी नामदेव व औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकास तसेच जिल्ह्याचा पायाभूत व मूलभूत विकास करण्यासाठी जास्तीत जास्त वाढीव निधी देण्याची मागणी केली.

जिल्हा विकास आराखड्यातील कामासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या निधीचा वापर करावा व निधी कमी पडत असल्यास जिल्हा वार्षिक योज-नेचा निधी वापरावा. सन २०२३-२४ चा अखर्चित निधी व चालू वर्षाचा निधी म ार्च अखेरपर्यंत पूर्णपणे खर्च करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी जिल्हा नियोजन समितीमध्ये मंजूर झालेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रारुप आराखड्याची सविस्तर माहिती सादर केली.

नाला खोलीकरण, सीएनबीची कामे, पशुसंवर्धनासाठी औषधी व अत्याधुनिक साहित्य सामुग्री खरेदी करणे, येलदरी, औंढा नागनाथ व वारंगा फाटा या वनपर्यटन स्थळांचा विकास करणे, वनसंरक्षण व मृद जलसंधारणची कामे करणे, घनवन विकसित करणे, ग्रामीण भागातील स्मशानभूमी शेड, आठवडी बाजार विकसित करणे, भूमिगत गटार, अभ्यास केंद्र, ग्राम पंचायत कार्यालय बांधकाम, जिल्ह्यातील ३३ पाझर तलावांची दुरुस्ती, १२ कोल्हापुरी बंधाऱ्यांची दुरुस्ती, १८ नवीन सिमेंट बंधारे बांधकाम करणे, जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीचे बांधकाम, वर्गखोल्यांची दुरुस्ती, शाळेत शौचालय बांधणे, क्रीडांगण विकास, क्रीडा साहित्य पुरवठा, नवीन वैद्यकीय महाविद्यालयासाठी अत्याधुनिक यंत्र व साधनसामुग्री खरेदी, नवीन ३ प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम, अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह, अंगणवाडी बांधकाम, स्वयंपाकघराचे आधुनिकीकरण, अंगणवाडी दुरुस्ती, महिला व बालविकास भवन बांधकाम, महिला बचत गटाकरिता विक्री केंद्र उभारणे, नागरी भागातील रस्ते, भूमि गत गटारे, स्मशानभूमी, उद्याने विकसित करणे, जिल्ह्यातील नवीन रस्ते व पुलाचे बांधकाम, औंढा नागनाथ, नर्सी नामदेव व सिध्देश्वर पर्यटन स्थळांसह १६ पर्यटन स्थळांचा विकास करणे, जिल्ह्यातील विविध यात्रास्थळांच्या ठिकाणी भौतिक सोयीसुविधा निर्माण करणे आदी जिल्ह्यातील विविध विकास कामासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी यावेळी सांगितले. यावेळी हिंगोली जिल्ह्यातील विविध विभागाच्या विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

सेनगाव येथे रोजगार मेळाव्यात १४१ उमेदवारांची प्राथमिक निवड

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ६ फेब्रुवारी

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उम ेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, म ॅडेल करिअर सेंटर हिंगोली व तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान म हाविद्यालय सेनगाव येथे पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा व पदवी तसेच पदवीधारक या पात्रतेच्या २५४ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४१ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील विविध नामांकीत कंपनीचे उद्योजक उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील विविध महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले होते.

या मेळाव्यात मार्गदर्शन करताना प्राचार्य बोथीकर यांनी स्वत:ची क्षमता ओळखून ती सिध्द करावी, असा मंत्र उमेदवारांना दिला. उमेदवारांनी स्वत:चे गाव सोडून मि ळेल तिथे नोकरी मिळवावी, असे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी व्ही. पी. रांगणे यांनी याप्रसंगी सांगितले. सहायक आयुक्त डॉ. रा.प्र.कोल्हे यांनी रोजगार मेळाव्याचा हेतू विशद करताना म्हणाले, मेळाव्याच्या माध्यमातून उद्योजक आपल्या दारी येत आहेत. त्यामुळे युवकांनी मेळाव्यामध्ये सहभाग घेऊन संधीचे सोने करावे. तसेच उमेदवारांना स्वत: रोजगार निर्मिती करणारे बनावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. तळणीकर यांनी रोजगार मेळावे हे युवकांसाठी चालून आलेली संधी आहे, उमेदवारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन महाराष्ट्र इंटरनॅशनल मध्ये भरतीबाबची माहिती वाय. पी. टोनपे यांनी दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. टी. यु. केंद्रे यांनी केले तर व्ही. बी. कल्याणकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी तोष्णीवाल कला, वाणिज्य ववविज्ञान महाविद्यालयाचे कर्मचारी तसेच जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता हिंगोली या कार्यालयाचे वाय. पी. टोनपे, म. शां. लोखंडे, रा.द.कदम, म. ना. राऊत, ना. ज. निरदुडे, र. ला. जाधव, अमोल आडे यांनी परिश्रम घेतले.

हिंगोली- फेब्रुवारी महिन्यात तापमानात दुपारी कमालीची वाढ होत आहे. त्यामुळे उन्हाच्या झळा लागत आहेत. याचा परिणाम शासकीय कार्यालयावर होत असतांना दिसत असून ऐरवी अभ्यागतांनी गजबजलेल्या शासकीय कार्यालयात दुपारच्यावेळी शुकशुकाट पहायला मिळत आहे. छाया- सुनील पाठक

संक्षिप्त वृत्त

पुरस्कारासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावेत

हिंगोली- सामाजिक न्याय विभागामार्फत समाज कल्याण क्षेत्रामध्ये वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार देऊन सन्मानपूर्वक गौरविण्यात येते. सन २०२३-२४ या वर्षातील सहा पुरस्कारांसाठी पात्र अर्जदारांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत विहित नमुन्यात व परिपूर्ण कागदपत्रांसह प्रस्ताव सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय हिंगोली येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. प्रस्तावाबाबतची कागदपत्रे, अर्जाचा नमुना व इतर आवश्यक माहितीसाठी प्रत्यक्ष कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, हिंगोली यांनी केले आहे.

हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

हिंगोली- महाराष्ट्र कोषागार नियम-१९६८ नियम क्र. ३३५ नुसार निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी ते ज्या बँकेतून निवृत्तीवेतन घेतात त्या बँकेमार्फत माहे डिसेंबर या म हिन्यात हयात प्रमाणपत्र जिल्हा कोषागार कार्यालय, हिंगोली येथे सादर करणे आवश्यक होते. तथापि, आर्थिक वर्ष २०२३-२४ चे ३४१ निवृत्तीवेतन धारक, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी माहे डिसेंबर,२०२३ रोजीचे हयात प्रमाणपत्र आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ चे १३०० निवृत्तीवेतन धारक, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी माहे डिसेंबर, २०२४ रोजीचे हयात प्रमाणपत्र सादर केले नाहीत. ज्या निवृत्तीवेतन धारकांनी अद्यापपर्यंत उपरोक्त कालावधीचे हयात प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. त्यांनी संबंधित बँक शाखेच्या शाखा व्यवस्थापकांच्या स्वाक्षरीसह कोषागार कार्यालय हिंग-ोली येथे सादर करावेत. तसेच जे निवृत्तीवेतनधारक , कुटुंब निवृत्तीवेतन धारक मयत झाले आहेत, अशा निवृत्तीवेतनधारकाच्या वारसदारांनी कोषागार कार्यालयास लेखी स्वरुपात कळवावे, असे आवाहन कोषागार कार्यालयाने केले आहे.

संकटात सापडलेल्या मुलांसाठी लाईफलाईन

हिंगोली- देशात लाखो मुलांना दररोज विविध प्रकारच्या शोषण, अत्याचार आणि दुर्लक्षाचा सामना करावा लागतो. या गंभीर समस्येचे निराकरण करण्यासाठी, भारत सरकारने १०९८ चाइल्ड हेल्पलाइन सुरू केली, ही २४/७ चालणारी आपत्कालीन सेवा असून, संकटात असलेल्या मुलांना त्वरित मदत पुरवते. शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांच्या संदर्भात अडचणी, समस्या आल्यास काळजी आणि सुरक्षेच्या दृष्टीने १०९८ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क करून मदत घेता येते. १०९८ हा टोल फ्री क्रमांक असून, २४७ तात्काळ सेवा देणारी शासकीय यंत्रणा आहे. एखादे बालक हरवले असेल किंवा विनापालक आढळून आले असेल, व्यसनाधीन झाले असेल किंवा त्याला वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असेल, भिक्षा मागत असेल, शिक्षणापासून वंचित राहत असेल, अशा संकटात, अडचणीत सापडलेल्या मुलांना १०९८ हा आशेचा किरण म्हणून या क्रमांकाकडे पाहिले जाते.

११ फेब्रुवारीला हिंगोलीत धम्म परिषदेचे आयोजन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ६ फेब्रुवारी

येथे दि. ११ फेब्रुवारी मंगळवार रोजी एक दिवशीय धम्म परिषदेचे आयोजन जेतवन बौद्ध प्रशिक्षण केंद्र अंधारवाडी,हिंगोली च्या वतीने करण्यात आले आहे. परिषदेत तन-मन धनासह सहभागी होण्याचे आवाहन भंते पञ्चारतन थेरो व संयोजन समि तीच्या वतीने करण्यात आले.

हिंगोली येथील दिवंगत भंते काशप महाथेरो यांनी सुरू केलेल्या धम्म परिषदेचे यंदा २३ वे वर्ष आहे. या निमित्त-ाने सकाळी८.३० वाजता भिक्खू संघाच्या हस्ते ध्वज-ारोहण होणार असून त्यानंतर दुपारी १.००वाजता धम्म परिषदेला प्रारंभ होणार आहे अध्यक्षस्थानी भंते धम्मसेवक महास्थवीर (मुळावा) हे रा-हणार असून उद्घाटक भंते प्रा. डॉ.उपगुक्त महास्थवीर (पूर्णा) हे राहणार आहेत. याप्रसंगी भंते प्रा. डॉ. खेमधम्मो महा-थेरो, भंते शरणानंद महाथेरो,भंते प्रा. डॉ.सत्यपाल आदी देशा-तील विविध ठिकाणच्या भंतेची धम्मदेशना ऐकायला मिळणार आहे. परिषदेनंतर बुद्ध-भीम प्रेरणा गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या स्थळाला 'क'तीर्थक्षेत्राचा दर्जा असल्याने परिषदेला खा नागेश पाटील आष्टीकर, आ.तानाजी मुटकुळे,आ.राजू भैया नवघरे आ.संतोष बांगर, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जि.प.सीईओ नेहा भोसले आदींची उपस्थिती असणार आहे.मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भंते पञ्चारतन थेरो व संयोजन समि तीच्या वतीने करण्यात आले.

शासकीय वसतीगृहातील मुलींचे समुपदेशन करा-गोयल

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ६ फेब्रुवारी

जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहात राहणा-या विद्यार्थिनींचे विशेष शिबिरांच्या माध्यमातून परीक्षेच्या कालावधीत मानसिक आरोग्य तपासून घ्यावे. तसेच आवश्यकता असल्यास त्यांचे वेळीच योग्य समुपदेशन करण्याचा जिल्हा प्रशासन अभिनव उपक्रम राबविणार असल्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी बैठकीत सांगितले.

महिला व बालविकास विभागाच्या त्रैमासिक आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी राजाभाऊ मगर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजीव एडके, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी भाकरे, पोलीस निरीक्षक शालिनी नाईक, जिव्हाळा संस्थेच्या श्रीमती रोहिणी अलमुलवार, श्रीमती ज्योती कोथळजकर यांच्यासह समिती सदस्य तथा संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील शासकीय निवासी तसेच आदिवासी निवासी वसतिगृहात राहणा-या आणि परीक्षेच्या कालावधीत तणावाच्या प्राथमिक टप्प्यात असलेल्या विद्यार्थिनींचे सम ुपदेशन करण्यात येणार आहे. विशेष शिबिरांच्या माध्यमातून म ानसतज्ज्ञांकडून हे समुपद-ेशन करण्याचा प्रायोगिक तत्वावर अभिनव उपक्रम राबविण्यात यावा.

हा उपक्रम जिल्हा महिला व बालविकास विभाग, जिल्हा समाज कल्याण विभाग, आणि जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या योग्य सम न्वयातून राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी श्री. मगर यांना दिल्या. परीक्षा कालावधीत विद्यार्थिनी तणावात असतात; त्यांचे वेळेत मानसतज्ज्ञांकडून मार्गदर्शन आणि समुपदेशन झाल्यास अनर्थ टाळता येऊ शकतो. विद्यार्थिनींवर आलेल्या तणावाचे जिल्हा यंत्रणेकडून योग्य आणि वेळीच व्यवस्थापन करण्याचा हा प्रयत्न रा-हणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर पुढील टप्प्यात घरगुती हिंसाचाराला बळी पडत असणाऱ्या महिला, जिल्ह्यातील तणावग्रस्त शेतकरी, आदिवासी विभागाच्या निवासी वसतिगृहात, सुधार गृह, निरीक्षणगृहांना भेटी देऊन त्यांचेही समुपदेशन करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस असल्याचे जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी सांगितले.

यावेळी भरोसा सेल, टोलफ्री क्रमांक १०९८, त्यावर प्राप्त तक्रारी, त्यांचे निरसन, समुपद-ेशन केंद्राच्या माध्यमातून करण्यात येण-ारे समुपदेशन यांचा आढावा घेतला. १०९८ या क्रमांकाची व्यापक प्रमाणावर प्रसिद्धी करण्याच्या संबंधितांना सूचना केल्या. तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांकडून म हिलांसाठी राबविण्यात येणा-या योजनांचाही जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी आढावा घेतला.

बर्ड फ्लू आजाराबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करा- जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ६ फेब्रुवारी

राज्यातील काही जिल्ह्यामध्ये बर्ड फ्लूचे रुग्ण आढळून आले आहेत. आपल्या जिल्ह्यातही बाधित होऊ नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात जिल्हा प्राणिजन्य आजार समितीची बैठक घेऊन समितीची स्थापना करण्यात आली.

या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. मंगेश टेहरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा सर्वे क्षण अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सखाराम खुने, विभागीय वन अधिकारी डॉ. राजेंद्र नाळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. श्रीचक्रधर मुंगल, जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण राठोड, साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश जाधव, जिल्हा साथरोग तज्ञ डॉ. इनाम तुला खान, अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम अंतर्गत एस फार्म, पी फार्म, एल फार्मबाबत सविस्तर आढावा घेतला. तसेच प्राणीजन्य आजार व प्रतिबंधात्मक उपाययोजना यावर चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये प्राणिजन्य आजार रेबीज स्क्रब टायफस, लेप्टोस्पायरोसीस, स्वाईन फ्लयू व बर्ड फ्लयूबाबतची राज्यातील सध्याची परिस्थितीबाबत व प्राणिजन्य आजाराची तसेच ग्युलीन बॅरी सिन्ड्रोम (जीबीएस) या आजाराची राज्यातील सद्याची परिस्थिती व प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत जिल्हा सर्वेक्षण अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे यांनी माहिती दिली.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. खुणे यांनी जिल्ह्यातील कुक्कुट पालनामधील पक्षाचे (कोंबडीचे) विविध नमुने घेऊन प्रतिबंधात्मक स्वरुपात पुढील तपासणीसाठी पाठविले असल्याची माहिती दिली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी जिल्हास्तरावर स्थापित शिघ्र प्रतिसाद पथकाबाबत (आर.आर.टी) माहिती दिली. प्राणीजन्य आजाराच्या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचे प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. मंगेश टेहरे यांनी सांगितले.

बस स्थानकात प्रवाशांची गर्दी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ६ फेब्रुवारी

येथील बस स्थानकात मागील दोन दिवसांपासून प्रवाशांची गर्दी वाढत आहे. अनेक प्रव-ाशी हिंगोलीहून प्रयागराजला जाण्यासाठी अमरावती, भुस-ावळ या ठिकाणी जाण्यासाठी गर्दी करीत आहेत. बसची १४ टक्के भाडेवाढ होऊनही मोठ्या संख्येने अजूनही प्रवाशी बसलाच प्राधान्य देत आहेत. येथील बस स्थानकात गर्दी वाढत आहे मात्र बस स्थानकात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेसोबतच सुविधांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.